मुंबई, मध्यप्रांत, बडोदें व इंदूर येथील शाळाखात्यानें
बक्षीस व लायब्ररीकरितां मंजूर केलें आहे.

---

लहान मुलां–मुलींकरितां

# हिंदु सण आणि व्रतें

## यांची संक्षिप्त माहिती


लेखक :

**बाळकृष्णतनय**

(दत्तात्रय बाळकृष्ण खांबेटे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, मुंबई नगरपालिका)



म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र. ८८८४ नों दि ........
वि. ७१.७१. क्र. ..............

IRBK-0106984



बलवन्त पुस्तक भाण्डार
गिरगांव नाका, मुंबई नं. ४.

बलवन्त प्रकाशन
क्रमांक १२

प्रकाशक :
त्रिंबक विष्णु परचुरे,
बलवन्त पुस्तक भाण्डार,
मुंबई नं. ४

आवृत्ति सातवी
मकर संक्रांत, शके १८७९
( जानेवारी, १९५८ )

मुखपृष्ठ :
श्री. शंतनु माळी, मुंबई.

मुद्रक :
मा. कृ. सहस्रबुद्धे,
प्रोप्रायटर, श्रीज्ञानेश्वर प्रेस,
३९३ सी, शिवाजी रोड,
कोल्हापूर.

कव्हर छपाई :
सर्वोदय प्रिंटर्स, मुंबई ४

किंमत १। रुपया.

( सर्व हक्क लेखकानें आपले स्वाधीन ठेविले आहेत. )

# प्रस्तावना

आपण जे सण साजरे करितों व जीं व्रतें पाळतों त्यांची धार्मिक दृष्ट्या माहिती प्रत्येकास असणें अवश्य आहे. कारण अशा सणांच्या उपपत्ती-विषयक कथा ह्या केवळ आत्मैक अथवा पारमार्थिक दृष्टीनेंच महत्त्वाच्या नसून त्यांच्यांत समाजाच्या दृष्टीनें व राष्ट्रहिताच्या दृष्टीनेंहि महत्त्वाचा असा बराच भाग आहे. पण त्याची जाणीव आपणांस व्हावी तशी अद्याप झालेली दिसत नाहीं. सण म्हणजे केवळ आनंद करण्याचा एक दिवस एवढाच ( संकुचित ) अर्थ मनांत आणून ते साजरे केले जातात असें अनुभवांतीं दिसून येतें. ही स्थिति नष्ट होऊन आपल्या सणांची माहिती व्हावी, ह्या दृष्टीनें अलीकडे कांहीं पुस्तकें प्रसिद्ध झालेलीं आहेत व त्यांचा बराचसा उपयोगही होईल; परंतु सध्यां उपलब्ध असलेलीं पुस्तकें माझ्या मतें प्रौढ माणसांच्याच उपयोगाचीं आहेत. त्यावरून मुलांना स्वतंत्र तऱ्हेनें ज्ञान होण्याचा संभव कमी; कारण सदहू पुस्तकांतील भाषा लहान मुलांच्या दृष्टीनें बरीच कठीण आणि म्हणून त्यांस दुर्बोध व त्यांतील विषयविस्तारही मुलांना कंटाळवाणा होण्याजोगा आहे; ही अडचण दूर व्हावी व मुलांना स्वतंत्र पण थोडक्यांत व स्पष्ट माहिती मिळावी म्हणून हें लहान मुलां-मुलींकरितां " **हिंदु सण आणि व्रतें** " या नांवाचें पुस्तक लिहिण्याचा उपक्रम मीं केला आहे.

पुस्तक लिहितांना मुलांच्या बुद्धीची शक्ति डोळयांपुढें ठेवून, विषय त्यांना मनोरंजक व सुबोध व्हावा, ह्या दृष्टीनें शक्य तितका प्रयत्न केला आहे. असें करण्यांत क्वचित् कोठें भाषेच्या शृंगारांत कमीपणा आला असेल, पण त्याला इलाज नाहीं.

ह्या पुस्तकांत सणांची व व्रतांची उपपत्ति फक्त पौराणिक कथाभागासह दिली आहे ( अर्वाचीन लोकांच्या मतांचें दिग्दर्शन केलेलें नाहीं ); तसेंच शास्त्रांत व प्रचारांत तो सण व तें व्रत कसें पाळावें हेंही दिलें आहे. शेवटीं कांहीं सणांपासून व व्रतांपासून मुलांमुलींनीं कोणता उपदेश घ्यावा याचाही थोडासा उल्लेख केलेला आहे. ह्या पुस्तकांत जयन्त्यांचा अंतर्भाव करणें अप्रस्तुत असें माझें मत असल्यामुळें त्यांची माहिती दिलेली नाहीं.

महाभारत, महाभागवत, पुराण, धर्मसिंधु, व्रतराज, कृत्यसंग्रह, उपयुक्त कथासंग्रह व निरनिराळ्या पोथ्या वगैरे प्राचीन ग्रंथांच्या आधारानें हें पुस्तक तयार केलें आहे.

या पुस्तकांत कांहीं दोष आढळून आल्यास ते सुज्ञ वाचकांनीं मला कळविण्याची तसदी घ्यावी, अशी त्यांस नम्र विनंति आहे.

सदरहू पुस्तकाच्या प्रसिद्धीच्या कामीं माझे प्रिय मित्र श्री. 'लक्ष्मीकांत' व इतर स्नेही यांनीं जें साहाय्य केलें, त्याजबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

असो. शेवटीं ज्या जगत्प्रेरक परमेशाच्या प्रेरणेनें मला सदर पुस्तक लिहिण्याची स्फूर्ति झाली त्याचे चरणीं लीन होऊन ही माझी कृति प्रिय बालवाचकांच्या हातीं देतों.

मुंबई, विजयादशमी,
शके १८४७

बाळकृष्णतनय

---

# सहाव्या आवृत्तीची प्रस्तावना

श्रीलक्ष्मी-नारायणाच्या कृपेनें, पांचवी आवृत्ति अत्यंत अल्पावधींत संपल्यामुळें ही सहावी आवृत्ति छापण्याचा सुयोग आल्याबद्दल अत्यंत आनंद वाटत आहे. सदर पुस्तक लहान मुलांस आकर्षक होण्यासाठीं मुखपृष्ठावर तीन रंगी चित्र छापलें आहे. तसेंच या आवृत्तींत सणांना अनुरूप अशीं चित्रेंही घातलीं असल्यामुळें सदर पुस्तक लहान मुलां-मुलींना अत्यंत मनोवेधक होईल असें माझें मत आहे.

आजपर्यंतच्या सर्व आवृत्ति लोकादरास पात्र झाल्या तशी हीही होवो अशी प्रभुचरणीं प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करितों.

आपला,
बाळकृष्णतनय
(दत्तात्रय बाळकृष्ण खांबेटे-आंजर्लें
दापोली-रत्नागिरी.)

---

# सातव्या आवृत्तीची प्रस्तावना

श्रीलक्ष्मीनारायणाच्या कृपेनें सहावी आवृत्ति अत्यंत अल्पावधींत संपल्यामुळें ही सातवी आवृत्ति छापण्याचा सुयोग आल्याबद्दल अत्यंत आनंद वाटत आहे.

आपल्या भारतांत श्रीरामजयंती व श्रीकृष्णजयंती हे दोन उत्सव लहानमोठ्या प्रमाणांत सार्वजनिक रीत्या सर्वत्र साजरे केले जातात. म्हणून लहान मुलांना या दोन उत्सवांची माहिती असणें अत्यंत जरूर आहे, अशी कांहीं वाचकांकडून सूचना आल्यामुळें हा विषय ह्या आवृत्तींत अधिक घातला आहे. हें प्रस्तुतच्या आवृत्तीचें वैशिष्ट्य आहे.

आमचे एक ग्रामस्थ "विद्याविनोद नारायणशास्त्री जोशी यांनीं सदर पुस्तक अत्यंत सूक्ष्म दृष्टीनें व आस्थेवाईकपणानें वाचून, शास्त्रीय दृष्ट्या ज्या सुधारणा सुचविल्या त्या अत्यंत बहुमोलाच्या आहेत यांत शंका नाहीं. ह्या त्यांच्या कृतीबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

प्रस्तुत आवृत्ति सुधारण्याचे कामीं, माझे शिक्षणक्षेत्रांतील एक मित्र श्री. स. रा. नारगोळकर यांनीं केलेल्या मदतीबद्दल त्यांसहि धन्यवाद !

तसेंच बलवंत **पुस्तक भांडाराचे** मालक श्री. **त्रिंबक विष्णु परचुरे** यांनीं सदर पुस्तकाचें प्रकाशन करून लोकादरास पात्र केलें याबद्दलही मी त्यांचा आभारी आहें.

आजपर्यंतच्या सर्व आवृत्ति लोकादरास पात्र झाल्या तशी हीही होवो अशी प्रभुचरणीं प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करितों.

आपला,

**बाळकृष्णतनय**

( दत्तात्रय बाळकृष्ण खांबेटे—आंजर्लें
दापोली—रत्नागिरी. )

# अभिप्राय

**कै. श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि**, बी. ए. ( चीफ् ऑफ औंध )

परकीय सत्तेमुळें धार्मिक शिक्षणाची सोय नसल्यामुळें चांगल्या शिकलेल्या हिंदु मुलां-मुलींना मिति, शक, ऋतु इत्यादींसारख्या गोष्टी माहीत नसतात, मग सणांविषयीं माहिती काय असणार? अशा स्थितींत मुलां-मुलींना आपल्या सणांची व व्रतांची सोपपत्तिक, शास्त्रोक्त व सहेतुक माहिती सुबोध व मनोरंजक रीतीनें देणाऱ्या पुस्तकांची फारच आवश्यकता होती. तें कार्य रा. 'बाळकृष्णतनय' यांनीं करून लहान मुलां-मुलींना उपकृत केलें आहे. सदर पुस्तक माहितीच्या दृष्टीनें केवळ लहान मुलां-मुलींसच उपयुक्त आहे असें नसून तें प्रौढ स्त्री-पुरुषांनासुद्धां उपयुक्त होईल असें आम्हांस वाटतें. पुस्तक प्रत्येक कुटुंबवत्सलास संग्राह्य झालें आहे यांत शंका नाहीं.

प्रोफेसर **डॉ. एन्. एन्. गोडबोले**, एम्. ए., बी. एस्सी., पीएच्. डी. ( बर्लिन ), बनारस युनिव्हर्सिटी.

आपण जे सण साजरे करतों त्यांची थोडीबहुत तरी माहिती मुलांना असणें अत्यावश्यक आहे. म्हणून सदरहू पुस्तक हिंदु मुलांमुलींना अतिशय उपयुक्त होईल यांत शंका नाहीं. आपला प्रयत्न उत्तेजनार्ह आहे.

**डायरेक्टर, स्कूल एज्युकेशन—इंदूर**, सदर पुस्तकांत प्रत्येक सणाची उपपत्ति, संक्षिप्त इतिहास व ते कसे साजरे करतात हें सुसंगत रीतीनें लिहिलें आहे. पुस्तकांत दिलेली माहिती मुलांना पुरेशी व मनोरंजक आहे. तसेंच हें पुस्तक मुलांना बक्षीस देण्यास व त्यांच्या वाचनालयांत ठेवण्यास योग्य आहे.

**केसरी**—हिंदूंचे प्रमुख सण १६, सामान्य सण ७ व व्रतें २१ यांची माहिती सुबोधपणें दिली आहे. प्रत्येक सणाचा इतिहास, त्याची रूढि व धर्म याप्रमाणें माहिती दिली आहे. अलीकडच्या शिक्षणक्रमांत धार्मिक शिक्षणाला फांटा दिला असल्याकारणानें कित्येक मुलां—मुलींस कोणता सण केव्हां येतो याचीही माहिती नसते. ह्या पुस्तकानें वरील सर्व माहिती थोडक्यांत, सुलभपणें व मनोरंजक रीतीनें दिली असल्यानें बाल-वाचकांची ज्ञानाबरोबर करमणूकही होईल.

याशिवाय विद्वान् लोक, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी—पुणें, महाराष्ट्र—नागपूर, मराठी—शिक्षक, कन्याशिक्षक, शालापत्रक—वऱ्हाड, यांचेही अनुकूल अभिप्राय आले आहेत, परंतु स्थलाभावामुळें ते छापले नाहींत.

# अनुक्रमणिका


पृष्ठ

## मुख्य सण

१ वर्षप्रतिपदा ... १
२ अक्षय्यतृतीया ... ५
३ नागपंचमी ... ७
४ श्रावणी ( यज्ञोपवीत–धारणविधि ) ... १०
५ पोवती पौर्णिमा ... १२
६ नारळी पौर्णिमा ... १३
७ गणेश चतुर्थी ... १४
८ विजयादशमी (दसरा)... २२
९ धनत्रयोदशी ... २६
१० नरकचतुर्दशी ... २७
११ लक्ष्मीपूजन ... २९
१२ बलिप्रतिपदा ... ३०
१३ यमद्वितीया ( भाऊबीज ) ३१
१४ मकरसंक्रांत ... ३३
१५ रथसप्तमी ... ३५
१६ हुताशनी ( होळी ) ... ३७

## व्रतें ( स्त्रियांकरितां )

१ वटसावित्री ... ४०
२ मंगळागौरी ... ५०
३ पिठोरी अमावास्या ... ५३
४ हरितालिका ... ५६
५ ऋषिपंचमी ... ५९
६ महालक्ष्मी ... ६२

## स्त्री–पुरुषांकरितां

१ गंगोत्सव ( दशहरा ) ... ६३
२ महाएकादशी ... ६६
३ अनंतचतुर्दशी ... ६८
४ वैकुंठचतुर्दशी ... ७०
५ महाशिवरात्र ... ७१

## सामान्य सण

१ गौरीउत्सव (हळदीकुंकू) ७४
२ पोळा ... ७५
३ महालक्ष्मी ( ज्येष्ठागौरी ) ७६
४ नवरात्रोत्सव ... ७७
५ तुलसीविवाह ... ७८
६ त्रिपुरीपौर्णिमा ... ८१
७ चंपाषष्ठी ... ८१

## उत्सव

१ श्रीरामनवमी ... ८२
२ श्रीकृष्णजयंती ... ८७

# * पंचतंत्र *

( सरळ मराठी भाषांतर )

(पृष्ठें ३४८) अनुवाद : **का. अ. जोशी** व **पां. रा. ढमढेरे**

भरपूर चित्रें, [तीन रंगी मुखपृष्ठ] **किं. ३ रुपये**

रोजची व्यावहारिक नीति सोप्या व मार्मिक भाषेंत यांत सांगितली आहे. भारतांतील व जगांतील सर्व भाषांत याचीं भाषांतरें झालीं आहेत. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना अत्यंत उपयुक्त.

# ❋ संपूर्ण इसापनीति ❋

( मुळाबरहुकूम मार्मिक भाषांतर )

अनुवाद : **रघुवीर सामंत**, बी. ए., बी. टी.

पृष्ठें २७२ ) किं. ३ रुपये ( भरपूर चित्रें

मूळ ग्रीक इसापनीतीस धरून हें भाषांतर केल्यामुळें वाचकांस मुळांतील रसास्वाद घेतां येईल.

# * संपूर्ण चातुर्मास *

## : सर्व कुटुंबाचा धार्मिक मार्गदर्शक :

पृष्ठें २५६ ) संपादक : **का. अ. जोशी**


अनेकरंगी मुखपृष्ठ ) * ( **किं. २ रुपये**

यांत शनिमहात्म्य, व्यंकटेश स्तोत्र वगैरे सर्व स्तोत्रें, आरत्या, रोज लागणारीं छोटीं स्तोत्रें, भूपाळ्या, सणांसंबंधीं माहिती व इतर अनेक धार्मिक माहिती दिलेली आहे.

विभाग
क्रमांक
नों. दि.

# हिंदु सण आणि व्रतें

## १. वर्षप्रतिपदा (गुढी पाडवा)



हिंदु लोकांचे जे महत्त्वाचे सण आहेत त्यांपैकीं वरील सण आहे. वरील दिवस साडेतीन[1] मुहूर्तांपैकीं असल्यामुळें त्या दिवशीं कोणतेंही नवें काम करण्यास लोक आरंभ करितात. वरील सणाच्या उपपत्तीविषयीं चार-दोन कथा आहेत त्या अशा:—

१. प्रथम ब्रह्मदेवानें जग उत्पन्न केलें तें चैत्र शुद्ध प्रतिपदेस होय (ब्रह्मांडपुराण).

---

१ साडेतीन मुहूर्त:—१ वर्षप्रतिपदा, १ अक्षय्यतृतीया, १ विजयादशमी, ½ बलिप्रतिपदा.

२. श्रीरामचंद्रांनीं दुष्ट जो रावण त्याचा व इतर राक्षसांचा पराभव करून व त्यांस ठार मारून प्रथम याच दिवशीं अयोध्येंत प्रवेश केला. त्या समयीं लोकांनीं गुढ्या, तोरणें वगैरे उभारून तो दिवस मोठ्या आनंदांत घालविला. तेव्हांपासून दर वर्षीं तो दिवस पाळण्यांत येतो.

३. नारद ऋषींस (नारदीस) साठ पुत्र झाले. हींच साठ संवत्सरें[1] होत. ह्या प्रत्येक संवत्सराचा पहिला दिवस देवांनीं गुढ्या, तोरणें उभारून साजरा केला. तो दिवस म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदा होय.

श्रीमन्महाभारतांत वैशंपायन ऋषीनें जनमेजय राजास कथा सांगितली ती अशीः—

चेदि देशाचा राजा वसू, राज्याचा त्याग करून अरण्यांत तपश्चर्या करण्याकरितां गेला. त्याची तपश्चर्या पाहून हा इंद्रपदास योग्य असें जाणून इंद्रादिक देव त्याच्याजवळ प्रगट झाले व त्याला म्हणाले, सध्यां भूमीवर कोणीही नियंता नाहीं, याकरितां तूंच या पृथ्वीचें पालन करण्यास योग्य आहेस.

**इंद्रः**—हे राजा, ह्या पृथ्वीवर तुझ्याशिवाय माझा एकही प्रिय मित्र नाहीं. माझ्या प्रसादानें तुला एक दिव्य विमान प्राप्त होईल.

---

१ **साठ संवत्सरेंः**—प्रभव, विभव, शुक्ल, प्रमोद, प्रजापति, अंगिरस, श्रीमुख, भाव, युवन्, धातृ, ईश्वर, बहुधान्य, प्रमाथिन्, विक्रम, वृष, चित्रभानु, सुभानु, तारण, पार्थिव, अव्यय, सर्वजित्, सर्वधारिन्, विरोधिन्, विकृति, खर, नंदन, विजय, जय, मन्मथ, दुर्मुख, हेमलंबिन्, विलंबिन्, विकारिन्, शार्वरिन्, प्लव, शुभकृत्, शोभन, क्रोधिन्, विश्वावसु, पराभव, प्लवंग, किलक, सौम्य, साधारण, विरोधकृत्, परिधाविन्, प्रमादिन्, आनंद, राक्षस नल, पिंगल, कालयुक्त, सिद्धार्थिन्, रौद्र, दुर्मति, दुंदुभि, रुधिरोद्गारिन्, रक्ताक्षिन्, क्रोधन, क्षय.

तसेंच तुला एक वैजयंती माला अर्पण करितों. तिचा प्रभाव असा आहे कीं, ती गळ्यांत असलीं म्हणजे युद्धांत तुला एकही व्रण होणार नाहीं. कांहीं कालानें तुला धर्माचरणानें पुण्यलोक प्राप्त होईल. नंतर इंद्रानें आपल्या प्रेमाची खूण म्हणून साधूंच्या रक्षणासाठीं एक वेळूची काठी दिली. ती वसू राजानें वस्त्रेंभूषणें व गंधपुष्पें इत्यादिकांनीं सुशोभित करून तिची पूजा केली. तो दिवस चैत्र शुद्ध प्रतिपदा होता. त्यावरून वरील सण पाळण्यांत आला असावा.

**धार्मिक विधि व रूढिः**—चैत्र शुद्ध प्रतिपदा हा शालिवाहन शकाच्या वर्षाचा पहिला दिवस होय. त्या दिवशीं सर्व स्त्री-पुरुषांनीं पहांटेस उठून सकाळचीं कामें आटोपावीं. स्त्रियांनीं घरासमोरील आंगण गाईच्या शेणानें सारवून त्यावर उत्तम प्रकारची रांगोळी घालावी. घरांतील सर्व लहानथोर मंडळींनीं अंगास सुवासिक तेलें लावून ऊन पाण्यानें स्नानें करावीं. नवीन धोतरें नेसावीं, लहान मुलांनीं नवीन कपडे घालावे व देवांची पूजा उत्तम उत्तम प्रकारचीं फुलें आणून करावी. घरासमोर आंब्याच्या पानांचीं तोरणें बांधावीं. घरांतील सर्वांत वडील मनुष्यानें एक वेळूची (बांबूची) मोठी काठी आणून, ती स्वच्छ धुऊन, तिच्या शेवटास तांबडें वस्त्र व फुलांची माळ बांधावी व वर लोटी ठेवावी. अशा रीतीनें ती तयार केलेली वेळूची काठी दारासमोर रांगोळी घातलेल्या जागेवर उभी करावी. (अशा काठीला **गुढी** असें म्हणतात. धर्मशास्त्रांत **ब्रह्मध्वज** असें म्हटलें आहे.) नंतर तिची पूजा करावी. गुढी उभारतात म्हणून त्या दिवसाला **गुढी-पाडवा** असेंही म्हणतात. गुढीची पूजा केल्यानंतर कडूनिंबाचीं कोंवळीं पानें घेऊन तीं वाटावीं व त्यांत मिरीं, हरभऱ्याची डाळ, ओवा, मीठ वगैरे पदार्थ घालावे. मग तें मिश्रण सर्व लहानथोर मंडळींनीं थोडें थोडें खावें. त्या योगानें कोणताही रोग होत नाहीं.

कडूनिंब खाणाराचें शरीर तेजस्वी व निरोगी असतें. पूर्वीं ऋषि कडूनिंबाचीं पानें खाऊन राहात असत, असें पुराणांत लिहिलेलें आढळतें. हल्लीं मात्र पूर्वींचा प्रचार बंद होऊन फक्त वर्षप्रतिपदेसच तीं खाण्याचा प्रघात सुरू आहे.

नवीन पंचांगांतील वर्षफल वाचावें अगर जोशी, भटजी यांजकडून वाचवावें. हा दिवस सुग्रास अन्न खाऊन, गाणें–खेळ वगैरे गोष्टी करून सर्व मंडळींसह मोठ्या आनंदांत घालवावा म्हणजे वर्षभर सुखाची प्राप्ति होईल.

**उपदेशः**—आपण मागील वर्षीं जीं कांहीं चांगलीं अगर वाईट कामें केलीं असतील, त्यांचें स्मरण करून प्रत्येक मनुष्यानें नवीन वर्षांत आपलें आचरण पवित्र, सत्त्वशील आणि प्रेमळ करण्याचा निश्चय करावा. त्याचप्रमाणें एकमेकांची प्रेमानें भेट घेऊन नवीन वर्ष आनंदांत जावें म्हणून परमेश्वराची मनापासून प्रार्थना करावी. तसेंच मागील वर्षांत आधिव्याधींपासून व इतर संकटांपासून परमेश्वरानें आपलें रक्षण केलें याबद्दल त्याचे अंतःकरणपूर्वक आभार मानावे. लहान मुलांमुलींनीं आपल्या अंगांत जे दुर्गुण असतील ते सोडून देऊन नवीन वर्षांत चांगले गुण मिळविण्याची अवश्य खटपट करावी.

## २. अक्षय्यतृतीया

वैशाख शुद्ध तृतीयेस अक्षय्यतृतीया म्हणतात. हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकीं एक आहे असें मानितात. या दिवशीं स्नान, दान, होम, जप व पितरांचें तर्पण वगैरे जें कांहीं केलें जातें तें अक्षय्य टिकतें अस शास्त्रांत सांगितलें आहे. त्यासंबंधानें भविष्योत्तर पुराणांत कथा आहे ती अशी:—

शाकल शहरांत धर्म या नांवाचा एक वाणी राहात असे. तो सत्यनिष्ठ व प्रियभाषी असून देव व ब्राह्मण यांची नित्य पूजा करीत असे. एके दिवशीं त्याच्य कानांवर अक्षय्यतृतीयेचें माहात्म्य पडलें. तें ऐकिल्यावर त्यानें नदींत स्नान केलें व पितर आणि देवता यांचें तर्पण केलें आणि घरीं येऊन उदकानें भरलेले घट व दक्षिणा ब्राह्मणांस दिली. असा त्याचा क्रम दर वर्षीं सुरू होता. पुढें कांहीं काळानें तो ईश्वराचें स्मरण करीत मरण पावला. पुढच्या जन्मीं त्याला मागील पुण्याच्या योगानें राज्यपद मिळाल्यावरही त्यानें पूर्वींचाच क्रम ठेविला होता. जरी तो इतका दानधर्म करीत असे तरी त्याला तोटा कधींच आला नाहीं. याचें कारण त्यानें अक्षय्य-तृतीयेस पुष्कळ दानधर्म केला होता, त्याचेंच हें फल होय. ही तिथि परशुरामजन्माची आहे.

**धार्मिक विधि:**—बुधवार व रोहिणी नक्षत्र ज्या अक्षय्यतृतीयेस येईल ती सर्वांत उत्तम होय असें शास्त्रवचन आहे. या दिवशीं ग्रीष्म ऋतूमध्यें होणाऱ्या सर्व धान्यांच दान करावें. छत्री, जोडे, गाय, सुवर्ण व वस्त्रें तसेंच स्वच्छ थंडगार पाण्यानें भरलेले कलश यांचेंही यथाशक्ति दान करावें. जें आपणांस अत्यंत प्रिय असेल तेंही दान करावें. त्याचप्रमाणें पितरांच्या नांवानें थंड पाण्यानें

भरलेलें उदकुंभदान ब्राह्मणास द्यावें असें सांगितलें आहे. वास्तविक हा दिवस श्राद्धदिनच आहे. परंतु कांहीं ठिकाणीं हा सण आहे असे मानितात.

**रूढि:**—ह्या दिवशीं सकाळीं स्नान करून सर्व कामें आटोपावीं व दुपारीं पितरांकरितां ब्राह्मणास उदकुंभदान द्यावें. यवांनीं श्रीविष्णूची पूजा करावी. मग ब्राह्मणास दान द्यावें.

देशावर या सणाचें महत्त्व विशेष आहे. ब्राह्मणेतर लोक यास आखेती म्हणतात. ह्या दिवशीं नाना प्रकारचे पदार्थ करून सण साजरा करण्याची चाल आहे. चैत्र शुद्ध ३ पासून गौरीउत्सव सुरू होतो तो या दिवशीं समाप्त होतो. या कारणानें सर्व स्त्रीसमाज एकमेकांच्या घरीं जाऊन हळदीकुंकू घेतांना दिसतो. या दिवसापासून लोक पाणी थंड करून पिण्यास सुरुवात करितात. अगोदर गार पाणी प्यालें तर त त्रासदायक होतें, याकरितां आमच्या पूर्वजांनीं पितरांना गार पाणी दिल्याशिवाय आपण गार पाणी पिऊं नये, असा निबंध घालून ठेविला आहे. कोणतीही गोष्ट आमच्या पूर्वजांनीं विचारपूर्वक करून ठेविली आहे. परंतु सांप्रत काळीं त्या गोष्टींचें महत्त्व आम्हांस वाटत नाहीं हें आमचें दुर्दैव होय!

---

# ३. नागपंचमी



श्रावण शुद्ध ५ ला नागाची पूजा करतात म्हणून त्या तिथीला नागपंचमी असें म्हणण्याचा प्रघात आहे. हा सण हिंदुस्थानांत बहुतेक ठिकाणीं पाळण्यांत येतो. या सणाची उपपत्तिः—

१. श्रीकृष्ण आपल्या सर्व सोबत्यांसह यमुनेच्या कांठीं खेळत असतां त्याचा चेंडू कळंबाच्या झाडावर अडकला. तेथून तो काढण्याकरितां कृष्ण झाडावर चढला; परंतु एकाएकीं झाडाची फांदी मोडून ती यमुनेच्या डोहांत पडली. त्या डोहांत कालिया नांवाचा एक मोठा विषारी सर्प राहात असे. त्याच्या श्वासोच्छ्वासानेंच सर्व जळून जावयाचें. अशी स्थिति असतांना त्या डोहांत श्रीकृष्ण सांपडले हें पाहून सर्व गोपाळांना फारच दुःख झालें. इकडे श्रीकृष्णानें आंत जाऊन त्या कालिया सर्पाची पुरी खोड मोडली व कांहीं वेळानें त्या कालियास वर काढलें. तो दिवस श्रावण शु० ५ च होता. श्रीकृष्ण कालीयासह वर आलेला पाहून सर्व गोप व गोपी आनंदानें नाचूं

लागल्या. त्या कालिया सर्पानच श्रीकृष्णाचें रक्षण केलें, असें समजून त्यांनीं त्यास दूध पाजिलें. त्या वेळेपासून दर वर्षीं कालिया सर्पाच्या स्मरणार्थ नागपूजा करण्याची वहिवाट पडली. (वस्तुतः श्रीकृष्णाचीच पूजा करणें जास्त योग्य होय.)

२. पूर्वीं नाग राजाच्या स्मरणार्थ हा सण पाळण्यांत आला असावा.

३. सर्पासंबंधानें एक कहाणी प्रसिद्ध आहे ती अशीः—

बंगाल्यांत मणिपूर म्हणून एक गांव आहे. तेथें एक अडाणी खेडवळ गृहस्थ राहात असे. त्यानें पंचमीच्या दिवशीं नांगरानें जमीन नांगरली, त्यामुळें त्या नांगराच्या फाळानें नागिणीच्या पिलांस त्रास पोंचून तीं सर्व पिलें मरण पावलीं. तेव्हां त्या नागिणीस फार राग येऊन तिनें त्या रात्रीं त्या गृहस्थाच्या सर्व मंडळींस दंश करून ठार मारिलें व ती त्या गृहस्थाच्या मुलीच्या गांवीं तिला दंश करण्या-करितां गेली. परंतु त्या मुलीनें पंचमीच्या दिवशीं पाटावर नाग काढून त्याची पूजा केली होती. हा प्रकार पाहतांच ती नागीण खुष झाली. तुझ्या बापानें माझ्या पिलांस मारिलें, म्हणून मी तुझ्या माहेरच्या सर्व माणसांस दंश करून ठार मारिलें असें तिनें त्या मुलीला सांगितलें. हें ऐकून त्या मुलीनें सर्व माणसांस जिवंत करण्याविषयीं तिची विनंति केली. ती विनंति मान्य करून त्या नागिणीनें त्या मुलीस अमृत दिलें. तें अमृत त्या माणसांच्या तोंडांत घातल्यावर तीं जिवंत झालीं. त्या वेळेपासून हा सण पाळण्यांत आला असावा अशी समजूत आहे.

**धार्मिक विधिः**—घरांतील सर्व मंडळींनीं प्रातःकाळीं लवकर उठावें. अंगास सुगंधयुक्त तेल लावून स्नानें करावीं. नंतर गंध, हळदकुंकू वगैरे मिश्रणांनीं पांच फणांचा नाग पाटावर काढावा अगर

केशरयुक्त चंदनानें भिंतीवर नाग व नागिणी काढावी; किंवा मातीची मूर्ति करून पूजा करावी. पूजा करतांना नव नागांचीं नांवें घेऊन फुलें वहावीं. ( नव नागांचीं नांवें:—**अनंत, वासुकि, शेष, पद्मनाभ, कंबल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक** आणि **कालिया.**) घरांतील सर्व मंडळींनीं फुलें, दूर्वा, लाह्या, वाटाणे, हरभरे वगैरे पदार्थ वहावे. अशा रीतीन पूजा केल्यावर उत्तम प्रकारचें भोजन करावें. मुलें व स्त्रिया यांनीं उत्तम प्रकारचा पोषाख करून आपल्या मित्र-मैत्रिणींसह तो दिवस मोठ्या आनंदानें घालवावा. वरील दिवशीं जमीन खणणें, पोळ्या भाजणें, जमिनींतून उपटून काढणें वगैरे प्रकार बंद करावे. जेथें वारूळ असेल तेथें जाऊन दूध ठेवावें व नमस्कार करावा. याप्रमाणें दरवर्षीं करीत जावें.

**रूढि:**—हा सण महाराष्ट्र, गुजरात, संयुक्त प्रांत व बंगाल प्रांत या ठिकाणीं पाळण्यांत येतो. कोठें कोठें मातीच्या नागाची पूजा करितात. कोठें भिंतीवर नाग काढून त्याची पूजा करितात. कोठें नागाच्या देवळांत जाऊन पूजा करितात, असे अनेक प्रकार दिसून येतात. या सणाच्या दिवशीं बायका पडवळासारखी भाजी चिरीत नाहींत. चुलीवर तवा ठेवीत नाहींत. कोणताही पदार्थ तळीत नाहींत. या दिवसाचें पक्वान्न म्हटलें म्हणजे पुरणाचीं दिंडें होत. तीं उकडून काढतात.

स्त्रिया हळदीकुंकू देतात. मुली झोंपाळ्यावर बसून गाणीं गातात. मुलें निरनिराळे खेळ खेळतात. मुख्यतः एखाद्या झाडाला दोर बांधून त्यावर झोंके घेणें हाच खेळ प्रसिद्ध आहे. कांहीं मोठ्या शहरांत गारुडी लोक घरोघर नाग आणतात. त्या नागावर हळदकुंकू टाकून दूध पाजण्यांत येतें. अशा प्रकारें दरवर्षीं नागाची पूजा केली म्हणजे त्यापासून भीति राहणार नाहीं.

---

## श्रावण शु० पौर्णिमा

या दिवशीं निरनिराळे सण प्रचारांत आहेत ते असेः—

१ श्रावणी म्हणजे यज्ञोपवीत धारण करण्याचा विधि.

२ पोवती पौर्णिमा अथवा राखी पुनव.

३ नारळी पौर्णिमा.

## ४. श्रावणी

श्रवण नक्षत्रावर ब्राह्मणांनीं उत्सर्जनोपाकर्म (श्रावणी) करावें. हें श्रवण नक्षत्र प्रायः श्रावण शु० पौर्णिमेस येतें, म्हणून त्या पौर्णिमेस श्रावणी पौर्णिमा असें म्हणतात. श्रावणी हस्त नक्षत्रावर अगर पंचमीस करितात, परंतु मुख्यतः श्रवण नक्षत्रावरच करणें जास्त योग्य होय.

उत्सर्जनोपाकर्म-(उपाकर्म—वेदारंभ व उत्सर्जन—वेदसमाप्ति.) उपाकर्म श्रावण महिन्यांत व उत्सर्जन पौष अगर माघ महिन्यांत करावें असें शास्त्रांत सांगितलें आहे. अलीकडे हीं दोन्हीं कृत्यें एकाच वेळीं उरकून घेण्याचा परिपाठ आहे. यज्ञोपवीत (जानवें) धारण करणें हें प्रत्येक धर्मकृत्यांत सांगितलें आहे; परंतु सध्यां श्रावणीचा खरा अर्थ जाऊन फक्त यज्ञोपवीत धारण करणें हाच अर्थ मुख्य होऊन बसला आहे!

**धार्मिक विधिः**—ज्या दिवशीं श्रावणी करावयाची असेल त्या दिवशीं सकाळीं स्नान करून उपनयन (मुंज) झालेल्या सर्व लहानथोर मंडळींनीं देवळांत, नदीकांठीं जमावें; बरोबर दर्भासन, स्वच्छ पाण्यानें भरलेला तांब्या, पळी-पंचपात्री, ताम्हण व पूजेचें सर्व साहित्य घ्यावें.

( विभाग ... ( क्रमांक ... नं.

याज्ञिक कर्माची माहिती ज्यास उत्तम असेल त्या ब्राह्मणास उपाध्याय करावें. ज्याच्या घरीं श्रावणी असेल त्यानें पुढीलप्रमाणें सामान तयार करून ठेवावें : दर्भ, पवित्रकें, दूर्वा, पंचगव्य, गोमय, भस्म, माती, तांदूळ, नारळ, सुपाऱ्या, तीळ, विडयाचीं पानें, पंचामृती पूजेचें सर्व सामान, समिधा, (पळस अगर औदुंबर) तूप, दहीं, चरु, (शिजलेला भात), सातूचें पीठ व होमाकरितांही लागणारें सर्व सामान तयार करावें. सर्व मंडळींनीं पूर्व, पश्चिम अगर उत्तर दिशेकडे तोंड करून करांगुलीच्या जवळच्या बोटांत पवित्रक घालावें. नंतर सर्व मंडळींनीं शरीरशुद्धीकरितां तीन वेळां पंचगव्य* घ्यावें (पंचगव्य–गाईपासून उत्पन्न झालेले पांच पदार्थ–दूध, तूप, दहीं, शेण, मूत्र). उपाध्यायानें प्रथम श्रीगणपतिपूजन करून होम करावा. त्या होमांत शिजविलेल्या भाताच्या २१ वेळां आहुति द्याव्या. मग सर्वांनीं मिळून ब्रह्मयज्ञ करावा. अशा रीतीनें पहिल्या होमाची समाप्ति करावी. नंतर पुन्हां आचमन करून शुद्धस्नान, भस्मस्नान, गोमयस्नान, मृत्तिकास्नान व शुद्धस्नान अशीं मंत्र म्हणून स्नानें करावीं. हीं स्नानें नदींत अगर तलावांत करणें जास्त प्रशस्त. परंतु हल्लीं जाग्यावरच मार्जनद्वारां (दर्भांनीं अंगावर पाणी शिंपडणें) स्नान करण्याचा परिपाठ आहे. तदनंतर उपाध्यायानें सप्तऋषींची पूजा करून सर्व मंडळींनींही गंधफुलें वहावीं व नमस्कार करावा. मग ऋषितर्पण व पितृतर्पण (ज्यांस अधिकार असेल त्यांनीं) करावें. येथें उत्सर्जन पुरें होऊन उपाकर्मास आरंभ होतो. एवढें कृत्य झाल्यावर दुसरा होम करावा. त्यांत २१ वेळां

---

*पंचगव्यः—तांबड्या गाईचें मूत्र ८ मासे, पांढऱ्या गाईचें शेण १६ मासे, पिवळ्या गाईचें दूध १२ मासे, निळ्या गाईचें दहीं १० मासे, काळ्या गाईचें तूप ८ मासे व पाणी ४ मासे असें प्रमाण घेऊन करावें.

दधिसक्तूंच्या पिठाच्या आहुति द्याव्या व प्रत्येकानें २ गोळ्या करून पाण्याबरोबर दांतांस न लावितां भक्षण कराव्या. ( वत्स व जामदग्न्य गोत्र असेल त्यांनीं ३ गोळ्या घ्याव्या. त्यांनाच पंचप्रवरी म्हणतात ) गोळ्या भक्षण केल्यावर यज्ञोपवीत अग्नीस अर्पण करून उपाध्यायास द्यावें. नंतर जितकीं यज्ञोपवीतें धारण करणें असतील तितकीं मंत्रांनीं अभिमंत्रण करून प्रत्येक यज्ञोपवीतास १० गायत्री याप्रमाणें जप करावा. जप झाल्यावर उजव्या हातांतून यज्ञोपवीत गळ्यांत घालावें व नंतर जुनें पायांतून काढून टाकावें. यज्ञोपवीतें धारण करणें तीं ब्रह्मचाऱ्यांनीं एक, गृहस्थांनीं दोन घालावीं. उपवस्त्र म्हणून तिसरें यज्ञोपवीत घालावें. परंतु ज्याचा बाप जिवंत असेल अगर वडील भाऊ असेल त्यांनीं तिसरें घालूं नये, हा अपवाद आहे. पण आयुष्यवृद्धीकरितां जास्त यज्ञोपवीतें घातलीं तरी चालतात. यज्ञोपवीतें घातल्यावर पुन्हां नुसता ब्रह्मयज्ञ करावा. नंतर अग्नीस गंधफूल घालून नमस्कार केल्यावर उपाध्यायास दक्षिणा देऊन त्याजकडून आशीर्वाद घ्यावा. शक्य असल तर त्या दिवशीं ब्राह्मणभोजन घालावें.

---

## ५. पोवती पौर्णिमा अथवा राखी पुनव

**धार्मिक विधि व रूढिः**—श्रावण शु० पौर्णिमेस राखी बांधावी असें शास्त्रांत सांगितलें आहे. प्रथम देवांस पोवतीं अर्पण करून मग गुरूस अर्पण करावीं. तदनंतर घरांतील सर्व मंडळींनीं हातांत पोवतीं बांधावीं.

उत्तर हिंदुस्थानांत व देशावर ही चाल विशेष आहे. तिकडील लोक ह्या पौर्णिमेस 'राखी पुनव' असें म्हणतात. रजपूत लोकांत

राखी बांधण्याची चाल सर्वत्र आहे. ती इतकी कीं, पुष्कळ स्त्रियांनीं आपल्या नवऱ्याच्या शत्रूला या दिवशीं मोठ्या युक्तीनें राखी बांधून, त्याच्याशीं बहिणीचें नातें लावून आपलें रक्षण करून घेतलें आहे. ही राखी बहिणीनें भावाला बांधावयाची असते. या प्रकारावरून मैत्री व परस्पर प्रेम वाढविण्यासाठींच हा विधि अस्तित्वांत आला असावा असें वाटतें.

---

## ६. नारळी पौर्णिमा

या दिवशीं समुद्रांत नारळ टाकण्याचा समारंभ होतो म्हणून या दिवसास नारळी पौर्णिमा म्हणतात.

**उपपत्तिः**—समुद्राचा राजा जो वरुण तो मेघगर्जना करूं लागला म्हणजे समुद्रांत वादळें उत्पन्न होतात. तीं वादळें बंद होण्याकरितां वरुणाची पूजा करून पूजेचा नारळ समुद्रांत टाकावा असें शास्त्रांत सांगितलें आहे. यावरून हा सण प्रचारांत आला असावा.

**धार्मिक विधि व रूढिः**—या सणाचें महत्त्व पूर्व व पश्चिम किनाऱ्यांवर राहणाऱ्या हिंदु लोकांत विशेष आहे. ते लोक सायंकाळीं मोठ्या समारंभानें समुद्रावर जातात व त्याची पूजा करून नारळ टाकितात. श्रीमंत व्यापारी सोन्याचा अथवा रुप्याचा नारळ करून समुद्रांत टाकतात.

मृग नक्षत्र लागलें म्हणजे पावसाळ्यास आरंभ होतो व समुद्रांत तुफान होतें, त्या वेळेस व्यापारी लोक आपलीं गलबतें किनाऱ्यावर शाकारून ठेवितात. पुढें श्रावण शु० पौर्णिमेस पावसाचा भर कमी होऊन पुन्हां व्यापार करण्याला सुरवात होते. त्या वेळेस समुद्राची

पूजा करून नारळ टाकितात. जलदेवतांनीं आगबोटी व जहाजें यांचें रक्षण करावें हा हेतु. गोव्यें प्रांतांत या पौर्णिमेस जें गलबत प्रथम बंदरांत येईल त्याजवरची जकात माफ करावी असा तेथील सरकारनें कायदा केला आहे.

---

## ७. गणेश चतुर्थी



भाद्रपद शुद्ध ४ स गणपतीची मूर्ति घरीं आणून तिची पूजा करितात, म्हणून त्या चतुर्थीस गणेश चतुर्थी म्हणतात. प्रत्येक पक्षांतील चतुर्थीस विशिष्ट नांवें आहेत. शुक्ल पक्षांतील चतुर्थीस **विनायकी** व कृष्ण पक्षांतील चतुर्थीस **संकष्टी**; पण तीच मंगळवारीं आली तर तिला **अंगारकी** म्हणतात. भाद्रपद व माघ महिन्यांतील चतुर्थी विशेष मानतात.

**उपपत्तिः**---एक दिवस पार्वती स्नानगृहामध्यें स्नान करीत असतां तेथें शंकर आले. तेव्हां पार्वती लाजली. त्यावर पार्वतीच्या सख्यांनीं सांगितलें कीं, दारावर एक मनुष्य ठेवावा म्हणजे कोणीही आंत येणार नाहीं. हें त्यांच वचन ऐकिल्यावर पार्वतीनें आपल्या आंगची मळी काढून त्याचा एक पुरुष तयार केला आणि त्यास आज्ञा केली कीं, तूं दरवाजावर बैस व माझ्या परवानगीवांचून कोणालाही आंत सोडूं नकोस. पुढें प्रत्येक दिवशीं शंकर येत, परंतु त्यांचा परवानगीवांचून आंत प्रवेश होत नसे. अशी शंकराची शोचनीय स्थिति झाल्यावर त्यास फार राग आला. त्या रागाच्या आवेशांत शंकरानें त्या पुरुषाचा वध केला. आपण उत्पन्न केलेल्या पुरुषाचा वध झालेला ऐकतांच पार्वती अत्यंत क्रुद्ध झाली व त्रैलोक्य जाळून टाकते कीं काय अशी सर्वांस भीति वाटूं लागली. तेव्हां नारदानें मध्यस्थी करून असें ठरविलें कीं, त्या पुरुषाला पुन्हां जिवंत करावें. नंतर शंकरानें आपल्या गणांस सांगितलें कीं, तुमच्या प्रथम जो दृष्टीस पडेल त्याचें शिर तोडून आणा. इतक्यांत गजासुर नांवाचा राक्षस लोकांस त्रास देण्यास निघाला होता तो त्यांच्या दृष्टीस पडला. त्याला पाहतांच त्याचें डोकें कापून आणून पार्वती-कृत पुरुषाच्या धडाला लाविलें. शिर लावल्यावर तो जिवंत झाला. तो दिवस भाद्रपद शु० ४ होता.

२. गजासुर हा महिषासुर याचा मुलगा. आपल्या बापास दवीनें मारिलें म्हणून तो देवीचा आणि देवांचा मत्सर करी. देवांचा नाश करण्याकरितां त्यानें शंकराची आराधना केली. शंकर प्रसन्न झाले व म्हणाले, "तुला ब्रह्मांडाचें राज्य मिळेल व कोणाच्याही हातून मरण येणार नाहीं." असा वर मिळाल्यामुळें तो गजासुर फार उन्मत्त झाला. शेवटीं शंकरावरही त्यानें

स्वारी करून त्यास पळवून लाविलें. प्रत्यक्ष शंकराची अशी स्थिति पाहतांच सर्व देव अरण्यामध्यें निघून गेले व तेथें श्रीगणपतीची ( आराध्य दैवत ) स्तुति करूं लागले. स्तुतीच्या योगानें श्रीगणपति प्रसन्न झाले व म्हणाले, "तुम्ही अगदीं भिऊं नका. मी अवतार घेऊन गजासुराचा वध करितों." पुढें कांहीं काळानें देवांस सांगितल्याप्रमाणें श्रीगणपतीनें अवतार घेतला. त्या गजासुराचा नाश करून सर्व देवांस सुखी केलें. तो दिवस भाद्रपद शु० चतुर्थीचा होता. सर्वांचें संकट नाहींसें झालें म्हणून सर्व लोकांनीं त्या वेळेस गणपतीची पूजा केली. तेव्हांपासून दर वर्षीं भाद्रपद शु० ४ स गणपतीची पूजा करण्याची चाल पडली. मुद्गल पुराणांत कथा आहे ती अशी:—

३. एके दिवशीं ब्रह्मदेव स्वस्थ बसले असतां त्यांस जांभई आली. जांभईतून एक तेजस्वी पुरुष उत्पन्न झाला. त्याचें नांव 'सिंदूर' असें ठेवण्यांत आलें. त्या सिंदुराला वरही दिला कीं, "तूं ज्याला आलिंगन देशील तो मरेल." हा वर ऐकून तो सिंदूर ब्रह्मदेवासच आलिंगन देण्याकरितां निघाला. सिंदूर आपल्याला मारण्याकरितां येत आहे हें पाहून ब्रह्मदेव फार रागावला व "तुला एकदंताच्या हातून मृत्यु येईल" असा शाप देऊन आपण वैकुंठास पळून गेला. त्याच्या मागोमाग सिंदूरही वैकुंठास गेला. श्रीविष्णूनें नम्रपणानें सांगितलें कीं, आम्ही तुला शरण आलों आहों, तूं शंकराकडे जा. तो सर्वांचा नाश करणारा आहे. हें ऐकून सिंदूर कैलासाला गेला. तेथें जाऊन पाहतो तों शंकर ध्यानस्थ बसले आहेत. इतक्यांत त्याचें लक्ष पार्वतीकडे गेलें. पार्वतीचें तें मोहक स्वरूप पाहून सिंदुरासुर तिला उचलून नेऊं लागला. त्या वेळेस पार्वतीनें गणपतीची ( आराध्य दैवत ) स्तुति केली. गणपति प्रसन्न होऊन, "तुमच्या पोटीं जन्म घेऊन सिंदुराचा वध

करीन." असें त्यानें पार्वतीस अभयवचन दिलें. त्या वचनाप्रमाणें पार्वतीच्या उदरीं गणपतीनें प्रवेश केला. कांहीं महिने गेल्यावर सिंदुरासुरानें पार्वतीच्या उदरांतील गर्भाच्या मस्तकाचा छेद करून तें मस्तक नर्मदा नदींत टाकून दिलें. यावरूनच नर्मदा नदीचें पाणी तांबडें झालें आहे व त्यांतील दगडही लाल झाले आहेत. त्या दगडांनाच 'नर्मदे गणपति' असें म्हणतात.

पूर्ण दिवस भरल्यावर पार्वती प्रसूत झाली. परंतु त्या मुलाला मस्तक नव्हतें. इकडे इंद्राचा ऐरावत मत्त झाला होता, त्याचें डोकें श्रीविष्णूनें कापून आणून त्या मुलाला लाविलें. त्यावरून त्याचें 'गजानन' असें नांव ठेवण्यांत आलें. पुढें त्या गजाननानें सिंदुरासुरास ठार मारून सर्वांचें संकट नाहींसें केलें, तें भाद्रपद शु० ४ च्या दिवशीं. म्हणून त्या दिवशीं पूजा करण्याची चाल पडली.

**धार्मिक विधि व रूढि**:—भाद्रपद शु० ४ च्या दिवशीं पहांटेस उठून सुगंधयुक्त तेल लावून स्नान करावें व आपआपलीं नित्यकर्में असतील तीं उरकावीं. नंतर घरांतील वडील माणसानें श्रीगणपतीची सोन्या-रुप्याची अगर मातीची मूर्ति आणून पूर्व, पश्चिम अगर उत्तर दिशेकडे तोंड करून ठेवावी. त्या ठिकाणीं उत्तम प्रकारची आरास करावी, फुलझाडांच्या कुंड्या ठेवाव्या, रांगोळी घालावी, निरनिराळीं फळें मांडून ठेवावीं. पूजेकरितां रक्तचंदन, दूर्वा, सुवासिक फुलें, तुळस (फक्त गणेश-चतुर्थीच्या दिवशीं वाहतात), केतकी, शमी, शेंदूर, निरनिराळी एकवीस प्रकारची पत्री, बुक्का व पंचामृती पूजेला लागणारे सर्व पदार्थ तयार करून ठेवावे.

अशी तयारी झाल्यावर स्वतः अगर उपाध्यायाकडून पूजा म्हणवून महाभिषेक करवून भक्तिपूर्वक सोळा उपचारांनीं* पूजा

***सोळा उपचार**:—आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन,

करावी; नंतर आरत्या म्हणाव्या. आरत्या म्हटल्यावर घरांतील लहानथोर मंडळींनीं शमी वगैरे पदार्थ वहावे व नमस्कार करावा. इतकें झाल्यावर ब्राह्मणासह मोदकांचें भोजन करावें. (गणपतीस मोदक फार प्रिय आहेत.) भोजन झाल्यावर स्त्रियांनीं गाणीं म्हणावीं, फुगड्या वगैरे खेळ खेळावे व लहान मुलांनीं मनाला आनंद देणारे खेळ खेळावे. अशा रीतीनें सर्व मंडळींनीं तो दिवस मोठ्या आनंदांत घालवावा. सायंकाळीं इष्टमित्र बोलावून धूपारती करावी. शक्ती-प्रमाणें दीड, पांच, सात अगर दहा दिवस गणपति ठेवावा. रोज त्रिकाल अगर दोन वेळां पूजा करून मोठ्या उत्साहानें उत्सव साजरा करावा. शेवटीं त्या मूर्तीची उत्तरपूजा करून सर्वांच्या कल्याणाची मागणी करावी. नंतर पालखींत किंवा डोक्यावर मूर्ति घेऊन वाजतगाजत समुद्रावर अगर दुसऱ्या ठिकाणीं नेऊन विसर्जन करावें. विसर्जनाच्या वेळचा थाट मुंबई व पुणें येथें अवर्णनीय असतो. मुद्दाम बाहेरगांवचे लोक थाट पाहण्याकरितां येतात.

गणेश-चतुर्थीच्या दिवशीं चंद्राचें दर्शन घेऊं नये असें पुराणांत सांगितलेलें आहे. ह्याचें कारण : चंद्रानें गणपतीचें तें विक्राळ स्वरूप पाहून आपण हत्तीचें तोंड कां धारण केलें असा थट्टेनें प्रश्न विचारला. प्रथम गणपतीनें दुर्लक्ष केलें, परंतु तो पुन्हां पुन्हां तोच प्रश्न विचारूं लागला. तेव्हां गणपतीनें रागावून शाप दिला कीं, 'तूं ज्याच्या दृष्टीस पडशील ते पापी होतील व पुष्कळ संकटें भोगतील.' हा शाप ऐकून चंद्रास फार वाईट वाटलें. नंतर त्यानें तपश्चर्या करण्यास सुरवात केली. शेवटीं गणपति प्रसन्न झाले व म्हणाले,

---

स्नान, वस्त्र, यज्ञोपवीत, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, नमस्कार, प्रदक्षिणा व मंत्रपुष्प.

"ज्या दिवशीं तूं माझा उपहास केलास त्या दिवशींच फक्त तुला कोणीं पाहूं नये; कारण तो दिवस माझा फार आवडता आहे." ( भाद्रपद शु० ४ )

तसेंच चंद्राची स्तुति ऐकून त्याला वर दिला कीं, "तूं माझ्या भालप्रदेशीं राहाशील व प्रत्येक कृष्ण-चतुर्थीला लोक तुझें दर्शन घेऊन मगच माझ्या व्रताची सांगता करतील. त्याचप्रमाणें प्रत्येक शु. २ स लोक तुला नमस्कार करतील."

भाद्रपद शु. ४ चा चंद्र पाहिला म्हणून संकट प्राप्त झालें याबद्दलची हरिविजयांत कथा आहे ती अशी:—

सत्राजित नांवाचा एक यादव सूर्यभक्त होता. सूर्यानें त्याची भक्ति पाहून त्याला अत्यंत तेजस्वी असा स्यमंतक मणि दिल. त्या मण्यापासून रोज पुष्कळ सोनें उत्पन्न होत असे.

श्रीकृष्णाला तो स्यमंतक मणि राजाला अर्पण करण्याकरितां पाहिजे होता म्हणून त्यानें सत्राजिताकडे मागणी केली, परंतु सत्राजितानें तो मणि देण्याचें नाकारलें. पुढें कांहीं दिवसांनीं सत्राजिताच्या भावानें तो मणि कंठांत घातला व तो मृगयेकरितां निघून गेला. तेथें एका सिंहानें त्याला ठार मारिलें. सिंहाला एका अस्वलानें (जांबुवंत) ठार मारून त्यानें तो मणि आपल्या घरीं आणिला. आपला भाऊ परत आला नाहीं असें पाहून श्रीकृष्णानेंच भावाला ठार मारून मणि नेला असावा असा सत्राजितानें तर्क केला व लोकांत तो तसें बोलूं लागला.

श्रीकृष्णाला वरील वर्तमान कळलें तेव्हां तो मण्याच्या शोधार्थ निघाला. शोधाअंतीं त्याला कळलें कीं, जांबुवंताच्या घरीं तो मणि आहे; तेव्हां जांबुवंताशीं युद्ध करून तो मणि व त्याची कन्या

जांबुवंती अशी घेऊन आपल्या नगरास परत आला. परत आल्यावर त्यानें तो मणि सत्राजिताकडे पाठवून दिला.

आपण श्रीकृष्णावर खोटाच आरोप केला याबद्दल सत्राजितास अत्यंत वाईट वाटलें. शेवटीं त्यानें आपली मुलगी सत्यभामा कृष्णास देऊन त्याच्याशीं प्रेम संपादन केलें. लग्नांत तो मणि आंदण दिला. कृष्णानें तो मणि घेतला नाहीं. उलट सत्राजितास म्हणाला कीं, " तूं सूर्यभक्त आहेस; तरी तो मणि तुझ्याजवळ असणें जास्त योग्य आहे. "

श्रीकृष्णानें गणेश-चतुर्थीच्या दिवशीं चंद्राचें दर्शन घेतलें म्हणून त्याच्यावर खोटा आरोप आला व संकटहि प्राप्त झालें. म्हणून भाद्रपद शु० ४ ला चंद्रदर्शन करूं नये; झालेंच तर पुढील श्लोक २८ वेळां म्हणावाः—

सिंहः प्रसेनवत्रधीत्सिंहो जांबवता हतः ॥
सुकुमारकमारोदीस्तव ह्येष स्यमंतकः ॥

**सार्वजनिक गणपतीचें महत्त्वः**— हल्लीं ६० वर्षांपासून सार्वजनिक गणपति ठेवण्याची चाल सुरू आहे. ही चाल विशेषतः मुंबई–पुणें या शहरांत प्रथम सुरू झाली. कारण तेथील बहुतेक लोक बाहेरगांवचे राहणारे असतात. याकरितां त्यांच्या घरोवर गणपति-पूजन होत नसतें. यामुळें एकत्र जमून श्रीगणपतीची सेवा करण्याची संधि त्यांस या उत्सवानें प्राप्त होते. सार्वजनिक गणपतीचे आद्य-प्रवर्तक लो० टिळक होत.

सार्वजनिक गणपतीपासून संघशक्ति उत्पन्न होते, एकमेकां-विषयीं प्रेम वाढतें व संघशक्तीमुळेंच कोणतेंही मोठें कार्य तडीस जातें. हल्लीं सार्वजनिक गणपतीपुढें मेळे, कथा, पुराणें, पोवाडे, व्याख्यानें व लहान मुलांचीं भाषणें वगैरे प्रकार होत असतात. मेळ्यांचीं पदें

प्राय: भक्तिरस उत्पन्न करण्यासारखीं असावीं; परंतु अलीकडे राष्ट्रीय विषयावर व इतर चालू चळवळीवरच तीं रचण्याची पद्धत सुरू झाली आहे. अशा पदांचा परिणाम लोकांच्या मनावर चांगला होतो. त्यामुळें अंगांत एक प्रकारची तेजस्विता उत्पन्न होऊन कोणतेंही कार्य तडीस नेण्याची प्रवृत्ति उदयास येते.

गणपति ठेवण्यापासून आमच्या चित्रकलेस उत्तेजन दिल्यासारखें होणार आहे. गेल्या ३५ वर्षांपासून मुंबई शहरांत गणपतीच्या दिवसांत चित्रांचीं प्रदर्शनें उघडण्याचा परिपाठ सुरू आहे. त्यांत रा. गोखले यांचीं मातीचीं व रा. फडके यांचीं मेणांचीं चित्रें पाहाण्यासारखीं असतात.

**मनुष्यमात्राचें कर्तव्य**:—गणपति हा *चौदा विद्या व चौसष्ट कला ( स्थलसंकोचामुळें सांगितल्या नाहींत ) यांनीं युक्त असल्यामुळें त्याच्या कृपेनें आपणांस चांगली विद्या व चांगली बुद्धि प्राप्त होते. याकरितां याची आराधना करून त्याला प्रसन्न करून घेणें हें प्रत्येक मनुष्यमात्राचें पहिलें कर्तव्य होय. तसेंच कोणतेंही कार्य ( लहान अगर मोठें ) निर्विघ्नपणें तडीस जाईलच असा भरंवसा नसल्यामुळें प्रत्येक कार्याच्या आरंभीं विघ्नहर्त्या गजाननाची प्रार्थना करण्याची चाल आज पुरातन काळापासून सुरू आहे. एकंदरींत पाहिलें असतां पुष्कळच गोष्टी एका गणपति उत्सवापासून साध्य होणाऱ्या आहेत. करितां हा उत्सव करण्याकडे प्रत्येक मनुष्यानें आपलें तनमनधन खर्च करणें अवश्य आहे.

---

* **चौदा विद्या**:—चार वेद, सहा अंगें ( शिक्षा, व्याकरण, कल्प, निरुक्त, छन्द, ज्योतिष ), पुराणें, मीमांसा, न्याय, धर्मशास्त्र.

# ८. विजयादशमी



हा सण आश्विन शु० १० ला येतो. याचें महत्त्व फार आहे. कारण हा साडेतीन मुहूर्तांपैकीं एक आहे. या दिवशीं कोणतेंही नवें काम करण्यास लोक प्रारंभ करितात. लहान मुलांकडून या दिवशीं व गुढीपाडव्याच्या दिवशीं सरस्वती (विद्यादेवी) पूजन करवून शिक्षणास आरंभ करण्याची चाल आहे.

**उपपत्तिः**—१. श्रीरामचंद्रांचा पणजा रघुराजा सर्व दिशांच्या राजांस जिंकण्यासाठीं याच दिवशीं निघाला.

२. श्रीरामचंद्रहि याच दिवशीं रावणाचा वध करण्याकरितां निघाले.

३. पांडव अज्ञातवासांत राहण्याकरितां म्हणून विराटाच्या घरीं गेले. या वेळेस त्यांनीं आपलीं शस्त्रें अरण्यांत शमीच्या झाडावर ठेविलीं होतीं–शेवटीं अज्ञातवास संपल्यावर त्यांनीं तेथील शस्त्रें परत घेतलीं व शमीची पूजा केली. तो दिवस आश्विन शु० १० होता.

४. मैठण शहरांत देवदत्त नांवाच्या एका ब्राह्मणास कौत्स नांवाचा एक मुलगा होता. तो वरतंतु ऋषीकडे वेदाभ्यास करण्याकरितां गेला. कांहीं दिवसांनीं कौत्स हा सर्व शास्त्रांत निपुण झाला. शेवटीं घरीं जातांना गुरुदक्षिणा काय द्यावी म्हणून कौत्सानें गुरुजींस प्रश्न केला. गुरुजींनीं दक्षणा नको म्हणून सांगितलें. परंतु कौत्साचा फारच आग्रह पाहून प्रत्येक विद्येबद्दल एक कोटि मुद्रा याप्रमाणें चौदा कोटि मुद्रा एकाजवळून आणून द्याव्या असें सांगितलें. त्याप्रमाणें गुरूचें भाषण श्रवण करून तो रघुराजाकडे गेला. परंतु रघुराजानें विश्वजित यज्ञ करून सर्व भांडार ब्राह्मणांकडून लुटविलें असल्यामुळें १४ कोटि मुद्रा देण्यास तो असमर्थ होता. तेव्हां कौत्स दुसरीकडे जावयास निघाला. यामुळें रघुराजानें तीन दिवसांत चौदा कोटि मुद्रा देतों असें सांगितलें.

इकडे रघुराजानें आपला वसूल करण्याकरितां इंद्रावर स्वारी करण्याचें ठरवून या दिवशीं प्रयाण केलें तोंच रात्रौ इंद्रानें शहराबाहेर आपट्यांच्या व शमीच्या झाडांवर कुबेराकडून सुवर्णमुद्रांचा पाऊस पाडविला. (झाडावर पाऊस पाडविला त्यापेक्षां त्या झाडापासून मुद्रा मिळाल्या हें जास्त सयुक्तिक दिसतें.) नंतर रघुराजानें त्या सर्व मुद्रा कौत्सास दिल्या. कौत्स मुद्रा घेऊन वरतंतु ऋषींकडे आला व गुरुदक्षिणा म्हणून मुद्रा घ्या अशी विनंति करूं लागला. परंतु वरतंतु ऋषींनें त्यांपैकीं १४ कोटि मुद्रा घेऊन बाकीच्या परत घेऊन जाण्यास सांगितलें. त्या मुद्रा कौत्सानें परत रघुराजाकडे आणून दिल्या, परंतु रघुराजा त्या घेईना. शेवटीं त्या मुद्रा आपट्याच्या व शमीच्या झाडाखालीं ठेवून लोकांस लुटण्यास सांगितल्या. लोकांनीं त्या झाडाची पूजा करून मनास वाटेल तितकें सोनें घरीं आणिलें. तो दिवस आश्विन शु० १० होता. त्या

वेळेपासून ह्या झाडाची पूजा करून सोन्याऐवजीं पानें लुटण्याची वहिवाट पडली असावी.

५. महिषासुर दैत्यानें पृथ्वीवरील सर्व लोकांस त्रासवून सोडिलें. त्या वेळेस परमेश्वरानें अष्टभुजा देवीच्या रूपानें त्या राक्षसाशीं आश्विन शु० १ पासून दशमीपर्यंत दहा दिवस युद्ध करून त्यास ठार मारून विजय मिळविला. म्हणून या दिवसाला विजयादशमी असें नांव पडलें.

**धार्मिक विधिः**—आश्विन शु० १० च्या दिवशीं उच्चैःश्रवा नामक देवांच्या घोड्यांची पूजा करावी. त्याप्रमाणें ज्यांच्या घरीं हत्ती, घोडे, राजचिन्हें व वस्त्रें असतील त्यांनीं त्यांची पूजा करावी. तसेंच ग्रंथ, जुन्या पोथ्या व हत्यारें यांचीही पूजा करावी. या दिवशीं अपराजिता देवीचें पूजन, सीमोल्लंघन व शमीची पूजा हीं कृत्यें करण्याची चाल आहे. गांवच्या ईशान्य दिशेस जाऊन शमी नसेल तर आपट्याच्या झाडाची पूजा करावी. नंतर त्या शमीचीं अगर आपट्याचीं पानें तोडून आणून तीं सोनें म्हणून इष्टमित्रांस वांटावीं व घरीं परत यावें. घरीं आल्यावर बहिणीकडून ओंवाळून घ्यावें. अशा रीतीनें सर्व दिवस आनंदांत घालवावा.

**रूढिः**—दसऱ्याच्या दिवशीं सकाळीं लवकर उठून सुगंधयुक्त तेल अंगास लावून स्नान करावें. नंतर कपाळास केशरी गंध लावून नवीन कपडे व अलंकार धारण करावे. नंतर सरस्वतीची व पोथ्यांची पूजा करून दुपारीं इष्टमित्रांसह सुग्रास भोजन करावें. भोजन झाल्यावर लहान मुलांमुलींनीं आपआपले खेळ खेळावे. सायंकाळीं चांगला पोषाख करून सीमोल्लंघन करण्याकरितां गांवाच्या ईशान्य दिशेकडे जावें. तेथें गेल्यावर शमीची अगर आपट्याची पूजा करून त्याचीं पानें लुटावीं. त्या पानांना सोनें असें म्हणतात. तें सोनें इष्टमित्रांस

वांटावें. अशा रीतीनें सोनें वांटून झाल्यावर घरीं यावें. घरीं आल्यावर मुख्यतः बहिणीकडून ओंवाळून घ्यावें व ओंवाळणीबद्दल आणलेलें सोनें घालावें. पूर्वीं खरोखरीचें सोनें घालण्याची चाल होती. सांप्रत काळीं ती चाल बंद पडून आपट्याचीं पानें घालण्याची पाळी आम्हां हिंदवासीयांवर आली हें आमचें दुर्दैव होय ! असो. या दिवशीं कांहीं ठिकाणीं बकरे व रेडे बळी देण्याची चाल आहे; परंतु हल्लीं ती हळूहळू कमी होत चालली आहे.

अलीकडे या दिवशीं पुष्कळ गांवांतून आणि संस्थांतून संमेलन भरविण्याची पद्धत सुरू झाली आहे. बडोदें, इंदूर, ग्वाल्हेर वगैरे संस्थानांत या दिवशीं मोठ्या समारंभानें सभा भरवितात व लोकांस बक्षिसें वांटतात. त्याचप्रमाणें हत्तीवर राजाची स्वारी बसून गांवभर मिरवणूक काढितात. ती अत्यंत प्रेक्षणीय असते. त्याकरितां बाहेर-गांवचे लोक मुद्दाम पाहण्याकरितां जातात. पूर्वीं पेशवाईच्या वेळीं विजयादशमीचा थाट अवर्णनीय असे.

**सीमोल्लंघनः**—( सीमा + उल्लंघन = सीमा ओलांडणें ) पूर्वीं राजे लोक याच दिवशीं परशत्रूवर स्वारी करण्याकरितां निघत असत व स्वारी करून मिळालेल्या द्रव्यापैकीं कांहीं द्रव्य बहिणीस ओंवाळणी म्हणून घालीत असत.

**सणाचा उद्देशः**—या सणाचा उद्देश सीमेचें उल्लंघन करणें हाच होय. परंतु सीमेचें नुसतें उल्लंघन न करतां कांहीं तरी पराक्रम करून दाखविणें अवश्य आहे. सांप्रत काळीं परराष्ट्रावर स्वारी करण्याकरितां सीमा उल्लंघन करावयास नको. परंतु दुसऱ्या कांहीं बाबतींत आपणांस उल्लंघन करणें जरूर आहे.

**उदाहरणार्थः**—आपल्या राष्ट्रांत जिकडे तिकडे दारिद्र्य पसरलें आहे, तरी कांहीं औद्योगिक प्रयत्न करून त्या दारिद्र्याची सीमा

ओलांडणें हें आज अवश्य आहे. त्याचप्रमाणें अज्ञानाचें, अशक्ततेचें व आलस्याचें सीमोल्लंघन करणें आजच्या परिस्थितीस योग्य आहे.

---

# दिवाळी

## ९. धनत्रयोदशी (पहिला दिवस)

आश्विन वद्य १३ पासून कार्तिक शुद्ध २ पर्यंत दिवाळी हा सण पाळतात. याच्या इतका मोठा व महत्त्वाचा सण हिंदु लोकांत दुसरा नाहीं. दिवाळी म्हणजे दिव्यांची ओळ असा अर्थ आहे. या सणांत पुष्कळ दिवे लावून आरास करण्याची चाल सर्वत्र आहे. दिवाळीच्या पहिल्या दिवसाला धनत्रयोदशी अगर धनतेरस म्हणतात.

या दिवशीं सर्व लोक आपल्या घरासमोर दिवे लावतात. मुलें फटाके मारण्यांत दंग झालेलीं असतात. स्त्रिया दुसऱ्या दिवशींच्या फराळाचें सामान करण्यांत गर्क झालेल्या असतात, व्यापारी लोक आपलीं दुकानें साफ करून आरास करण्यांत तत्पर झालेले असतात. एकंदरींत सर्व जनसमुदाय कोणत्या ना कोणत्या तरी कामांत गर्क झालेला असतो व जिकडे तिकडे आनंदीआनंद दिसतो. धनत्रयोदशीसंबंधानें एक कथा आहे ती अशीः—

एकदां यमराजानें आपल्या दूतांस प्रश्न केला कीं, "लोकांचे प्राण हरण करण्याचें काम करीत असतां तुम्हांस कोणाची दया आली होती काय?" त्यावर दूतांनीं उत्तर केलें, "एकदां इंद्रप्रस्थ शहराचा राजा हंस हा मृगयेकरितां रानांत फिरत असतां भूक,

तहान व श्रम यांनीं व्याकुळ झाला. अशी स्थिति झाल्यावर शोध करीत करीत तो हैम नांवाच्या राजाकडे गेला. हैम राजानें त्याचें उत्तम स्वागत केलें. हैम राजा त्या वेळेस पुत्रसंतति प्राप्त झाल्यामुळें आनंदांत होता. त्या दिवशीं त्याच्या घरीं षष्ठीपूजन असल्यामुळें षष्ठीदेवी स्त्रीरूपानें प्रगट झाली व राजास म्हणाली कीं, "या मुलाचें लग्न झाल्यानंतर चवथ्या दिवशीं हा सर्पदंश होऊन मरण पावेल." हे शब्द ऐकून राजास फार वाईट वाटलें व आलेल्या हंस राजासही परम दुःख झालें. त्यानें त्या मुलाचा अपमृत्यु टाळण्याकरितां पुष्कळ प्रयत्न केले. शेवटीं एका सरोवरांत मधोमध खांब पुरून त्यावर एक बंगला बांधून त्यांत त्या मुलाला ठेविलें. परंतु देवीनें सांगितल्याप्रमाणें त्या मुलाचें लग्न झाल्यानंतर चवथ्या दिवशीं त्याला सर्पदंश होऊन तो मरण पावला. हे यमराजा, या वेळेस त्या मुलाचे प्राण हरण करते वेळीं आम्हांस दया आली. असा प्रसंग कोणावरही येऊं नये असें जर आपण कराल तर लोकांवर फारच उपकार होतील." हें दूतांचें भाषण श्रवण करून यमराजानें सांगितलें कीं, "आश्विन वद्य १३ पासून पांच दिवस जो दिवे लावील त्यास केव्हांही अपमृत्यु येणार नाहीं."

---

## १०. नरक-चतुर्दशी (दुसरा दिवस)

आश्विन वद्य चतुर्दशीस नरक चतुर्दशी म्हणतात. त्यासंबंधानें कथा आहेत त्या अशाः—

**उपपत्तिः**—१. नरकासुर या नांवाचा दैत्य फार बलिष्ठ झाला होता. त्यानें सर्व मानव राजांस जिंकिलें होतें; इतकेंच नव्हे, तर

इंद्राचीं छत्रचामरेंसुद्धां हिरावून घेतलीं होतीं. यामुळें तो सर्वांस अजिंक्य झाला होता. हें वर्तमान श्रीकृष्णाला समजतांच त्यानें आपली स्त्री सत्यभामा हिला बरोबर घेऊन, तिच्या हातांनीं त्याचा आश्विन वद्य चतुर्दशीस तीन प्रहर रात्रीस चंद्रोदयीं वध करविला. नंतर श्रीकृष्ण चतुर्दशीच्या दिवशीं पहांटेस आपल्या स्त्रीसह तो परत नगरास आला. त्या वेळेस सर्व लोकांनीं त्याला स्नान घालून स्त्रियांनीं दिवे ओवाळले व जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. त्या युद्धाची आठवण म्हणून हा दिवस पाळण्यांत येतो.

नरकासुरानें आपला उद्धार होण्याकरितां श्रीकृष्णाकडून, "या दिवशीं सर्व लोकांनीं पहांटेस मंगल स्नानें करावीं" असा वर मागून घेतला.

२. श्रीविष्णूनें वामनावतार घेऊन बलिराजास पाताळीं दडपिलें तो हाच दिवस होय.

बलिराजाची निष्ठा व उदारपणा पाहून श्रीविष्णु प्रसन्न झाले व 'वर माग' असें म्हणाले. त्या वेळेस बलिराजानें "तीन अहोरात्र माझें राज्य असो" असा वर मागितला. शिवाय "या दिवसांत जे लोक आपल्या घरीं दिवे लावतील त्यांच्या घरीं लक्ष्मी नेहमीं वास करो व नरकाचे ठिकाणीं जे लोक दिवे लावतील त्यांच्या पितरांचा नरकापासून उद्धार होवो" असेंही मागून घेतलें. तेव्हांपासून ही चाल पडली असावी.

**धार्मिक विधि व रूढि:**—पहांटेस (शेवटच्या प्रहरीं) लवकर उठून जिकडे तिकडे दिवे लावावे. दिवे लावल्यानंतर घरांतील सर्व लहानथोर मंडळींनीं उटणें व सुगंधयुक्त तेल अंगास लावून (लाववून) गरम पाण्यानें स्नानें करावीं. स्नान आटोपतांच डाव्या पायानें नरकासुर म्हणून कारटें फोडावें. तसच लहान मुलांनीं स्नान करीत

असतांना फटाके उडवावे. तदनंतर स्त्रियांकडून दिवे ओवाळून घ्यावे. निरनिराळीं अत्तरें घेऊन देवपूजा करावी. पूजा झाल्यावर कपाळास केशरी गंध लावावें. इष्टमित्रांसह उत्तम प्रकारचा फराळ करावा. नंतर चांगला पोशाख व दागदागिने घालून देवदर्शनास जावें. दुपारीं मिष्टान्नभोजन करावें. भोजन झाल्यावर निरनिराळे खेळ खेळून करमणूक करून घ्यावी. अशा रीतीनें सर्व दिवस आनंदांत घालवावा. रात्रीं दिवे लावून आरास करावी.

---

## ११. लक्ष्मीपूजन ( तिसरा दिवस )



आश्विन वद्य अमावास्येस लक्ष्मीपूजन करितात. त्यासंबंधानें कथा आहे ती अशीः—

बलिराजानें आपल्या पराक्रमानें सर्व देवांस कैदेंत ठेविलें होतें. इतकच नव्हे, तर प्रत्यक्ष भगवंतांच्या पत्नीस म्हणजे लक्ष्मीसही कैदेंत ठेविलें होतें. त्या वेळेस श्रीविष्णूनें वामनावतार घेऊन बलीपासून तीन पावलें जमीन मागून घेऊन, त्याला पाताळांत दडपिलें व सर्व देवांची मुक्तता केली. त्याजबरोबर लक्ष्मीचीही सुटका झाली. तो दिवस आश्विन वद्य अमावास्या होय. लक्ष्मीची सुटका झालेली पहातांच सर्वांस आनंद झाला व त्यांनीं भगवंताकडून मागणें मागून घेतलें कीं, "लक्ष्मीच राहाणें प्रत्येकाच्या घरीं असावें." याकरितां वरील दिवशीं तिची पूजा करण्याचा प्रघात पडला.

हल्लीं सर्वच लोक लक्ष्मीपूजन घरोघरीं करतात असें नाहीं. फक्त व्यापारी व श्रीमंत लोक आपल्या हिशेबाचा आढावा तयार करून लक्ष्मीचें पूजन करितात. मुंबई येथें व्यापाऱ्यांचा भरणा पुष्कळ असल्यामुळें लक्ष्मीपूजनाचा समारंभ शहरांत मोठ्या थाटानें साजरा करण्यांत येतो.

---

## १२. बलिप्रतिपदा (चौथा दिवस)

कार्तिक शु० प्रतिपदा हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकीं अर्धा दिवस आहे असें मानतात. या दिवसाला बलिप्रतिपदा असें म्हणतात. त्यासंबंधानें कथा आहे ती अशी:—

श्रीविष्णूनें वामनावतार घेऊन बलीस पाताळांत दडपिलें; त्या वेळेस बलीच्या विनंतीवरून त्याला वर दिला कीं, "कार्तिक शु० १ च्या दिवशीं तुझ्या नांवानें लोक आनंदीआनंद करतील व त्या दिवसाला बलिप्रतिपदा असें म्हणतील."

**विधि व रूढि:**—बलिप्रतिपदेच्या दिवशीं बलीचें त्याच्या स्त्रीसह चित्र काढून पूजा करावी व जिकडे तिकडे दिवे लावावे. देशावर या दिवशीं शेणाच्या बाहुल्या करून त्यांची पूजा करण्याची चाल आहे. ह्या दिवशीं विक्रम संवत् सुरू होत असल्यामुळें व्यापारी लोक नवीन वर्षारंभ समजतात व आपल्या हिशोबाचा आढावा काढतात. तसेंच नवीन कीर्द व खतावणी सुरू करितात.

---

## १३. यमद्वितीया—भाऊबीज (पांचवा दिवस)



कार्तिक शु० द्वितीयेला यमद्वितीया किंवा भाऊबीज म्हणतात. त्यासंबंधानें कथा आहे ती अशी:—

यमराजानें आपली बहीण जी यमुना तिच्या घरीं जाऊन तिला वस्त्रें, दागिने वगैरे देऊन भोजन केलें, म्हणून या दिवसाला यमद्वितीया म्हणतात.

या दिवशीं बहिणीकडून भावाची पूजा होते व भाऊ आपल्या शक्तीप्रमाणें तिला देणगी देतो. म्हणून या दिवसाला भाऊबीज असेंही म्हणतात. ( भाऊ + बीज = दोन – द्वितीया )

आपली सख्खी बहीण नसेल तर चुलत, आते किंवा मामे बहिणी-कडून ओंवाळून घ्यावें व आपल्या ऐपतीप्रमाणें दागदागिना, वस्त्र अगर दुसरें कांहीं तरी तिला द्यावें. या दिवशीं घरीं जेवूं नये, मुख्यतः आपल्या बायकोच्या हातचें जेवूं नये, असें धर्मग्रंथांत सांगितलें आहे.

**रूढिः**—हिंदु लोकांत पुष्कळ सण आहेत, परंतु दिवाळी-इतका मनाला आनंद देणारा दुसरा सण नाहीं असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं. दुसरे सण एकाच दिवसापुरते असतात, परंतु दिवाळीचा सण पांच दिवसांचा असतो. या सणांत पुरुष, स्त्रिया व मुलें या सर्वांस अत्यंत आनंद वाटत असतो. दिवाळीमध्यें इष्टमित्रांकडे जाण्याची व तेथें जाऊन फराळ करण्याची चाल असल्यामुळें एकमेकांत प्रेम वाढत जातें. या सणांत नवीन जांवई आपल्या सासुरवाडीस ‘ दिवाळसणा ’करितां जातात. त्याप्रमाणें पुष्कळ स्त्रियाही मुलांसह आपल्या माहेरीं येतात. एकंदरींत पाहिलें असतां मनुष्य शक्य तितक्या रीतीनें व ऐपतीप्रमाणें हा सण साजरा करीत असतो.

**सांप्रतचें स्वरूपः**—मुंबई शहरांत हा सण मोठ्या प्रमाणानें साजरा करण्यांत येतो. हल्लीं विजेच्या रोषणाईमुळें सर्व मुंबई शहर शोभिवंत दिसतेंच. त्यांत दिवाळीसारखा सण. मग काय विचारावें ! जिकडे तिकडे दिवेच दिवे ! ! जणुं काय मुंबई

पेटलीच आहे असा क्षणभर भास होतो. बाहेरगांवचे लोक मुद्दाम ह्या दिवसांत मुंबई पाहण्यास येतात. या सणांत निरनिराळे फटाके व दारूसामान मिळून लाखों रुपयांचा खर्च होत असेल! हा खर्च केवळ चैनीकरितांच होतो. चैनीकरितां पैसे खर्च करूं नका असा उपदेश मोठमोठे लोक व्याख्यानद्वारां करीत असतात; परंतु त्याचा उपयोग व्हावा तसा अद्याप झालेला नाहीं. शिवाय हे पैसे परदेशांत जातात ते जातातच.

चैनीकरितां पैशांचा चुराडा तर होतोच; शिवाय त्याचा आणखी दुष्परिणाम आपल्या शरीरप्रकृतीवर होतो. दारूचा धूर घशांत गेला म्हणजे छातीचे विकार उत्पन्न होतात व त्यापासून रोग जडतात.

**उपदेशः**—लहान मुलांमुलींनो, तुम्ही फटाके वाजविण्याचें बंद कराल तर पुष्कळ फायदा होईल. तेवढ्या पैशांचे पौष्टिक पदार्थ जर खाल्लेत तर शरीरप्रकृति सुदृढ होईल व तुमचें सर्व आयुष्य सुखांत जाईल. आज आपल्या देशाची स्थिति अशी झाली आहे कीं, कांहीं लोकांना पोटभर जेवावयाससुद्धां मिळत नाहीं आणि तुम्ही तर चैनीकरितां व करमणुकीकरितां पैशांचा व्यय करतां! तरी यापुढें चैनीकरितां पैसे खर्च करणार नाहीं, असा निश्चय करा; म्हणजे आपल्या देशाची उन्नति झाल्यावांचून खास राहाणार नाहीं.

---

## १४. मकर संक्रांत

**उपपत्तिः**—सूर्याचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जाणें यास संक्रमण अथवा संक्रांत म्हणतात. बारा राशि असल्यामुळें संक्रमण बारा वेळां होतें. प्रत्येक महिन्यांतील संक्रमणाबद्दल कोणी विचार

करीत नाहीं; फक्त मकर व कर्क या राशींतून संक्रमण होतें, त्याबद्दलचाच विचार करण्यांत येतो. त्याचें कारण पाहिलें असतां या दोन राशींतून सूर्य गेला म्हणजे बरेंच स्थित्यंतर होतें हें होय.

या दिवशीं सूर्याची गति उत्तरेकडे वळते म्हणून त्या वेळेपासून दिवस थोडथोडा वाढत जातो व रात्र लहान होते. त्याच्या उलट कर्क संक्रांतीपासून सूर्याची गति दक्षिणेकडे वळते, त्या वेळेस दिवस लहान व रात्र मोठी होत जाते.

मकर संक्रांतीपासून कर्क संक्रांतीपर्यंतच्या काळास उत्तरायण म्हणतात व कर्क संक्रांतीपासून मकर संक्रांतीपर्यंतच्या काळास दक्षिणायन म्हणतात.

मकर संक्रांत अमक्याच तिथीला येते असें नाहीं. मात्र पौष महिन्यांत येते एवढा नियम आहे. मकर राशीवर सूर्य आला म्हणजे मकर संक्रांत व कर्क राशीवर सूर्य आला म्हणजे कर्क संक्रांत येते. कर्क संक्रांत आषाढांत येते. ज्योतिषशास्त्रदृष्ट्या संक्रांतीची उपपत्ति वरीलप्रमाणें आहे.

यासंबंधानें पौराणिक कथा अशी आहे कीं, ईश्वरानें देवीच्या रूपानें संकरासुर दैत्याचा वध करून सर्व लोकांस सुखी केलें, म्हणून हा सण पाळण्यांत आला असावा.

**धार्मिक विधि व रूढिः**—या दिवशीं समुद्र जवळ असेल तर समुद्रस्नान करावें. समुद्र नसेल तर पवित्र नदीमध्यें स्नान करावें. स्नान केल्यानंतर देवास तीळ, तांदूळ वाहावे. सौभाग्यवती स्त्रियांनीं ब्राह्मणास सुघट (सुगड) द्यावे. त्या सुगडामध्यें गहूं, उंसाचे तुकडे, हळकुंडें व कापूस हे पदार्थ घालावे. मुलीचें लग्न झाल्या-वर पहिल्याच वर्षीं तिच्याकडून तेल, जिरें, मीठ, कापूस हे

जिन्नस सुवासिनीस देवविण्याची चाल कांहीं लोकांमध्यें आहे. या दिवशीं ऐपतीप्रमाणें ऊंस, हळदीकुंकू, नारळ, फळें वगैरे पदार्थ इतर स्त्रियांकडून लुटविण्याची चाल आहे. मुख्यतः हा सण स्त्रियांचाच आहे. या दिवशीं दुपारीं उत्तम प्रकारचें भोजन करावें. सायंकाळीं पोषाख करून तीळगूळ ( हलवा—हलवून हलवून तयार केलेला साखरेचा पदार्थ ) वांटण्याकरितां स्त्रिया बाहेर पडतात. हल्लीं तीळगूळ वांटण्याच्याऐवजीं हलवा वांटण्याची चाल सर्वत्र आहे. तीळगूळ वांटतांना " तीळ घ्या गूळ घ्या, गोड बोला, " असे उद्गार प्रत्येकाच्या तोंडांतून निघत असतात. हलव्याच्या पिशव्या बाहेर-गांवींही मित्रांस भेट म्हणून पाठवितात. हलवा करण्याचें काम जवळ-जवळ एक महिना अगोदर सुरू होत असतें.

पंचांगांत संक्रांतीबद्दलचें वर्णन दिलेलें असतें तें प्रत्येकानें वाचावें. संक्रांत ज्या वाहनावर बसते, जिकडे पाहते, जाते, खाते, जें नेसते ते ते पदार्थ महाग होणार अशी पूर्वीपासून समजूत आहे.

या दिवशीं तिळाचें महत्त्व—जशी तिळाचे अंगीं स्निग्धता आहे तसा आपला इष्टमित्रांमध्यें स्नेह वाढावा हाच तीळगूळ वांट-ण्याचा मुख्य हेतु आहे. त्याचप्रमाणें परस्परांमध्यें प्रेम वाढावें हाही हेतु आहे. या दिवशीं कोठें संमेलनें भरविण्याची चाल आहे.

---

## १५. रथसप्तमी

माघ शु० सप्तमीला रथसप्तमी म्हणतात. या दिवशीं सूर्य रथावर बसून पुढील मार्ग चालूं लागतो, अशी आपली समजूत

आहे. या दिवशीं सूर्याचें माहात्म्य फार आहे व तें श्रीकृष्णानें धर्मराजास सांगितलें आहे:—

"पूर्वी कांबोज देशांत एक यशोवर्मा नांवाचा राजा होऊन गेला. तो चांगल्या स्वभावाचा होता. त्याला पुत्रसंतति नव्हती. नवससायास करून म्हातारपणीं त्याला एक अशक्त व रोगी असा मुलगा झाला. अगोदर आपणांस पुत्र नव्हता आणि आतां जो मुलगा झाला तो रोगी! म्हणून त्याला वाईट वाटलें. त्याची प्रकृति चांगली निकोप व्हावी, याकरितां त्या राजानें पुष्कळ प्रयत्न केले. परंतु सर्व फुकट गेलें. शेवटीं एका ज्योतिषास विचारतां त्यानें असें सांगितलें कीं, 'तुमच्या मुलानें पूर्वजन्मांत कांहीं एक दानधर्म केला नाहीं, ब्राह्मणांस त्रास दिला व सूर्याची पूजा बिलकुल केली नाहीं, या कारणान त्याची स्थिति अशी झाली आहे; आतां तुम्ही रथसप्तमीच्या दिवशीं या मुलाकडून सूर्याची पूजा करवाल तर त्याचे सर्व रोग दूर होतील.' हें ऐकतांच त्या राजानें रथसप्तमीचें व्रत काय आहे, हें विचारून त्याप्रमाणें पूर्ण केल. नंतर त्या मुलास व राजास फार सुख प्राप्त झालें."

**धार्मिक विधि व रूढि:**—सकाळीं सर्व कामें आटोपल्यावर तुलसीवृंदावनाजवळ उत्तम प्रकारची रांगोळी काढून त्यावर एक पाट ठेवावा. त्या पाटावर तांबड्या चंदनानें सात घोड्यांचा रथ काढून त्या रथांत सारथ्यासह सूर्याची प्रतिमा काढावी. नंतर तांबडें गंध, तांबडीं फुलें वगैरे पूजेचें सामान घेऊन पूजा करावी. सूर्याला नैवेद्याकरितां खीर करावी. तसेंच या दिवशीं एका मातीच्या भांड्यांत दूध घालून तें भांडें अंगणांत गोंवऱ्या पेटवून त्याच्यावर दूध * उतास

* 'दुधाचें उतास जाणें पूर्वेकडे अगर उत्तरेकडे जाईल तर शुभ फल समजावें' असें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे.

जाईपर्यंत ठेवावें. दुपारीं खिरीचें मिष्टान्न भोजन करावें. भोजन झाल्यावर स्त्रियांनीं हळदीकुंकू वांटावें. सायंकाळीं देवदर्शनास जावें. याप्रमाणें सर्व दिवस आनंदांत घालवावा.

---

## १६. हुताशनी-होळी

हा सण फाल्गुन शु० १५ ला येतो. आतांपर्यंत सांगितलेले वर्षांतील बहुतेक सण स्त्रीपुरुषांचे असतात. परंतु हा सण फक्त पुरुषांचाच आहे. यांत स्त्रियांचा कांहीं एक संबंध नाहीं. असो. हा सण योग्य किंवा अयोग्य याच्याबद्दल शास्त्रांत पुष्कळ उहापोह होऊन शेवटीं हा सण योग्य आहे असेंच ठरलें.

**उपपत्तिः**—ढुंढा नांवाची राक्षसीण लहान बालकांना त्रास देते, पण या दिवशीं वाईट शब्दांचा उच्चार केला असतां ती दूर पळून जाते, यावरून हा सण प्रचारांत आला असावा.

**शिवलीलामृतांत कथा आहे ती अशीः**—तारकासुर या नांवाच्या एका राक्षसानें सर्व देवांस जिंकून त्यांच्या स्त्रियांस आपल्या दासी केल्या होत्या. अशा रीतीनें सर्व देव त्रासून गेले. शेवटीं ते परमेश्वरास शरण गेले. परमेश्वरानें सांगितलें कीं, श्रीशंकरास षडानन नांवाचा मुलगा होईल व तो तारकासुरास ठार मारील. इकडे सर्व देव श्रीशंकरास पुत्र कव्हां होतो, याची वाट पाहात बसले. पुष्कळ दिवस झाले तरी श्रीशंकरास पुत्र होईना. आतां युक्ति काय करावी, यांतच सर्व देव गढून गेले. शेवटीं कामदेव यानें आपल्या स्त्रीसह ( रति ) जाऊन श्रीशंकराच्या शरिरांत प्रवेश करावा असें ठरलें. ठरल्याप्रमाणें कामदेव रतीसह

शंकराकडे गेला. रतीनें पार्वतीच्या शरिरांत प्रवेश केला आणि कामदेव ( मदन ) शंकराच्या शरिरांत प्रवेश करणार तोंच शंकरानें त्याला पाहिलें. आपल्या तपश्चर्येंत विघ्न केल्याबद्दल शंकरानें आपला तृतीय नेत्र उघडून क्रोधानें अवलोकन केलें. त्याबरोबर तो मदन जळून भस्म झाला. नंतर मोठमोठ्या अपशब्दांनीं ते शिवगण कामदेवाचा उपहास करूं लागले. तेव्हां शंकरानें सांगितलें कीं, ‘ फाल्गुन शु० १५ च्या दिवशीं मी मदनास जाळिलें आहे. सबब दरसाल या दिवशींच तुम्हीं सर्वांनीं होळी करावी. जे कोणी होळी करणार नाहींत, त्यांस वाईट स्थिति प्राप्त होईल. ’ याकरितां शंकराच्या आज्ञेप्रमाणें दरसाल फाल्गुन शु० १५ ला होळी करण्याची चाल पडली.

**धार्मिक विधि व रूढि:**—पौर्णिमेच्या दिवशीं सायंकाळीं आपल्या आंगणासमोर सारवून रांगोळी घालून त्या ठिकाणीं गोंवऱ्या, लांकडें पेटवून होळी करावी. अगर गांवांत ठराविक जागीं होळी करावी. होळीची पूजा झाल्यानंतर आंत नारळ टाकावा. या दिवशीं अपशब्द बोलण्याची मुभा आहे. नंतर गायनवादन वगैरे प्रकार करावे. तसेंच आट्यापाट्या, खो–खो वगैरे खेळ खेळावे; खेळल्या-नंतर दूध अगर कॉफी घ्यावी. अशा रीतीनें सर्व रात्र आनंदांत घालवावी. दुसरे दिवशीं सकाळीं चांडाळास शिवून स्नान करावें. त्या दिवसाला धुळवड म्हणतात. त्याच्या दुसऱ्या दिवशीं गांवांतील सर्व लोकांनीं एकत्र जमून नृत्य, गायनवादन करावें. तसेंच बुक्का, गुलाल उधळावा. अशा प्रकारें हुताशनीचा उत्सव तीन दिवस साजरा करावा.

शास्त्राप्रमाणें हा सण तीन दिवसांचा आहे; परंतु हल्लीं तो पौर्णिमेपासून कांहीं ठिकाणीं रंगपंचमीपर्यंत सहा दिवस पाळतात.

कांहीं गांवांत ठराविक जागींच होळी पेटविण्यांत येते. त्या वेळेस गांवांतील पुष्कळ लोक होळीच्या ठिकाणीं हजर असतात. होळीच्या मध्यभागीं सुरमाड, पोफळ, एरंड किंवा केळ यांपैकीं एखादें झाड पुरून गोंवऱ्या, लांकडें वगैरे सामान घालून होळी पेटवितात.

कोठें कोठें कानाला कटु लागणारे शब्द, चोरी, लोकांच्या सामानाची नासधूस, मद्यसेवन, बायकांसंबंधानें उच्चारलेले किळसवाणे शब्द, त्याचप्रमाणें लोकांच्या कपडयांवर वाईट शब्दांचे उठविलेले शिक्के वगैरे पशुवत् प्रकार आढळून येतात. तरी अशा प्रकारांपासून आपण निराळें राहावें हें बरें. असले प्रकार बहुतकरून अशिक्षित समाजांतच फार दिसून येतात. तरी त्यांपासून त्यांना परावृत्त (दूर) करणें हें प्रत्येक सुशिक्षित मनुष्याचें कर्तव्य आहे.

**उपसंहार**:—हल्लीं पुष्कळ मोठ्या शहरांतून होळीच्या दिवसांत संमेलनें भरविण्याची चाल पडत चालली आहे. मुलांचें लक्ष वाईट मार्गाकडे जाऊं नये म्हणून त्यांचे शारीरिक खेळ करून त्यांस बक्षिसें देण्याची वहिवाट पडूं लागली आहे. त्याचप्रमाणें या दिवसांत सार्वजनिक गायनवादनाचे जलसे, व्याख्यानें, पुराणें, पोवाडे वगैरे प्रकार गांवोगांव आढळून येतात. वरील सर्व प्रकार लहानमोठ्या गांवांत होतील तर भावी पिढीवर—विशेषतः लहान मुलांवर—चांगला परिणाम झाल्यावांचून खास राहणार नाहीं.

# व्रतें (स्त्रियांकरितां)

## १. वटसावित्री



हें व्रत ज्येष्ठ शु० पौर्णिमेस येतें. उपपत्तीविषयीं कथा आहे ती अशीः—

मद्र देशाचा राजा अश्वपति धार्मिक, क्षमाशील व सत्यवक्ता असा होता. परंतु त्याला पुत्रसंतति नसल्यामुळें तो नेहमीं काळजींत असे. शेवटीं श्रीसावित्री देवीची (ब्रह्मदेवाची स्त्री) आराधना केल्यावर श्रीसावित्री देवी प्रसन्न झाली व तिनें राजास वर दिला कीं, "तुला एक सुलक्षणी कन्या होईल." पुढें कांहीं दिवसांनीं श्रीसावित्रीच्या वरप्रसादानें राजास एक कन्या झाली. श्रीसावित्रीच्या

प्रसादामुळें कन्या झाली, म्हणून त्या मुलीचें नांव सावित्री ठेवण्यांत आलें. पुढें ती मोठी होऊन लग्नाला योग्य झाली. तिचें लावण्यही अप्रतिम होतें. असें असतांना सुद्धां कोणीही राजपुत्र तिची मागणी करावयास येईना. यामुळें राजास फारच काळजी वाटूं लागली. शेवटीं आपल्या कन्येसच स्वतः वर शोधून आणण्यास राजानें सांगितलें. पित्याच्या सांगण्यावरून सावित्री वृद्ध मंत्र्यास बरोबर घेऊन वरशोधार्थ निघाली. अनेक देश व तपोवनें हिंडून ती कांहीं दिवसांनीं परत आली.

अश्वपति राजा नारदमुनीसह सभेमध्यें बसला असतांना सावित्रीनें येऊन दोघांस वंदन केलें. सावित्रीकडे पाहून नारदमुनि म्हणाले, "हे राजा, तुझी ही मुलगी कोठें गेली होती? कीं आतांच श्वशुरगृहाहून आली?" असा नारदमुनींचा प्रश्न ऐकल्यावर अश्वपति राजा म्हणाला, "हिला वर शोधण्याकरितां पाठविली होती ती आतांच परत आली आहे. आतां हिनें जो वर पसंत केला असेल तो तिच्याच मुखांतून श्रवण करा." नंतर अश्वपति राजानें सावित्रीस सर्व हकीकत सांगण्यास आज्ञा केली.

पित्याच्या आज्ञेप्रमाणें सावित्री हकीकत सांगूं लागली—"हे तात, शाल्वदेशाचा राजा द्युमत्सेन आंधळा व राज्यभ्रष्ट असून अरण्यांत राहाणारा आहे. त्याला सत्यवान नांवाचा मुलगा आहे. त्याला मीं मनानें वरिलें आहे." हें सावित्रीचें भाषण ऐकल्यावर नारदमुनि म्हणाले, "हे राजा, सावित्रीनें नकळत मोटी चूक केली आहे. कारण सत्यवान हा गुणवान्, बुद्धिमान्, क्षमाशील, शूर, पितृभक्त, तेजस्वी असा आहे खरा, पण तो अल्पायुषी आहे. त्याला एक वर्षाच्या आंतच मरण येणार आहे. याकरितां सावित्रीनें दुसरा वर शोधावा हें बरें."

नंतर राजानें सावित्रीस दुसरा वर शोधून आणण्याबद्दल आज्ञा केली. परंतु सावित्रीनें स्पष्ट सांगितलें कीं, "जो वर मीं मनानें वरिला आहे तो अल्पायुषी असो अगर दीर्घायुषी असो, गुणी असो अगर अवगुणी असो, शूर असो अगर भित्रा असो, तोच मी वरणार!" हे तिचे निश्चयाचे शब्द ऐकल्यावर नारदमुनींनें राजास सांगितलें कीं, "हे राजा, तूं सावित्रीची इच्छा मोडूं नको. तुमचें सर्वांचें कल्याण असो. मी आतां स्वर्गांत निघून जातों."

अश्वपति राजानें कन्येच्या इच्छेप्रमाणें विवाहाची सर्व तयारी करवून द्युमत्सेन राजास वनांतून बोलावून आणिलें. त्याच्या मुलाशीं म्हणजे सत्यवानाशीं सावित्रीचें मोठ्या समारंभानें लग्न लाविलें. आपल्याला योग्य पति मिळाला म्हणून सावित्रीस आनंद झाला. तसाच आपल्याला सर्वगुणसंपन्न स्त्री मिळाली म्हणून सत्यवानासही आनंद झाला.

वनांत गेल्यावर सावित्रीनें आपल्या अंगावरील सर्व दागिने काढून वल्कलें ( झाडाच्या सालीचीं वस्त्रें ) धारण केलीं व श्वशुर, सासू व पति यांची एकनिष्ठपणें सेवा करण्यास सुरवात केली. तिची ती सेवा पाहून सर्वांस आनंद झाला.

नारदमुनींनें सांगितल्याप्रमाणें सत्यवानाच्या मृत्यूचे दिवस अगदीं जवळ येऊन ठेपले. त्याबरोबर तिचें मुख म्लान दिसूं लागलें. आतां चारच दिवस राहिले हें पाहून तिनें तीन दिवस उपवास करण्याचें व्रत पतकरिलें. हें तिच्या श्वशुरास कळतांच त्यानें तिची पुष्कळ समजूत केली, परंतु तिचा निश्चय कांहीं ढळेना. शेवटीं उपवासाचे तीन दिवस संपून चौथा दिवस उजाडला; तेव्हां तर सावित्रीचें मुख फारच म्लान दिसूं लागलें.

चौथ्या दिवशीं सकाळीं सावित्रीनें आपलीं सर्व कामें आटोपून,

सासू, सासरा, ब्राह्मण यांस नमस्कार करून सर्वांपासून 'सौभाग्यवती, पुत्रवतीभव' असा आशीर्वाद घेतला. आशीर्वाद घेतल्यावर सासू-सासऱ्यानें सांगितलें कीं, "हे सावित्री, तुझ्या संकल्पाप्रमाणें तूं व्रत पूर्ण केलें आहेस, आतां पारण्याची वेळ झाली आहे, तरी भोजन करून तुला जें योग्य असेल तें तूं कर." त्यावर सावित्री म्हणाली, "माझे मनोरथ पूर्ण झाल्यावर सूर्यास्ताच्या वेळीं भोजन करीन." हें संभाषण सुरू आहे तोंच खांद्यावर कुऱ्हाड टाकून सत्यवान् वनांत जाण्याकरितां तेथें आला. त्या वेळेस सावित्री म्हणाली, "हे नाथ, आपण आज एकटे जाऊं नका, मी आपल्या-बरोबर वनांत येईन. आपणांस सोडून मी कोठेंही राहणार नाहीं. एवढी माझी विनंति मान्य कराच." सत्यवान् म्हणाला, "हे प्रिये, तूं केव्हांही वनांत गेलेली नाहींस. वनामधील मार्ग अत्यंत विकट आहे. तो तुझ्यानें सहन करवणार नाहीं. शिवाय आज तीन दिवस उपास करून तूं अगदीं थकली आहेस, सबब तूं वनांत न यावें हें बरें." सावित्री म्हणाली, "हे नाथ, मला उपवासामुळें थकवा आला नाहीं व मला श्रमही होणार नाहींत." सत्यवान् म्हणतो, "हे सावित्री, मी तुझ्या विनंतीला संमति देतों, परंतु सासूसासऱ्यांची कबुली घेऊन ये." नंतर सावित्री सासूसासऱ्यांस नमस्कार करून म्हणाली, "मी आज पतीबरोबर फळें आणण्याकरितां वनामध्यें जाणार आहें. आज मला पतीचा वियोग सहन होणें शक्य नाहीं. सबब जाण्याची परवानगी द्या." द्युमत्सेन म्हणाला, "तूं आजपर्यंत केव्हांही विनंति केली नाहींस. सबब मी जाण्यास परवानगी देतों. जातांना मात्र सत्यवानाकडे दुर्लक्ष करूं नकोस हो."

नंतर मनाला रमविणारीं अशीं तीं वनें सावित्री अवलोकन

करीत होती व सत्यवानही वनांतील सर्व रम्य स्थळें दाखवीत दाखवीत मार्ग आक्रमण करीत होता. सावित्रीच्या मनांत नारद-मुनीचें भाषण एकसारखें घोळत असल्यामुळें सत्यवानाच्या हालचालींकडे ती सारखें लक्ष देत होती. सत्यवानानें फळें तोडून टोपली भरली आणि तो लांकडें तोडूं लागला. लांकडें तोडतां तोडतां एकाएकीं त्याच्या मस्तकांत भयंकर वेदना होऊं लागल्या, सर्व शरिरास घाम सुटला, छातीमध्यें कळा येऊं लागल्या व सर्व अंग ठणकूं लागलें. अशा स्थितीमुळें तो सावित्रीच्या मांडीवर डोकें ठेवून निजला.

पतीचें मस्तक मांडीवर ठेवून फार वेळ झाला नाहीं तोंच एक तेजस्वी पुरुष हातांत पाश घेऊन आपल्या पतीकडे पाहात उभा आहे असें तिच्या दृष्टीस पडलें. त्याला पाहातांच सावित्रीनें पतीचें मस्तक खालीं ठेवून नमस्कार करून ती म्हणाली, "आपण कोण आहां ? व कोणता हेतु मनांत धरून येथें आलां ? मी तर आपणांस देवच समजतें." त्यावर यम म्हणाला, "हे सावित्री, तूं पतिव्रता आहेस, म्हणून मी तुझ्याशीं भाषण करीत आहें. मी तुझ्या पतीचा प्राण हरण करून नेण्यास आलों आहें." सावित्री म्हणाली, "लोकांचे प्राण हरण करण्याकरितां आपले दूत येत असतात, असें मीं ऐकिलें आहे. मग माझ्या पतीचे प्राण हरण करण्याकरितां आपण कां आलां हें समजत नाहीं ! तरी याचें कारण काय असेल तें सविस्तर सांगा." अशा प्रकारें सावित्रीचें भाषण ऐकल्यावर यम म्हणाला, "हा सत्यवान् गुणवान्, धर्मनिष्ठ व सर्वगुणसंपन्न असल्यामुळ त्याला सेवकांनीं नेणें योग्य नाहीं, म्हणून मी स्वतः आलों आहें." इतकें बोलून सत्यवानाचे प्राण हरण करून यम जाऊं लागला.

यम निघालेला पाहतांच सावित्री त्याच्या मागोमाग जाऊं लागली. तेव्हां यम म्हणाला, " हे महापतिव्रते सावित्री, तूं मागें फीर. उगाच श्रम कशाला करतेस. " त्यावर सावित्री म्हणाली, " हे प्रभो, जिकडे पति जाईल तिकडे स्त्रियांनीं जावें हा पतिव्रतेचा धर्म आहे. त्या धर्माप्रमाणें मी येत आहें. माझ्या व्रताच्या योगानें व वडिलांच्या आशीर्वादानें माझ्या मार्गांत अडचण येणार नाहीं. शिवाय संत म्हणतात, सात पावलें साधूचा सहवास केला तर साधूशीं सख्य होतें आणि त्या सख्याच्या योगानें कोणतही संकट येत नाहीं. आपण तर सर्वांना समतेनें वागविणारे संत आहां असा लौकिक आहे, याकरितां या कन्येवर दया करा. " हें तिच बोलणें ऐकतांच यमास प्रेमाचें भरतें आलें व संतुष्ट होऊन तो म्हणाला, " हे सावित्री, सत्यवानाच्या प्राणाशिवाय जें इष्ट असेल त माग. " त्यावर निरनिराळे असे चार वर तिनें मागून घेतले. पहिल्या वरानें श्वशुराची दृष्टि, दुसऱ्या वरानें राज्यपद, तिसऱ्या वरानें आपल्या पित्यास शंभर पुत्र आणि चौथ्या वरानें दोन्ही कुलांचा उद्धार करणारे शंभर पुत्र स्वतःला व्हावे, असे चार वर तिनें मागून घेतले. शवटीं सावित्रीच्या प्रेमाच्या भाषणानें यम फारच संतुष्ट झाला व म्हणाला, " आतां सर्वांत जो उत्तम वर असेल तो मागून घे. " सावित्री म्हणाली, " हे प्रभो, पतीशिवाय जगणें व्यर्थ आहे. याकरितां ' सत्यवान् जिवंत होवो ' असा वर मी मागत आहें तो द्या. ". यम ' तथास्तु ' म्हणून आपल्या स्थानीं निघून गेला.

यम निघून गेल्यावर ज्या ठिकाणीं सत्यवानाचें प्रेत पडलें होतें त्या ठिकाणीं सावित्री आली. तोंच जसा निद्रेंतून मनुष्य जागा व्हावा तसा सत्यवान् एकाएकीं जागा होऊन बोलूं लागला, " मला फार वेळ झोंप लागली. तूं उठविलें कां नाहींस ? ज्यानें मला ओढून

नेलें तो पुरुष कोठें आहे ? " सावित्री म्हणाली, " रात्र बरीच झाली आहे, तशांत आपल्याला श्रमही फार झाले आहेत; करितां झालेली हकीकत उद‌ईक सांगेन, आतां रात्र झाल्यामुळें अरण्यांतील मार्ग बरोबर दिसणार नाहीं, करितां एवढी रात्र येथेंच काढून सूर्योदय झाला म्हणजे आपण आश्रमांत जाऊं."

सत्यवान् म्हणाला, " हे स्त्रिये, माझ्यावांचून माझी आई एक पळभरही जिवंत राहणें शक्य नाहीं. माझा बाप सर्व अरण्य शोधीत असेल. मला त्यांना भेटण्याची फारच उत्सुकता लागली आहे. तरी विलंब न लावतां आश्रमाकडे जाऊं." हे पतीचे शब्द ऐकतांच सावित्रीन कुऱ्हाड बरोबर घेतली व पतीचा हात धरून हळूहळू मार्ग चालूं लागली. थोडयाच वेळानें तीं दोघें आश्रमांत जाऊन पोहोंचलीं.

इकडे सत्यवानास येण्यास उशीर लागला म्हणून द्युमत्सेन कांहीं तपस्वी बरोबर घेऊन सर्व अरण्य शोधीत होताच; परंतु कोठेंही सत्यवानाचा पत्ता लागेना. शेवटीं निरुपाय होऊन तो आश्रमांत परत आला. अरण्यांतील वृद्ध तपस्वी त्याचें सांत्वन करण्याकरितां पूर्वीच्या काळच्या कथा सांगूं लागले. कथा सांगत असतांना द्युमत्सेनास एकाएकीं दृष्टि आली ! हा चमत्कार पाहतांच सर्वांस आश्चर्य वाटलें व सर्व जण म्हणूं लागले, " सत्यवान् खास जिवंत आहे. चिंता करण्याचें कारण नाहीं. शिवाय त्याच्याबरोबर महा-पतिव्रता सावित्रीही आहे." असें भाषण चाललें आहे तोंच सत्यवान् सावित्रीसह आश्रमांत जाऊन पोहोंचला. सत्यवानास पाहातांच त्याच्या आईबापांस पराकाष्ठेचा आनंद झाला. नंतर सावित्रीनें अरण्यांतील झालेली सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून सर्वांस सावित्रीच्या पातिव्रत्याची धन्यता वाटली.

यमानें वर दिल्याप्रमाणें द्युमत्सेनास राज्यपद मिळालें. (दृष्टि अगोदरच आली होती.) अश्वपति राजास बलवान् असे शंभर पुत्र झाले. सत्यवानासही कीर्ति मिळविणारे व कधींही अपजय न पाव- णारे असे शंभर पुत्र झाले. सारांश, पातिव्रत्यानें आपल्या पतीचा, सासूसासऱ्यांचा व आईबापांचा सर्व संकटांपासून सावित्रीनें उद्धार केला.

**धार्मिक विधिः**—ज्येष्ठ शु० १३ पासून पौर्णिमेपर्यंत पति दीर्घायु व्हावा याकरितां तीन दिवस सावित्रीव्रत करतात. तीन दिवस उपोषण करणें उत्तम. परंतु तीनही दिवस उपोषण होणें अशक्य असेल तर निदान पौर्णिमेच्या दिवशीं तरी करावें. सावित्रीची सोन्याची मूर्ति करून किंवा वडाखालीं सावित्री, सत्यवान् व यम यांचीं चित्रें काढून त्यांची पूजा करावी. ब्राह्मणांस नमस्कार करून त्यांना वायन (वाण) द्यावें व आशीर्वाद घ्यावा. दुसऱ्या दिवशीं मेहुण बोलावून भोजन करावें. सायंकाळीं सावित्रीची कथा वाचावी. अगर दुसऱ्याकडून वाचवून ऐकावी.

**रूढिः**—ज्येष्ठ शु० १५ म्हणजेच वटसावित्री होय. हें व्रत केवळ सौभाग्यवती स्त्रियांनींच करावयाचें असतें. मुलीचें लग्न झालें म्हणजे ती व्रत करण्यास योग्य झाली. नंतर तिनें आपलें सौभाग्य कायम राहावें म्हणून हें व्रत अवश्य पाळलेंच पाहिजे असा निर्बंध आहे. सावित्रीचा पति वडाच्या झाडाखालीं गतप्राण झाला व तो पुन्हां त्याच ठिकाणीं जिवंत झाला, म्हणून या व्रतांत वडाच्या झाडाचा संबंध विशेष आहे आणि म्हणूनच त्या झाडाची पूजा करण्याची चाल पडली आहे. या दिवशीं स्त्रिया उपोषित राहून वडाच्या झाडाची पूजा करितात. खेडेगांवीं सर्व स्त्रिया एकाच ठिकाणीं जमून वडाची पूजा करितात. परंतु मुंबईसारख्या मोठ्या

शहरांत तशी सोय नसल्यामुळें वडाची डहाळी आणून तिची घरींच पूजा करितात. सायंकाळीं सावित्रीची कथा ऐकतात. मुंबई शहरांत तर मुद्दाम सावित्री नाटकाचे प्रयोग करितात. तसेंच सिनेमांतही तेच चित्रपट दाखवितात. ते पाहण्याकरितां पुष्कळ स्त्रिया जातात. अशा रीतीनें सर्व स्त्रिया आपआपल्या परीनें हें व्रत पूर्ण करीत असतात.

**योग्यता:**—सावित्रीचें नांव माहीत नाहीं अशी एकही स्त्री सांपडणें शक्य नाहीं. पूर्वीं पुष्कळ स्त्रिया पतिव्रता म्हणून नांवाजलेल्या होत्या; परंतु एकीच्याही नांवानें व्रत करण्याची चाल पडली नाहीं. यावरून सावित्रीची योग्यता सर्व स्त्रियांपेक्षां श्रेष्ठ आहे हें उघडच दिसतें. एका स्त्रीनें दुसऱ्या स्त्रीस नमस्कार केला तर 'जन्म सावित्री हो' असा आशीर्वाद देतात हें सर्वांस माहीत आहेच. जगामध्यें प्रत्यक्ष यमाच्या हातांतून पतीला सोडविणारी स्त्री एवढीच उत्पन्न झाली. लग्न होतांच सावित्रीनें सर्व ऐश्वर्य सोडून दिलें व वनांत राहाण्याकरितां तयार झाली, हेंसुद्धां विशेषच होय. पूर्वींच्या काळीं पति म्हणजे आपलें दैवत असें समजून त्याजबद्दल सर्व सुखदुःखें सोसण्यास तयार असणाऱ्या, पतीच्या प्रत्येक कार्यास मदत करणाऱ्या, त्याचप्रमाणें सासूसासऱ्यांस मातापित्याच्या ठिकाणीं मानणाऱ्या स्त्रिया होत्या. त्यामुळें आपला समाज बराच भरभराटीस पोंचलेला होता; परंतु हल्लींच्या काळीं अगदीं उलट स्थिति प्राप्त झाल्यामुळें समाजाची अवनति होत चालली आहे!

**उपदेश:**—सावित्रीच्या नांवानें पूजा करण्यासाठीं निघणाऱ्या स्त्रियांनीं आपण गेल्या वर्षांत पतीच्या सुखासाठीं किती झटल्यों, पतीच्या आज्ञा किती मानल्या, पतीचे श्रम नाहींसे करण्याकरितां किती प्रयत्न केले, याबद्दलचा विचार करावा. तसें वर्तन झालें नसल्यास पुढील वर्षीं तरी "उत्तम प्रकारानें वागेन" असें म्हणून

सावित्रीची क्षमा मागावी. सबंध वर्षांत पतीशीं प्रेमभावानें न वागतां फक्त वटसावित्रीच्या दिवशीं पतीस कल्याण व आयुष्य प्राप्त व्हावें म्हणून पूजा करण्यांत काय बरें अर्थ आहे ?

**पतिव्रताधर्मः**—पति हेंच जिचें व्रत आहे ती पतिव्रता होय. आतां तिचा धर्म म्हणजे कर्तव्य कोणतें तें पाहूं. पतीला देवासारखें मानून तो जेणेंकरून संतुष्ट राहील अशा रीतीनें त्याच्याशीं वागणें, त्याच्या मनाविरुद्ध कोणतीही गोष्ट न करणें, त्याच्याशीं गोड भाषण करणें, सेवा करणें, आज्ञेंत राहाणें, अपशब्द न बोलणें, परपुरुषाकडे न पाहाणें व न बोलणें, पतीच्या अगोदर न निजणें व न जेवणें, गृहकृत्यांत दक्षता ठेवणें, पतीची सांपत्तिक स्थिति चांगली नसली तरी आहे त्या स्थितींत समाधानानें राहाणें, पति आंधळा, रोगानें पीडित व कुरूप असला तरी त्याबद्दल तिटकारा न मानणें हीं पतिव्रताधर्माचीं मुख्य तत्त्वें आहेत, असें आपल्या धर्मांत सांगितलें आहे. त्याचप्रमाणें स्त्रियांचा सन्मान ठेवणें व त्यांना संतुष्ट ठेवणें हें पुरुषांचेंही कर्तव्य आहेच.

**उपसंहारः**—सर्व स्त्रीपुरुषांनीं प्रेमानें, नीतीनें व सद्धर्मानें वागलें पाहिजे, तसेंच हें शिक्षण आपल्या घरींच मिळविण्यासारखें आहे, हें दाखविणें हाच वरील व्रताचा मुख्य हेतु आहे. नुसत्या पूजनानें किंवा उपोषणानें खरें श्रेय मिळणार नाहीं, तर अखंड सौभाग्य प्राप्त होण्याकरितां प्रत्येक आर्य स्त्रीनें 'सावित्रीव्रत' अवश्य पाळावें.

# २. मंगळागौरी




श्रावण महिन्यांत प्रत्येक मंगळवारीं मंगळागौरीचा उत्सव करण्याची चाल आहे. मुलीचें लग्न झाल्यावर पांच वर्षेंपर्यंत तिच्याकडून मंगळागौरीची पूजा करून घेत असतात. हें व्रत सौभाग्यवर्धक असून त्याच्या योगानें पतीचें आयुष्य वाढतें. अशाबद्दल भविष्योत्तर पुराणांत कथा आहे ती अशी:—

पूर्वीं कुंडिन शहरांत धर्मपालक या नांवाचा एक ब्राह्मण पत्नीसह राहात असे. त्यांस पुत्रसंतति नसल्यामुळें तीं नेहमीं दुःखी असत. एक योगी दररोज आपल्या घरावरून भिक्षा घेतल्याशिवाय जात असतो, हें पाहून त्यांस फारच दुःख वाटे ( कारण—निपुत्रिक ). एके दिवशीं त्यांनीं असा बेत केला कीं, योगी भिक्षेस आला म्हणजे दाराआडून भिक्षा घालावयाची. दुसरे

दिवशीं धर्मपालकाच्या बायकोनें योगी येतांच दाराआडून भिक्षा घातली. त्याबरोबर तो योगी रागावून म्हणाला, " तुम्ही कपटानें मला भिक्षा घातलीत; सबब तुम्हांस संतति होणारच नाहीं. " असा शाप ऐकल्याबरोबर तीं पतिपत्नी उःशाप मागण्यासाठीं त्या योग्याची पुष्कळ विनवणी करूं लागलीं. तेव्हां तो प्रसन्न होऊन म्हणाला, " निळें वस्त्र नेसून, निळ्या घोड्यावर बसून अरण्यामध्यें जा व जेथें तुमचा घोडा ठेंचाळेल तेथें खणा. म्हणजे त्या ठिकाणीं एक देवी सांपडेल. तिची पूजाअर्चा करा, म्हणजे तुमचे हेतु पूर्ण होतील. " याप्रमाणें योग्याचें भाषण श्रवण करून घोड्यावर बसून तीं दोघं अरण्यांत गेलीं. तेथें योग्यान सांगितल्याप्रमाणें देवी सांपडली. नंतर त्यांनीं तिची आराधना करून तिला प्रसन्न करून घेतली. त्यांची निष्ठा पाहून देवीनें " सुरूप, पण अल्पायुषी पुत्र होईल " असा वर दिला.

देवीच्या कृपेनें त्यांस पुत्र झाला. त्या पुत्राचें नांव ' शिव ' ठेविलें. त्यांनीं त्या मुलाचे लहानपणाचे सर्व संस्कार उत्तम प्रकारानें व मोठ्या थाटानें केले. यथाकाळीं त्याचा उपनयनविधि झाला. लग्न करण्यापूर्वीं मुलानें काशीविश्वेश्वराचें दर्शन घ्यावें असा पूर्वीं संकल्प केला असल्यामुळें तो ब्राह्मण पुत्रासह काशीला गेला. पुढें तो एके दिवशीं अरण्यांत गेला असतांना त्याला तेथें पुष्कळ मुली खेळतांना दिसल्या. इतक्यांत कांहीं कारणावरून मुली आपसांत भांडूं लागल्या. त्यांत एक सुशीला नांवाची मुलगी होती. तिनें सांगितलें कीं, तुम्ही कोणीही मला अपशब्द बोलूं नका. कारण माझी आई मंगळागौरीचें व्रत करिते व तेणेंकरून कायमचें सौभाग्य प्राप्त होतें. हें सुशीलेचें भाषण धर्मपालकास ऐकूं आलें. तेव्हां त्यानें विचार केला, ही मुलगी जर आपली सून होईल तर आपल्या मुलाचें आयुष्य खात्रीन वाढेल. शेवटीं त्यानें त्या

सुशीलेच्या आईस सांगून तिचें आपल्या मुलाशीं लग्न लावून दिलें.

पुढें एके दिवशीं मंगळागौरी सुशीलेच्या स्वप्नांत येऊन म्हणाली, "तुझ्या पतीस चावण्यासाठीं एक सर्प येत आहे, करितां एक घागरभर दूध ठेव. तें दूध पिण्यास सर्प तेथें जाईल, मग सर्प आंत शिरल्यावर चोळीनें घागरीचें तोंड बंद कर व तें वायन (वाण) दुसरे दिवशीं आपल्या मातेस दे." देवीनें स्वप्नांत सांगितल्याप्रमाणें पुढें सर्व घडून आलें. तें वायन (वाण) आईनें उघडून पाहिलें तों तिला आंत मोत्यांचा हार सांपडला.

नंतर थोड्याच दिवसांत शिवाचे प्राण हरण करण्याकरितां यमदूत आले. त्या वेळेस मंगळागौरीनें त्यां यमदूतांशीं लढाई करून त्या शिवाचे प्राण परत आणून दिले व सुशीलेस अखंड सौभाग्य मिळवून दिलें. तेव्हांपासून मंगळागौरीची पूजा करण्याची चाल पडली असावी. धर्मपालकास भूमि खणून देवी सांपडली. तो श्रावण महिन्यांतील मंगळवार असल्यामुळें त्या देवीस मंगळागौरी नांव पडलें.

**धार्मिक विधि व रूढि**:—लग्न झाल्यावर प्रत्येक मुलीनें श्रावण महिन्यांतील प्रत्येक मंगळवारीं देवीची पूजा करावी. पहिल्या वर्षीं माहेरीं व पुढें सासरीं मंगळागौरीची पूजा करावी. पूजेला लागणारे सर्व पदार्थ तयार करून ठेवावे. मंगळागौरीच्या पूजेंत १६ चें महत्त्व विशेष आहे. धोतरा, शेवंती, दूर्वा, आघाडा वगैरे सोळा प्रकारची पत्री व फुलें असावीं लागतात. एका ताटांत हळदीकुंकू, काजळ, करंडा, फणी, तांदुळ, खण, नारळ, सुपारी, विडा व दक्षिणा वगैरे पदार्थ घालून तें वायन आपल्या मातेस अगर मातेकडील सुवासिनीस द्यावें. त्याचप्रमाणें ब्राह्मणासही वायन द्यावें. पूजा करावयाची ती भक्तिपूर्वक व मौनपणानें करावी. दुपारीं सोळा सुवासिनींसह न बोलतां मिष्टान्नभोजन करावें. रात्रीं सोळा वातींची

आरती ओवाळावी आणि सुवासिनींच्या ओट्या भराव्या. रात्रीं भोजन करूं नये. गाणीं, खेळ, नृत्य व फुगड्या वगैरे प्रकारांनीं सर्व रात्र मोठ्या आनंदांत घालवावी. दुसरे दिवशीं सकाळीं गौरीस सौभाग्यद्रव्यें अर्पण करून विसर्जन करावी. गौरीची प्रतिमा असल्यास ब्राह्मणास दान द्यावी. वरीलप्रमाणें पांच वर्षें मंगळागौरीचें व्रत केलें म्हणजे पतीस आरोग्य प्राप्त होतें व सौभाग्य अक्षय टिकतें.

**उपसंहारः**—ही मंगळागौरीची पूजा सर्व जातींच्या सौभाग्यवती स्त्रियांनीं केली पाहिजे असें दिसून येतें; परंतु ह्या व्रताचा प्रचार फक्त दक्षिणी ब्राह्मण स्त्रियांमध्येंच विशेष दिसून येतो. वास्तविक ह व्रत सर्व सुवासिनींनीं सौभाग्य कायम राहाण्यासाठीं प्रतिवर्षीं केलें पाहिजे व तें उपपत्तीच्या गोष्टीवरून सिद्धही होतें. परंतु प्रचारांत फक्त पांचच वर्षें व्रत आचरण्याची चाल दिसते.

हें व्रत प्रत्येक मुलगी आपल्याच घरीं करील तर तिला विशेष आनंद होणार नाहीं. तेंच जर आठ-दहा मुली एकत्र जमून करतील तर एकमेकांविषयीं प्रेम वाढण्यास, नैतिक सुधारणा होण्यास व धार्मिक गोष्टी समजण्यास सुलभ जाईल व त्या गोष्टी समजल्या म्हणजे खरा आनंदही होईल. यावरून दहा-बारा मुली एकत्र जमून मंगळागौरीची पूजा करण्याची चाल पडली असावी.

---

## ३. पिठोरी अमावास्या

श्रावण वद्य अमावास्येला पिठोरी अमावास्या म्हणतात. हें व्रत स्त्रियांस सौभाग्य व संतति देणारें असल्यामुळें फक्त सुवासिनी स्त्रियांचाच संबंध त्यांत येतो. यासंबंधानें भविष्योत्तर पुराणांत कथा आहे ती अशीः—

एकदां इंद्राणीनें (इंद्राची पत्नी) पार्वतीस प्रश्न केला कीं, "स्त्रियांस सौभाग्य व संतति देणारें असें एखादें व्रत असेल तर तें कृपा करून मला सांगा. तसेंच तें पूर्वी कोणीं केलें तेंही सांगा."

**पार्वती:**—हे इंद्राणी, पिठोरी अमावास्येचें व्रत केलें आणि ६४ देवतांची पूजा केली म्हणजे तूं विचारलेल्या गोष्टी साध्य होतील. आतां त्याविषयीं एक कथा आहे ती सांगतें, श्रवण कर.

पूर्वी श्रीधर या नांवाचा एक ब्राह्मण होता. त्याला आठ मुलगे होते. वडील मुलाचें नांव शंकर व त्या मुलाच्या बायकोचें नांव विदेहा असें होतें. विदेहा प्रत्येक वर्षीं श्रावण वद्य अमावास्येला बाळंत होई (हा दिवस श्रीधराच्या मातापितरांचा श्राद्धदिवस होता.) आणि मूल तात्काळ मरत असे. त्यामुळें घरांतील मंडळी कंटाळून जात. एकदां ती अमावास्येच्या दिवशीं प्रसूत झाली, तेव्हां घरांतील मंडळींनीं तिला बाहेर घालवून दिलें. विदेहा मुलाला पोटाशीं धरून अरण्यांत निघून गेली. जातां जातां वाटेंतच तें मूल स्वर्गवासी झालें. नंतर शोकाकुल झालेली ती विदेहा फिरत फिरत एका झोंपडींत गेली. तेथें तिला एक देवता भेटली. त्या देवतेला विदेहेनें आपलें सर्व वर्तमान सांगितलें. तेव्हां देवतेनें सांगितलें कीं, रात्रीं येथें ६४ देवता येत असतात. त्या तुझें दुःख नाहींसें करतील. हें देवतेचें भाषण ऐकून तिला आनंद झाला. देवतेनें सांगितल्याप्रमाणें ती बेलाच्या झाडाच्या आड लपून बसली. रात्र होतांच ६४ देवता तेथें आल्या व देवळाच्या पुजाऱ्यास सौभाग्यवायन देत्या झाल्या आणि पुजाऱ्यास विचारूं लागल्या कीं, 'येथें कोणी सुवासिनी अगर अतिथि आहे काय?' हा प्रश्न ऐकतांच विदेहा झाडामागून येऊन पुढें उभी राहिली आणि म्हणाली, मी सुवासिनी आहें; परंतु माझें मूल नुकतेंच मरण पावलें असल्यामुळें

मला अशौच (सुतक) आहे; तसेंच यापूर्वीं झालेलीं सर्व मुलें मेलीं आहेत; करितां कृपा करून माझीं मुलें जिवंत होऊन दीर्घायु होतील असा मला वर द्या. हें विदेहेचें बोलणें ऐकल्यावर देवता प्रसन्न झाल्या व त्यांनीं तिला वर दिला. वर मिळाल्यामुळें आनंदित झालेली विदेहा आपल्या आठ मुलांसह घरीं आली. ती घरीं आलेली पाहातांच सासूसासऱ्यांनीं तिचा मोठा सत्कार केला व तो दिवस आनंदांत घालविला. पुढें कांहीं दिवसांनीं विदेहा स्वर्गवासी झाली. तेव्हांपासून वरील व्रताचा प्रघात पडला असावा.

**धार्मिक विधि व रूढिः**—श्रावण वद्य अमावास्येच्या दिवशीं उपवास करून सायंकाळीं स्नान करावें. देवासमोर ६४ सुपाऱ्या मांडून चौसष्ट योगिनींची आराधना करावी. आणि भक्तिपूर्वक पूजा करावी. पूजा झाल्यावर पुत्र, ऐश्वर्य, सौभाग्य व इच्छित हेतु पूर्ण व्हावे याकरितां चौसष्ट योगिनींची प्रार्थना करावी. प्रार्थना झाल्यावर ब्राह्मणास चांदीच्या भांड्यांतून सौभाग्यवायन द्यावें. व्रत करणाऱ्यानें (स्त्री अगर पुरुष) 'अतिथि कोण आहे?' असा प्रश्न करावा. नंतर घरांतील मुलानें 'मी आहें' असें सांगावें. नंतर त्या मुलास पोळीचें वायन द्यावें. अशा रीतीनें व्रत पूर्ण केलें म्हणजे अखंड सौभाग्य व दीर्घायु पुत्र होतील.

**उपसंहार** :— वटसावित्री, मंगळागौरी, हरितालिका आणि ऋषीपंचमी वगैरे व्रतें स्त्रियांनीं केलींच पाहिजेत असें शास्त्रांत सांगितलें आहे. परंतु वरील व्रत केलेंच पाहिजे असें नाहीं. फक्त ज्या स्त्रियांची संतति वांचत नसेल त्या स्त्रिया हें व्रत करितात. मुंबई शहरांत या दिवशीं "मातृदिन" पाळण्याची वहिवाट आहे. कांहीं घराण्यांत परंपरेनें हें व्रत चालविण्याची रूढि आहे.

---

## ४. हरितालिका

हें व्रत भाद्रपद शु० ३ स येतें. याच्या उपपत्तीविषयीं भविष्योत्तर पुराणांत एक कथा दिली आहे. ती अशीः—

एके दिवशीं कैलास पर्वतावर शिव व पार्वती आनंदानें बसलीं असतां पार्वती शंकरास प्रश्न करिते कीं, हे शंकरा, सर्वांत जें गुप्त असेल तें, तसेंच मीं कोणतें व्रत केलें म्हणून तुम्ही मला पति लाभलां तें सांगा.

**शंकरः**—जें सर्वांत उत्तम व्रत आहे, तें शास्त्रांत जसें वर्णिलें आहे तसेंच सांगतों, श्रवण कर. त्याप्रमाणें तूं पूर्वी जें व्रत केलेंस आणि ज्या व्रताच्या योगानें तुला माझ्या अर्धांगीपदाचा मान मिळाला तेंही श्रवण कर. हे पार्वती, तूं पुष्कळ वर्षें अत्यंत कष्ट करून जें तप केलेंस, तें तप पाहून हिमालय यास आपली कन्या कोणास द्यावी याबद्दल रात्रंदिवस चिंता लागली. अशा काळजीमध्यें हिमालय असतां तेथें अकस्मात् नारदमुनि प्राप्त झाले. नारदमुनींस पाहतांच त्यांचा मोठा सत्कार करून त्यानें त्यांस आसनावर बसविलें. नंतर नारदमुनि म्हणाले, "हे पर्वतराज, मी तुझ्याकडे कां आलों तें सांगतों, ऐक. मला श्रीविष्णूनें तुझ्या सुस्वरूप कन्येची मागणी करण्याकरितां पाठविलें आहे. माझ्या मतें ब्रह्मदेव व शंकर यांच्यापेक्षां श्रीविष्णूच तुझ्या कन्येस योग्य आहेत. याकरितां तूं आपल्या कन्येस त्यांनाच देण्याचा निश्चय कर."

हें नारदाचें भाषण ऐकल्यावर हिमालयास आनंद झाला, व त्यानेंही श्रीविष्णूस देण्याचा निश्चय केला. बापाचा झालेला निश्चय तुला समजला व ही गोष्ट मनाच्या विरुद्ध होत आहे म्हणून तूं सखीला बरोबर घेऊन अरण्यामध्यें निघून गेलीस. (पूर्वी शंकरास

देण्याचा निश्चय केला होता व आतां तो बदलला. ) इकडे आपली कन्या नाहींशी झालेली पाहतांच हिमालयास फार दुःख झालें. तो तिच्या शोधाकरितां पुष्कळ अरण्यें हिंडूं लागला, परंतु कोठेंही पत्ता लागेना. शेवटीं तो हिमालय अत्यंत घोर अरण्यामध्यें शिरला.

पार्वती, तूं जी घरांतून निघालीस ती एका घोर अरण्यामध्यें एका नदीच्या कांठीं एक गुहा होती तेथें प्राप्त झालीस. नंतर सखीसह अन्नपाणी सोडून तूं आपल्यासह माझें वाळूचें लिंग स्थापून भक्तिपूर्वक पूजा केलीस. त्या दिवशीं भाद्रपद शु० ३ असून हस्तनक्षत्र होतें. त्या दिवशीं रात्रीं गाणें गाऊन जागरण केलेंस. याप्रमाणें तूं व्रत केलेंस. त्या योगानें मी संतुष्ट होऊन तत्काळ त्या ठिकाणीं प्राप्त झालों. नंतर तुला म्हणालों, " हे पार्वती, तुजवर मी संतुष्ट झालों आहें. इच्छेस येईल तो वर माग. " तेव्हां तूं म्हणालीस, " जर आपण प्रसन्न झालां आहां तर माझे पति व्हा, एवढेंच आपणाजवळ मागणें आहे. " लगेच " तथास्तु " म्हणून मी कैलासावर निघून गेलों. नंतर प्रातःकाळ होतांच तूं नदीमध्यें माझ्या लिंगाचें विसर्जन करून सखीसह पारणें सोडलेंस.

हिमालय घोर अरण्यामध्यें शिरला, तेव्हां तूं व तुझी सखी अशा दोघी जणी नदीच्या कांठीं निजलेल्या त्याच्या दृष्टीस पडलां. त्याबरोबर तो तुझ्याजवळ येऊन म्हणतो, " हे मुली, तूं अरण्यांत कां बरें आलीस ? " तेव्हां तूं म्हणालीस, " बाबा, माझा शंकराशीं विवाह करून देत असाल तरच मी घरीं येईन, नाहींपेक्षां येथेंच राहण्याचा निश्चय केला आहे. " त्यावर पित्यानें, " तुझ्या म्हणण्या-प्रमाणें करतों " असें सांगून तुला घरीं नेलें व नंतर विवाहाची तयारी करून तुला मला अर्पण केलें. सारांश, तूं जें व्रत केलेंस त्याच्या प्रभावानें तुला सौभाग्य मिळालें. हें उत्तम व्रत अद्याप मी

कोणास सांगितलें नव्हतें. तें मीं तुला आज सांगितलें. या व्रताचें नांव कसें प्राप्त झालें, तें सांगतों, ऐक. आलि म्हणजे सखी तिनें तुझें हरण केलें म्हणून या व्रताला हरितालिका असें म्हणतात.

**धार्मिक विधि व रूढिः**—भाद्रपद शु० ३ च्या दिवशीं मुलींनीं व सुवासिनींनीं आवळकटी अगर आवळा तेल लावून स्नान करावें. स्नान केल्यानंतर नदींतील वाळू आणून तीन शिवलिंगें करून भक्तिपूर्वक पूजा करावी. पूजा झाल्यावर ब्राह्मणास सौभाग्य-वायन देऊन नमस्कार करावा. सर्व दिवसभर उपोषण करावें. जी स्त्री उपोषण करणार नाहीं तिला सात जन्मपर्यंत संतति होणार नाहीं, प्रत्येक जन्मीं वैधव्य प्राप्त होईल, आणि शेवटीं नरक प्राप्त होईल. या दिवशीं शिजविलेले पदार्थ खाऊं नये. तसेंच पाणीही पिऊं नये अशी रूढि आहे. रात्रीं जागरण करून हरितालिकेची कथा ऐकावी. दुसरे दिवशीं सकाळीं शिवलिंगाची उत्तरपूजा करून महानैवेद्य दाखवून तीं लिंगें विसर्जन करावीं. याप्रमाणें जी स्त्री हें व्रत करील तिला इहलोकीं सौख्य मिळून परलोकींही सुख होईल.

वास्तविक पाहिलें असतांना हें व्रत कुमारिका मुलींनीं करणें योग्य दिसतें. परंतु लग्न झाल्यावर हें व्रत आचरण्याचा परिपाठ जास्त दिसतो. पतीच्या मरणानंतरही स्त्रिया उपोषण करितात.

सांप्रत काळीं एका बाजूस पार्वती व एका बाजूस तिची सखी आणि मध्यें शिवलिंग अशीं मातीचीं चित्रें आणवून त्यांची पूजा करण्याची चाल आहे व ती शास्त्रविहित आहे.

---

## ५. ऋषिपंचमी

हें व्रत भाद्रपद शु० ५ च्या दिवशीं येतें. त्याच्यासंबंधानें ब्रह्मांडपुराणांत कथा आहे ती अशीः—

सिताश्व राजानें ब्रह्मदेवास विचारल कीं, "स्त्रियांना रजोदोषांपासून मुक्त करणारें एखादें व्रत आहे काय? तें पूर्वीं कोणीं केलें होतें? त्यास कोणता फायदा झाला? हें सर्व सविस्तर सांगा."

**ब्रह्मदेवः**—वैदर्भ शहरांत उत्तंक व त्याची बायको सुशीला अशीं राहात असतां त्यांस एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन मुलें झालीं. मुलगी मोठी झाल्यावर तिचें लग्न करून दिलें; परंतु दुर्दैवानें तिचा पति निधन पावला. पति निधन पावल्यामुळें ती बापाच्या घरीं राहात असे.

उत्तंकानें आपल्या मुलास सर्व व्यवस्था सांगून तो स्त्री व कन्येसह अरण्यांत राहाण्याकरितां निघून गेला. अरण्यांत गेल्यावर उत्तंक शिष्यांस विद्या शिकविण्यांत आपला सर्व वेळ घालवीत असे. मुलगी आपल्या आईबापांची शुश्रूषा करण्यांत आपला वेळ खर्च करीत असे.

एके दिवशीं सर्व कामें आटोपल्यावर ती मुलगी निजली असतां कांहीं वेळानें तिच्या सर्व शरिराचे किडे झाले. (पूर्वजन्मीं तिनें ऋषीपंचमीच्या व्रताचा अपमान केला होता.) किडे झालेले पाहतांच शिष्यांस आश्चर्य वाटलें. शिष्यांनीं ती आश्चर्यकारक गोष्ट गुरुपत्नीस सांगितली. पुढें गुरुपत्नीनें ती गोष्ट आपल्या पतीस सांगितली व म्हणाली, "अस होण्याचें कारण काय?" उत्तंकानें समाधि लावून पाहिलें. तो म्हणाला, आपल्या कन्येचा पूर्वजन्मीं ब्राह्मणकुळांत जन्म झालेला असून तिनें रजस्वलेचा विटाळ धरिला

नाहीं व घरामध्यें सर्व भांडयांना स्पर्श केला. त्या दोषामुळें तिला हल्लींची स्थिति प्राप्त झाली आहे. त्यावर सुशीलेनें उपाय विचारला असतांना उत्तंकानें सांगितलें कीं, एक 'ऋषीपंचमी' नांवाचें व्रत आहे तें हिनें केलें तर ती सर्व पातकांपासून मुक्त होईल. नंतर सुशीलेनें आपल्या मुलीकडून तें व्रत यथासांग करविलें. व्रत केल्यामुळें ती पातकांपासून मुक्त झाली.

भविष्योत्तर पुराणांत श्रीकृष्णानें धर्मराजास कथा सांगितली ती अशी:—

२. पूर्वीं वैदर्भ शहरांत सुमित्र नांवाचा विद्वान् ब्राह्मण आपल्या स्त्रीसह राहात असे. एके दिवशीं त्या स्त्रीस ऋतु प्राप्त झाला असतां तिनें घरांतील सर्व कामें केलीं. त्या दोषामुळें तिला मरणानंतर कुत्रीचा जन्म आला व त्या सुमित्र ब्राह्मणास तिच्या संगतीमुळें बैलाचा जन्म आला. कर्मधर्मसंयोगानें तीं दोघें आपल्या मुलांच्या घरींच येऊन राहिलीं होतीं. तीं सदाचरणी व धर्माप्रमाणें वागणारीं असल्यामुळें त्यांस पूर्वजन्मींचें ज्ञान होतें.

एके दिवशीं त्यांचाच श्राद्ध दिवस असल्यामुळें त्यांच्या मुलानें ब्राह्मण बोलावून यथासांग श्राद्ध केलें; परंतु त्या दिवशीं कुत्रीस व बैलास कांहीं एक खावयास मिळालें नाहीं. उलट कांहीं कारणानें कुत्रीस मार मात्र बसला व बैलास फार काम पडलें.

त्याच दिवशीं रात्रीं तीं दोघें (सुमित्र व त्याची स्त्री) गोष्टी बोलत असतां त्या मुलाच्या कानीं त्यांचें तें बोलणें पडलें. त्यावरून तीं दोघें आपलीं मातापितरें आहेत असें त्याला कळून आलें. नंतर तो लागलीच उठला व त्यानें कुत्रीस आणि बैलास पोटभर खावयास घातलें.

आपल्या मातापितरांची अशी स्थिति झालेली पाहून त्याला फार दुःख झालें. लगेच तो अरण्यांत गेला व ऋषिमंडळींस विचारूं लागला कीं, "काय केलें असतां माझीं मातापितरें मुक्त होतील?" त्यावर ऋषींनीं सांगितलें कीं, 'आपल्या स्त्रीसह ऋषिपंचमीचें व्रत कर म्हणजे त्यायोगें तुझे आईबाप मुक्त होतील.' नंतर ऋषींच्या वचनाप्रमाणें स्त्रीसह त्यानें ऋषिपंचमीचें व्रत केलें. त्यायोगानें सुमित्र व त्याची स्त्री मुक्त होऊन स्वर्गांत गेलीं.

**धार्मिक विधि व रूढिः**—रजोनिवृत्तीनंतर (विटाळ गेल्यावर) स्त्रियांनीं या दिवशीं दुपारीं नदींत, तलावांत अगर अन्य ठिकाणीं पंचगव्य घेऊन आघाड्याच्या समिधांनीं दांत घांसून स्नान करावें. स्नान करण्याच्या अगोदर सुवासिनींनीं अंगास माती व केसास तीळ व आंवळे वांटून लावावे व विधवांनीं गोमय लावावें. स्नान केल्यावर सोंवळें वस्त्र नेसून पाटावर सप्तऋषि म्हणून (**कश्यप, अत्रि, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि** आणि **वसिष्ठ**) सात सुपाऱ्या व शेजारीं **अरुंधती**ची एक सुपारी मांडून पूजा करावी. ब्राह्मणास वायन व दक्षिणा द्यावी व नमस्कार करावा. या दिवशीं बैलाच्या श्रमाचे कोणतेही पदार्थ खाऊं नयेत. फक्त मनुष्याच्या श्रमाचेच पदार्थ खावे. दुपारीं ऋषिपंचमीची कथा ऐकावी. याप्रमाणें सात वर्षे हें व्रत केल्यानें पूर्वीं घडलेल्या वर वर्णन केलेल्या सर्व पातकांचा (कायिक, वाचिक व मानसिक) नाश होतो.

**उपसंहारः**—श्रावणीच्या दिवशीं व रोज ब्रह्मयज्ञ करतेवेळीं सप्तऋषींचें स्मरण पुरुषवर्गाला होत असतें. परंतु स्त्रीवर्गाकडून त्यांचें स्मरण व्हावें एवढ्याकरितां हें व्रत आचरण्यांत आलें असावें असें वाटतें.

## ६. महालक्ष्मी

आश्विन शु० ८ च्या दिवशीं फक्त चित्तपावन लोकांमध्यें महालक्ष्मीची पूजा करण्याची चाल आहे. या व्रताच्या उपपत्ती-संबंधानें पुराणांतरीं कोठें आधार नाहीं. वरील दिवशीं पिठाची महालक्ष्मीची मूर्ति करून तिची पूजा करितात. ज्याप्रमाणें मंगळा-गौरीची पूजा पुष्कळ मुली एकत्र जमून करितात, त्याप्रमाणें महा-लक्ष्मीची पूजा करण्याची वहिवाट आहे. लग्न झाल्यानंतर पांच वर्षें पूजा केलीच पाहिजे असा शास्त्रनिर्बंध आहे. दुपारीं भक्तिपूर्वक पूजा करून पंचारती दाखवावी. ज्या सुवासिनींनीं पूजा करावयाची असते, त्यांनीं आपआपल्या घराहून शिधा आणण्याची चाल आहे. नंतर सर्व सुवासिनींनीं मिळून सुग्रास भोजन मौन धारण करून करावें. त्याचप्रमाणें रात्रींही भोजन करून गीत, नृत्य वगैरे मनोरंजक खेळ करून सर्व रात्रभर जागरण करावें. मुख्यतः घागरी फुंकणें हा खेळ जास्त प्रचारांत आहे. त्या वेळेस कांहीं सुवासिनींच्या अंगांत देवी संचार करिते. देवीचा संचार झाल्यावर ती सुवासिनी वाटेल तो पदार्थ आणून देते. तसेंच दुसऱ्याच्या मनांतील हेतूही सांगते. दुसऱ्या दिवशीं सकाळीं महालक्ष्मीचें विसर्जन करावें.

# स्त्री-पुरुषांकरितां

## १. गंगोत्सव (दशहरा)

ज्येष्ठ शु० १ पासून ज्येष्ठ शु. १० पर्यंत गंगेचा उत्सव करितात. यासच **दशहरा** असें दुसरें नांव आहे. (दशहरा-दहा पातकांचा नाश.)

**उपपत्तिः**—सूर्यवंशामध्यें सगर नांवाचा राजा होऊन गेला. त्यानें अश्वमेध यज्ञ करण्याचें मनांत आणिलें व त्याप्रमाणें सार्वभौमत्व-सूचक घोडा सोडून त्याच्या संरक्षणाकरितां सैन्यही पाठविलें. तो घोडा जातां जातां कपिलमहामुनि तपश्चर्या करण्याकरितां बसले होते त्या बाजूनें गेला. इकडे सगर राजाच्या सैन्यास घोडा कोठेंच दिसेना, म्हणून तें परत आलें. सैन्य परत आलेलें पाहतांच सगर राजानें आपले पुत्र घोडयाच्या शोधाकरितां पाठविले. त्यांना कपिलमहामुनींच्याजवळ घोडा चरत असतांना दिसला. त्याबरोबर कपिलमहामुनींनींच घोडा चोरून नेला अशी कल्पना करून ते सगर राजाचे पुत्र त्यांना अद्वातद्वा बोलूं लागले. हे शब्द ऐकतांच संतप्त झालेल्या कपिलमहामुनींनीं नेत्र उघडून त्या सर्व पुत्रांचें भस्म करून टाकिलें.

पुढें सगराचा नातू अंशुमान हा घोडयाच्या शोधार्थ निघाला. शोधतां शोधतां त्या अंशुमानाला कपिलमहामुनींच्याजवळ घोडा चरतांना दिसला. हें पाहतांच अंशुमानानें त्या मुनींस साष्टांग नमस्कार घातला. त्याबरोबर कपिलमहामुनि संतुष्ट झाले व म्हणाले, "हे अंशुमाना, तूं हा घोडा घेऊन जा. तुझे हे चुलते भस्म होऊन येथें पडले आहेत, ते गंगोदकाशिवाय जिवंत होणार

नाहींत." हें मुनींचें भाषण श्रवण करून व त्यांस नमस्कार करून अंशुमान घोडा घेऊन परत आला. घोडा आलेला पाहतांच सगर राजानें आरंभिलेला यज्ञ पुरा केला. नंतर अंशुमानास राज्य देऊन सगर राजा तपश्चर्या करण्याकरितां वनांत निघून गेला.

कपिलमहामुनींच्या सांगण्यावरून अंशुमानानें गंगा आणण्याकरितां पुष्कळ तपश्चर्या केली, परंतु त्याला यश आलें नाहीं. अंशुमानाचा मुलगा दिलीप यानेंही पुष्कळ वर्षें तपश्चर्या केली, परंतु बापाप्रमाणें त्यालाही यश आलें नाहीं. पुढें दिलीपाचा मुलगा भगीरथ यानें अत्यंत कडक अशी तपश्चर्या केली. त्या तपश्चर्येच्या प्रभावानें गंगा प्रसन्न झाली व म्हणाली, "हे भगीरथा, तुझी तपश्चर्या पाहून मी संतुष्ट झालें आहें, तुझी इच्छा असेल तो वर माग." त्याबरोबर त्या भगीरथानें आपला हेतु गंगेस सांगितला. त्यावर गंगा म्हणाली, "मी स्वर्गांतून भू-लोकाला आलें तर माझा वेग सहन कोण करणार? तसेंच माझ्या उदकामध्यें पापी लोक आपलें पाप धुऊन टाकतील. त्या पातकापासून माझी मुक्तता कोण करणार?"

**भगीरथः**—हे गंगे, या पृथ्वीवर पुष्कळ साधु, तपोनिष्ठ आहेत. ते आपल्या स्पर्शानें तुझीं पातकें नाहींशीं करतील. तसेंच महाशक्तिमान् जो शंकर तो तुझा वेग सहन करील. इतकें बोलून तो भगीरथ राजा शंकरास प्रसन्न करून घेण्यासाठीं तपश्चर्या करूं लागला. कांहीं दिवसांनीं शंकर प्रसन्न झाले व 'वर माग' असें म्हणाले. त्यानंतर भगीरथ राजानें आपला हेतु सांगितला. त्यावर शंकर म्हणाले, "हे भगीरथ राजा, तुझे हेतु मी पूर्ण करीन."

नंतर भगीरथ राजा ज्या ठिकाणीं आपले पूर्वज भस्म होऊन पडले होते, त्या ठिकाणीं जाण्यास निघाला आणि आपल्या पाठी-

मागून गंगेस येण्याविषयीं सांगितलें. ज्या ठिकाणीं सगरपुत्र भस्म होऊन पडले होते, त्या ठिकाणीं गंगेचा स्पर्श होतांच ते सगरपुत्र स्वर्गास गेले.

भगीरथ राजानें गंगेस स्वर्गलोकांतून भूतलावर आणिलें, तो दिवस ज्येष्ठ शु० १० चा होता. भगीरथाच्या नांवावरून गंगेस भागीरथी असें नांव पडलें.

**धार्मिक विधि व रूढिः**—ज्येष्ठ शु० १ पासून दशमीपर्यंत रोज सकाळीं गंगेचें स्नान करून पूजा करावी. (गंगा नसेल तर दुसरी कोणतीही नदी चालेल) याप्रमाणें दहा दिवस स्नान केलें म्हणजे दहा जन्मांचीं पातकें* नाहींशीं होतात. दहा दिवस स्नान करावयास सवड नसेल तर निदान दशमीच्या दिवशीं तरी स्नान अवश्य करावें, असें पुराणांत सांगितलें आहे. गंगेमध्यें कांहीं पदार्थ अर्पण करावे. त्याप्रमाणें दहा शेर तीळ, दहा गाई दहा ब्राह्मणांस दान द्याव्या. घरीं आल्यावर दहा ब्राह्मण व दहा सुवासिनींसह मिष्टान्न भोजन करावें. वरीलप्रमाणें सामर्थ्य नसेल तर दशमीच्या दिवशीं गंगेमध्यें उभें राहून दहा वेळ गंगास्तोत्राचा पाठ करावा. म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें फळ प्राप्त होईल.

ज्या प्रसिद्ध नद्या आहेत, त्यांच्या कांठच्या शहरीं गंगोत्सवाचा समारंभ मोठ्या प्रमाणांत साजरा करितात. नदीच्या कांठीं मोठा मंडप पसरून तेथें गंगेची प्रतिमा मांडून उत्तम प्रकारची आरास करितात व कथा, ब्राह्मणभोजन वगैरे समारंभ करितात.

---

* **दहा पातकें**—१ कठोर भाषण. २ खोटें भाषण. ३ चहाडी. ४ बडबड. ५ चोरी करणें. ६ हिंसा. ७ परस्त्रीगमन. ८ दुसऱ्याचें वित्त हरण करणें. ९ दुसऱ्याचें वाईट चिंतणें. १० दुराग्रह.

प्रतिपदेपासून दशमीपर्यंत प्रत्येक स्त्री आपल्या ऐपतीप्रमाणें ब्राह्मणास वायन देते. फळें, फुलें वगैरे वायन पदार्थांची संख्या दहाच असली पाहिजे असा निर्बंध आहे.

---

## २. महाएकादशी (आषाढ शु० ११)

प्रत्येक महिन्यांत दोन एकादशा याप्रमाणें सबंध वर्षांत चोवीस एकादशा येतात. त्यांस निरनिराळीं नांवें आहेत. त्यांपैकीं आषाढी एकादशीस शयनी (श्रीविष्णु निजतात असें मानितात) एकादशी व कार्तिकी एकादशीस प्रबोधिनी (श्रीविष्णु जागे होतात) एकादशी अशीं नांवें आहेत.

एकदां पांडवांनीं श्रीकृष्णास प्रश्न केला कीं, "ब्राह्मणाचा वध केल्यापासून होणाऱ्या पातकाचा नाश कोणत्या उपायानें होईल?" तेव्हां भगवान् म्हणाले, "एकादशीचें व्रत केल्यानें सर्व पातकें नाश होतील." एकादशीसंबंधानें कथा आहे ती अशी:— मृदुमान्य या नांवाच्या दैत्यानें शंकराची आराधना करून त्यास प्रसन्न करून घेतलें. शंकरानें "तूं कोणत्याही प्राण्याकडून मरणार नाहींस; फक्त एका स्त्रीच्या हातून मरशील" असा वर दिला. वर मिळाल्यामुळें त्यानें सर्व देवांस जिंकून टाकिलें. पुढें श्रीविष्णूस जिंकण्यासाठीं तो वैकुंठास गेला. तेथें मृदुमान्याची व श्रीविष्णूची लढाई झाली. तींत श्रीविष्णु पराभव पावले. शेवटीं विष्णूसह सर्व देव शंकराकडे गेले. प्रत्यक्ष शंकरानेंच वर दिलेला असल्यामुळें त्यासही त्याचा प्रतिकार करितां आला नाहीं.

नंतर ब्रह्मा, विष्णु, महेश व इतर देव एका पर्वताच्या गुहत जाऊन लपले. कांहीं दिवसांनीं त्या त्रैमूर्तींच्या श्वासानें एक देवी निर्माण झाली. हीच एकादशी होय. त्या देवीनें सर्व देवांस अभय देऊन स्वत: त्या दैत्याशीं लढून त्याला ठार केलें. दैत्य मरण पावला हें पाहतांच सर्व देवांनीं तिची स्तुति केली. स्तुतीच्या ,योगानें ती प्रसन्न झाली व म्हणाली, " माझ एकादशीचें व्रत जे लोक करतील ते सर्व पातकांपासून मुक्त होतील. " तेव्हांपासून हें एकादशीचें व्रत करण्याची चाल पडली असावी. हें व्रत प्रत्येक मनुष्यानें केलेंच पाहिजे. जो हें व्रत करणार नाहीं त्याला पाप लागतें असें शास्त्रांत सांगितलें आहे.

**धार्मिक विधि व रूढि**:—दशमीच्या दिवशीं नक्त करावें. एकादशीच्या दिवशीं सकाळीं पवित्र नदीमध्यें स्नान करून आपल्या आवडत्या देवाची-विशेषत: विष्णु, नारायण, कृष्ण, लक्ष्मीकेशव वगैरे देवतांची पूजा करून उपोषण करावें. पूजेच्या वेळीं एक हजार अगर एकशेंआठ तुळसी वाहाव्या. उपोषण करावयाचें तें तुळसीपत्र अगर तीर्थ घेऊन करावें. रात्रीं ईश्वरभजनांत काळ घालवावा. दुसरे दिवशीं सूर्योदय झाल्यावर पारण सोडावें. द्वादशीस दिवसा निजूं नये व सायंकाळीं भोजनही करूं नये.

**उपदेश**:—एकादशीचें व्रत आठ वर्षांपासून ऐंशीं वर्षांपर्यंत करावें. प्रकृति चांगली निकोप असेल तर पुढेंही करावें. सौभाग्यवती स्त्रियांनीं पिता किंवा पति यांची अनुमति घेऊन कोणतेंही व्रत करावें. अनुमति घेतल्याशिवाय व्रत केलें तर पतीचें आयुष्य कमी होतें. उपोषण करण्यास शक्ति नसेल तर त्यांनीं फलाहार करावा. अशा पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टी शास्त्रांत सांगितल्या आहेत; परंतु सांप्रत काळीं त्याच्या अगदीं उलट स्थिति दिसून येते. एकादशी

कोणत्या दिवशीं येते हसुद्धां पुष्कळ लोकांस माहीत नसतें. मग प्रत्यक्ष एकादशी करणारे लोक विरळाच सांपडावयाचे हें निराळ सांगावयास नकोच. इंग्रजी राज्य सुरू झालें तेव्हांपासून तारखेचें महत्त्व फार वाढलें !

**उपसंहार**:—ज्ञानदेव, तुकाराम वगैरे भक्तमंडळींनीं श्रीक्षेत्र पंढरपुरास जाण्याचा संप्रदाय घालून ठेविला आहे, तो आजपर्यंत एकसारखा सुरू आहे.

एकादशीचें व्रत केल्यानें पुण्यप्राप्ति होतेच, पण दुसराही एक फायदा होतो. पंधरा दिवसांतून एक दिवस उपोषण केलें तर अजीर्ण न होतां प्रकृति साफ राहून कोणताही रोग होण्याची भीति नसते. म्हणजे एकादशी केल्यापासून स्वार्थ साधून परमार्थही साधतो.

---

## ३. अनंतचतुर्दशी

हें व्रत भाद्रपद शु० १४ स येतें. त्यासंबंधानें गुरुचरित्रांत एक कथा आहे ती अशी:—पांडव वनवासांत असतांना त्यांनीं श्रीकृष्णाची प्रार्थना केली कीं, “कोणत्या उपायानें आम्हांस राज्य-प्राप्ति होईल?” तेव्हां श्रीकृष्ण म्हणाले, “अनंताचें व्रत केलें असतां इच्छित हेतु पूर्ण होतील. प्राचीन काळीं सुमंतु नांवाच्या ब्राह्मणाला एक सुशीला नांवाची कन्या होती. कांहीं दिवसांनीं सुशीलेची आई स्वर्गवासी झाली. नंतर सुमंतूनें दुसरी स्त्री केली. ती स्वभावानें दुष्ट असल्यामुळें सुशीलेस फारच दुःख होऊं लागलें. पुढें सुमंतूनें तिचें कौंडिण्य ऋषीबरोबर लग्न लावून दिलें. नंतर सावत्र

मातेच्या छळामुळ ती पतीबरोबर अरण्यांत निघून गेली. फिरतां फिरतां तीं दोघें एका नदीच्या कांठीं जाऊन पोहोंचलीं. त्या नदी-कांठीं पुष्कळ स्त्रिया लाल रंगाचीं वस्त्रें नेसून कलशाची (तांब्याची) पूजा करितांना सुशीलेच्या नजरेस पडल्या. सुशीलेनें त्यांना विचारलें, 'हें तुम्ही कोणतें व्रत करितां व त्यापासून कोणता फायदा होतो?' तेव्हां त्या स्त्रियांनीं, 'आम्ही अनंतव्रत करीत आहों व तें सर्वफल देणारें आहे' असें सांगितलें. हें ऐकतांच तिनें लाल दोरा घेऊन, त्याला चौदा गांठी मारून तत्काळ भक्तिपूर्वक अनंतव्रत केलें. त्या व्रताच्या योगानें त्यांस वैभव प्राप्त झालें. वैभव प्राप्त झालेलें पाहातांच सुशीलेनें अनंतव्रताचा महिमा सांगितला; परंतु तो कौंडिण्य ऋषीस पसंत न पडून त्यान उलट रागानें हातांत बांधलेला दोरा काढून अग्नींत भस्म करून टाकिला.

"कांहीं दिवसांनीं प्राप्त झालेलें वैभव नष्ट झालें व त्यांस अगदीं वाईट स्थिति प्राप्त झाली. तेव्हां हा हानिकारक प्रकार कां झाला म्हणून कौंडिण्यऋषि समाधि लावून पाहूं लागले. तों त्यास खरा प्रकार दिसून आला. आतां अनंताच्या दर्शनाशिवाय अन्नग्रहण करणार नाहीं असा त्यानें पक्का निश्चय करून तो अरण्यें फिरूं लागला. याप्रमाणें पुष्कळ दिवस अरण्यें फिरून फिरून अनंताचा शोध लागेना, तेव्हां तो व्याकुळ होऊन भूमीवर पडला. त्याची ती सकाम भक्ति पाहून प्रत्यक्ष अनंत प्रगट झाले व त्याचें सांत्वन करून त्याला संतुष्ट केलें." याप्रमाणें श्रीकृष्णानें अनंताचा इतिहास सांगून पांडवांकडून यथासांग अनंतव्रत करविलें. त्या योगानें त्यांस लवकर राज्यप्राप्ति झाली.

**धार्मिक विधि व रूढिः**—भाद्रपद शु० चतुर्दशीच्या दिवशीं सर्व कामें आटोपून माध्यान्हकाळीं स्नान करून भक्तियुक्त अंतः-

करणानें अनंताची पूजा करावी. शुद्ध उदकाचा भरलेला कलश (तांब्या) चौरंगावर मांडून त्यास दोन पंचे गुंडाळावे व त्यावर दर्भाचा शेष (सर्प) तयार करून ठेवावा. कलशावरील पात्रांत अनंताची प्रतिमा किंवा शालिग्राम मांडून षोडशोपचारें पूजा करावी. त्याचप्रमाणें चौदा गांठी मारलेला असा तांबडा रेशमाचा दोरा घेऊन त्याचीही पूजा करावी. पूजा झाल्यावर तो दोरा उजव्या हातांत बांधावा. ब्राह्मणांस दक्षणा देऊन पक्वान्नाचें वायन द्यावें. नंतर इष्टमित्रांसह मिष्टान्नभोजन करावें. रात्रीं गाणीं, कथाश्रवण व भोजन करून जागरण करावें. याप्रमाणें चौदा वर्षें अनंतपूजन केलें म्हणजे इच्छित हेतु सफल होतात. हें व्रत परंपरेनें कांहीं घराण्यांत चालवितात.

---

## ४. वैकुंठचतुर्दशी

कार्तिक शु० चतुर्दशीस वैकुंठचतुर्दशी असें नांव आहे. तें नांव प्राप्त होण्याचें कारण :—

एकदां श्रीविष्णु वैकुंठाहून काशीस गेले आणि मणिकर्णिकेंत स्नान करून एक हजार कमळें श्रीविश्वेश्वरास वाहण्याचा संकल्प करून पूजा करण्यास बसले. कमळें वहात असतां सहज विष्णूची परीक्षा पहाण्याकरितां शंकरानें त्यांतील एक कमळ लपविलें. त्यामुळें एका कमळाचा तोटा आला. तोटा आलेला पाहतांच श्रीविष्णून स्वतःचे नेत्रकमळ वाहून पूजा समाप्त कली. तो दिवस कार्तिक शु० चतुर्दशी होता. श्रीविष्णूची भक्ति पाहून शंकरानें

त्याला चक्र दिलें, व "तुझ्याप्रमाणें जे कोणी चतुर्दशीस मणिकर्णिकेंत स्नान करून माझी पूजा करतील त्यांस वैकुंठ प्राप्त होईल," असें सांगितलें.

**धार्मिक विधि व रूढि**:—चतुर्दशीचे दिवशीं रात्रीं प्रथम श्रीविष्णूचें व मध्यरात्रीनंतर पहांटे श्रीशंकराचें दर्शन घ्यावें. दिवसभर उपोषण करावें. या दिवशीं मणिकर्णिकेचें स्नान करणें व शिव आणि विष्णु यांच्या पूजेचें माहात्म्य विशेष आहे. ईश्वरप्राप्ति करून घेण्याकरितां देहाचीसुद्धां पर्वा ठेवितां कामा नये, हें प्रत्यक्ष भगवंतांनीं आपल्या कृतीनें लोकांस उघड करून दाखविलें आहे.

---

## ५. महाशिवरात्र

प्रत्येक महिन्याच्या कृष्ण चतुर्दशीस शिवरात्र येते. त्यांत माघ वद्य चतुर्दशी मुख्य आहे. तिला महाशिवरात्र असें म्हणतात. त्या दिवशीं शंकराचें माहात्म्य विशेष आहे. शिवरात्रीसंबंधानें शिवलीलामृतांत एक कथा आहे ती अशी :—

विंध्य पर्वतावर एक दुष्ट व्याध राहात असे. तो एके दिवशीं अरण्यांत शिकारीस गेला असतां त्याला एक शिवाचें देऊळ दिसलें. तेथें पुष्कळ लोक प्रेमानें व भक्तीनें शंकराची पूजा करण्यांत अगदीं गर्क झालेले पाहून त्याला फारच आश्चर्य वाटलें. कारण त्यानें चुकूनसुद्धां देवाचें नांव अगर पूजा केलेली नव्हती. त्यांची थट्टा करावी म्हणून तो तोंडानें शिव शिव असे शब्द बोलूं लागला. तशांत शिकार न मिळाल्यामुळें त्याला उपोषणही घडलें. यामुळें

त्याच्या हातून सहजासहजीं पुण्य होऊं लागलें. भक्ष्य न मिळाल्यामुळें भुकेनें व्याकुळ झालेला तो व्याध वेलाच्या झाडाच्या आड शिकार साधण्याकरितां लपून बसला.

इतक्यांत एक गर्भिणी हरिणी तेथें आली. तिला पाहतांच तिच्यावर बाण सोडणार तों ती म्हणाली, "हे व्याधा, मला मारूं नको. कारण मी गर्भिणी आहें. गर्भिणीला मारण्यापासून फारच पातक लागतें." त्यावर व्याध म्हणाला, "मला फार भूक लागली आहे. परंतु तुझ्याबद्दल दया उत्पन्न होऊन तुला मारूं नये असें वाटतें. तुला एवढें ज्ञान कसें प्राप्त झालें? तूं पूर्वीं कोण होतीस वगैरे सर्व हकीकत सांग."

**हरिणीः**—समुद्रांतून चौदा रत्नें * निघालीं त्यांपैकीं "रंभा" म्हणून जें रत्न निघालें तें मीच होतें. सौंदर्यानें मी फार गर्विष्ठ झालें आणि मद्यसेवन करूं लागलें. शिवरात्रीच्या दिवशीं शंकराची पूजा केली नाहीं व उपोषणही केलें नाहीं आणि हिरण्य नांवाच्या राक्षसाच्या घरीं राहूं लागलें. पुढें एके दिवशीं तो राक्षस शिकारीस गेला असतां मी शंकराचें दर्शन घेण्याकरितां कैलासास गेलें. तेव्हां रागावून देवांनीं "तूं हरिणी होशील" असा मला शाप दिला. पुढें देवांची प्रार्थना केल्यावर त्यांनीं उःशाप दिला कीं, "बारा वर्षांनीं पुन्हां तूं आपल्या स्थानीं परत येशील."

"हे व्याधा, सांप्रतकाळीं मी गर्भिणी आहें. करितां बाळंत होऊन येथें परत येईन, नंतर तूं मला मार." हे तिचे शब्द ऐकल्यावर व्याध म्हणाला, "तूं खरें कशावरून बोलतेस? प्राण वांचविणें हें

* **चौदा रत्नें**—१ लक्ष्मी, २ कौस्तुभ, ३ पारिजातक, ४ सुरा, ५ धन्वंतरी, ६ चंद्र, ७ कामधेनु, ८ ऐरावत, ९ अप्सरा (रंभा), १० उच्चैःश्रवा, ११ हालाहल, १२ शाङ्र्गधनु, १३ शंख, १४ अमृत.

प्रत्येक जीवाचें कर्तव्य आहे. करितां कांहीं तरी शपथ घेऊन जा." हरिणी म्हणाली, "जे लोक स्वधर्मानें वागत नाहींत, देवाचें भजन-पूजन करणार नाहींत, साधूंचा छळ करतील, त्या सर्वांचें पातक मी परत आलें नाहीं तर माझ्या डोक्यावर बसो." अशी शपथ घेऊन ती परत गेली. याप्रमाणें दुसरीही हरिणी शपथ घेऊन परत गेली. इतक्यांत मृग तेथें आला. तोही शपथ घेऊन परत गेला.

इकडे तो व्याध बेलाचीं पानें तोडून खालीं टाकीत होता तीं शिवलिंगावर पडत असत. यामुळ त्याच्या हातून शिवरात्रीचें व्रत अनायासें घडलें. पुढें वचन दिल्याप्रमाणें सर्व हरिणी पतींसह व बालकांसह तेथें आल्या. त्यांच्याजवळ बोलण्यांत वेळ गेल्यामुळें त्या व्याधास सहज जागरण झालें. त्या पुण्याच्या योगानें शंकर विमान घेऊन आले व व्याध आणि सर्व हरिणी यांस घेऊन स्वर्गांत गेले. तेथें त्यांस कायमचें सुख प्राप्त झालें. यावरून जे लोक महाशिव-रात्रीचें व्रत करतील त्यांस अक्षय सुख मिळेल.

**धार्मिक विधि व रूढिः**—त्रयोदशीच्या दिवशीं रात्रीं जेवूं नये. चतुर्दशीच्या दिवशीं सकाळीं पवित्र नदीमध्यें स्नान करून शिवलिंगावर रुद्राभिषेक करावा व भक्तिपूर्वक पूजा करावी. पूजेच्या वेळीं शक्य असेल तर एक लक्ष, हजार किंवा एकशें-आठ बिल्वपत्रें वहावीं. दिवसभर उपोषण करावें. रात्रीं जागरण करून शिवभजनांत काळ घालवावा. दुसरे दिवशीं पारणें सोडावें.

गोकर्ण, काशी वगैरे प्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगें[१] आहेत. त्या ठिकाणीं

---

१ **बारा ज्योतिर्लिंगें**—१ सोरटी सोमनाथ, २ महाकाल, (उज्जयिनी) ३ बदरीकेदार, ४ काशीविश्वेश्वर, ५ ओंकारेश्वर, ६ त्र्यंबकेश्वर, ७ घृष्णेश्वर, (वेरूळ) ८ नागनाथ, ९ वैजनाथ, (परळी) १० भीमाशंकर, ११ मल्लिकार्जुन, १२ रामेश्वर.

या दिवशीं मोठा उत्सव होतो. लिंगायत लोक शिवरात्रीचा दिवस फार श्रेष्ठ मानितात. स्मार्त आणि वैष्णव हे जे दोन सांप्रदाय आहेत त्यांपैकीं स्मार्त सांप्रदायी लोक शिवरात्रीचा उत्सव विशेष करितात.

**महाशिवरात्रीचें माहात्म्यः**—कपिलाषष्ठी, अर्धोदय, संक्रांत, महोदय, गजच्छाया व ग्रहण या सर्व पर्वकाळांपेक्षांही महाशिवरात्रीचें महत्त्व विशेष आहे.

---

# सामान्य सण

## १. गौरी-उत्सव (हळदीकुंकू)

या उत्सवाबद्दल शास्त्रीय आधार कोठेंच सांपडत नाहीं. फक्त रूढीमुळें हा उत्सव साजरा करण्यांत येतो. वसंतऋतूंत जिकडे तिकडे कमळें फुललेलीं दिसतात. त्या कमळांतील रस सेवन करून भुंगे पुष्ट होतात. कोकील पक्षी दाट अशा आंब्याच्या झाडांवर बसून मोठ्या आनंदानें गाणीं गात असतात. ह्या दिवसांत मंद आणि थंड वारा वाहतो आणि निरनिराळ्या प्रकारचीं फुलें फुलतात. झाडांस कोंवळी लुसलुशीत पालवी फुटते. मोरांस नवीन पिसारे फुटल्यामुळें ते मोठ्या आनंदानें नाचत असतात. अशा प्रकारचे मनाला आनंद देणारे किती तरी स्वाभाविक चमत्कार दृष्टीस पडतात. त्यांचें वर्णन करणें अशक्यच आहे.

वसंतऋतूंत पुरुषवर्गाला मनाची करमणूक करून घेण्यास पुष्कळ साधनें आहेत, तशीं स्त्रियांना स्वतंत्र वृत्तीनें करमणूक करून

घेण्यास साधनें नाहींत. सबब या ऋतूंत गौरीउत्सव करण्याची चाल पडली असावी असें वाटतें. या उत्सवाला कोणी कोणी शीतलागौरी असेंही म्हणतात.

**रूढि:**—चैत्र शु० तृतीयेपासून वैशाख शु० तृतीयेपर्यंत हा हळदीकुंकवाचा समारंभ सुरू असतो. या दिवसांत स्त्रियांना फारच आनंद होत असतो: गौरीला शृंगारून एका उंच आसनावर बसवून तिच्या आसपास उत्तम प्रकारची आरास करितात. नंतर आपल्या-जवळ राहणाऱ्या सुवासिनी स्त्रियांस हळदीकुंकू घेण्यास आमंत्रण करितात. त्या आल्या म्हणजे हरभऱ्यांनीं आणि फळांनीं त्यांच्या ओट्या भरतात. ओट्या भरून झाल्यावर शक्य असल्यास पेढे, बत्तासे व पन्हें वगैरे देतात. रात्रौ गौरीपुढें फुगड्या, गाणीं वगैरे प्रकार कोठें कोठें चालतात. कोणी कोणी सायंकाळींच विसर्जन करितात. अशा रीतीनें गौरी-उत्सव साजरा करण्याची रूढि पडली आहे.

---

## २. पोळा

हा सण श्रावण वद्य अमावास्येला येतो. या सणाचें महत्त्व शतकरी लोकांत फार आहे. शास्त्रीय दृष्ट्या या सणाचें महत्त्व नसून अलीकडे शेतकरी लोकांनीं हा सण प्रचारांत आणिला आहे. विशेषेंकरून हा सण बैलांकरितां आहे असें म्हटलें तरी चालेल. शेतकरी लोक या दिवशीं बैलांना स्वच्छ धुऊन त्यांच्या अंगाला हिंगूळ लावितात, शिंगांना बेगड लावितात, गळ्यांत सुंदर माळा व पायांत घुंगुर बांधितात. तसेंच पाठीवर झुली घालतात. एकंदरींत बैलांना नाना प्रकारांनीं सजवितात. दुपारीं पुरणपोळीचें जेवण तयार करून तें बैलास खावयास घालतात.

या वेळीं शेतीचीं सर्व कामें आटोपलीं असल्यामुळें बैलांस कांहीं एक काम नसतें. कांहीं कांहीं शेतकरी लोक मुद्दाम पोळ्याच्या अगोदर पंधरा दिवस खुराक घालून बैलांस पुष्ट करितात. अशा पुष्ट बैलांच्या शर्यती करमणुकीसाठीं लावितात. रात्रीं त्या बैलांची वाजतगाजत मिरवणूक काढितात. कांहीं ब्राह्मण लोक मातीचा बैल तयार करून त्याची पूजा करितात. हा सण कोंकणांत नसून विशेषतः देशावर पाळण्याची चाल आहे. कोंकणांत मार्गशीर्ष शु० प्रतिपदेस बैलांकडून कोणतेंही काम करवून घेत नाहींत. त्या दिवशीं त्यांस वडे खावयास घालण्याची चाल आहे. आमच्या पूर्वजांनीं आपल्याकरितां निरंतर शरीर झिजविणाऱ्या मुक्या प्राण्यांचीसुद्धां मान्यता ठेविली आहे, हें वरील सणावरून उघड दिसतें.

---

## ३. महालक्ष्मी ( ज्येष्ठागौरी )

भाद्रपद शु० अष्टमीला लक्ष्मीचा उत्सव करितात. याविषयीं कथा आहे ती अशीः—

पूर्वीं एके काळीं राक्षसांपासून सव लोकांस त्रास होऊं लागला, म्हणून सर्व स्त्रिया एकत्र होऊन लक्ष्मीस शरण गेल्या आणि आपलें सौभाग्य कायम राहाण्याकरितां विनंति करूं लागल्या. त्यांच्या विनंतीवरून लक्ष्मीन दुष्ट राक्षसांस ठार मारून सर्व प्राण्यांस सुखी केलें व स्त्रियांसही सौभाग्य मिळवून दिलें. तेव्हांपासून महालक्ष्मीची पूजा करण्याची वहिवाट पडली असावी.

**धार्मिक विधि व रूढिः**—गौरीस अनुराधा नक्षत्रावर आणून ज्येष्ठा नक्षत्रावर पूजा करतात आणि मूळ नक्षत्रावर विसर्जन

करितात; असा लक्ष्मीचा तीन दिवस उत्सव करितात. कोणी धातूची, मातीची अगर कागदावर काढलेल्या देवीची पूजा करितात. कोणी कोणी तर नदीकांठचे सात दगड आणून त्यांची पूजा करितात. रात्रीं गाणीं, फुगड्या वगैरे खेळ करून जागरण करितात. गौरीबरोबर गणपतिविसर्जन करण्याची चाल कोठें कोठें आढळून येते. हा उत्सव बहुतकरून स्त्रियांचाच आहे. खालच्या वर्गांत या उत्सवाचें महत्त्व विशेष आहे. गौरीविसर्जनाच्या दिवशीं हे लोक गाणीं म्हणत म्हणत रस्त्यावरून नाचत जात असतात.

अनुक्रम २८ विभाग ... ११ क्रमांक ... नों. दि. ३१

---

## ४. नवरात्रोत्सव

आश्विन शु० प्रतिपदेपासून नवमीपर्यंत नऊ दिवस नवरात्र म्हणण्याचा परिपाठ आहे. जगांत जेव्हां दुष्ट लोक पराक्रमी होतात व सर्व लोकांस त्रास देतात, तेव्हां शक्तिदेवी अवतार घेऊन त्या दुष्टांचा नायनाट करून सर्व लोकांस सुखी करिते, असें पुराणांतरीं सांगितलें आहे.

**धार्मिक विधि व रूढि**:—आश्विन शु० प्रतिपदेस देवीच्या देवळांत अगर कुलाचाराप्रमाणें प्रत्येक घरीं घटस्थापना करावी. नवमीपर्यंत सप्तशतीचा पाठ वाचावा. अहोरात्र दिवे लावावे. फुलांच्या माळा बांधाव्या. ब्राह्मण व सुवासिनींस जेवावयास बोलवाव्या. घटाशेजारीं धान्य पेरावें. त्या धान्याचे अंकुर दसऱ्याच्या दिवशीं टोपींत अगर पागोट्यांत घालावे. नवमीच्या दिवशीं होम करून त्यांत कोहळा अर्पण करावा. नऊ दिवसपर्यंत रात्रीं निरनिराळे खेळ खेळावे. अशा रीतीनें नवरात्राचे दिवस आनंदांत घालवावे.

आश्विन शु० प्रतिपदेस दौहित्र (मातामहश्राद्धदिन) असें म्हणतात. ज्या मुलाचा बाप जिवंत असून आईचा बाप मृत झाला असेल त्या मुलानें आजोबाचें श्राद्ध करावें.

आश्विन शु० पंचमीच्या दिवशीं ललिता देवीची पूजा कोणी कोणी लोक करितात. त्या दिवशीं मंत्रजागर करून दूध व कांकड्या खाण्याचा परिपाठ आहे.

---

## ५. तुलसीविवाह



दरवर्षी कार्तिक शु० द्वादशीस तुलसीविवाह करितात. तुळशी-संबंधानें कथा आहे ती अशी :—

पूर्वी जालंधर नांवाचा महापराक्रमी योद्धा होता. त्यानें सर्व देवांस जिंकून त्यांचें वैभव आपणांकडे आणून ठेविलें होतें. जालंधर सर्वांस अजिंक्य झाला होता, त्याचें कारण त्याची स्त्री वृन्दा ही महापतिव्रता होती हें होय. त्याचा नाश करण्याची युक्ति श्रीविष्णूनें कपटानें योजिली. जालंधर रणांगणांत पडला असें दाखविण्यासाठीं श्रीविष्णूनें दोन माकडांकडून त्याचें शिर व धड आणून वृन्देपुढें ठेविलें. तें पाहतांच ती शोक करूं लागली. इतक्यांत एका साधूनें संजीवनी मंत्रानें जालंधराचा वेष घेतलेल्या श्रीविष्णूस उठविलें, तो जिवंत झालेला पाहतांच तिनें मोठ्या आनंदानें त्याला आलिंगन दिलें. कांहीं दिवस श्रीविष्णु तिच्या घरीं राहिले. पुढें तिच्या हातून कांहीं पातक झाल्यामुळें खरोखर जालंधर रणांगणांत पडला. नंतर वृन्देस सर्व खरा प्रकार समजला. तेव्हां ती संतप्त होऊन श्रीविष्णूस म्हणाली, "तुला पत्नीचा वियोग होऊन दोन माकडांचें साह्य घ्यावें लागेल." (ही गोष्ट रामावतारांत घडून आली.) नंतर तिनें अग्निकाष्ठें भक्षण केलीं. कपटानें महापतिव्रतेचा छळ केल्यामुळें श्रीविष्णूस वाईट वाटलें व तो वेड्यासारखा तिच्याजवळ बसला. पुढें पार्वतीनें त्या चिते-जवळ तुळस, आंवळा व जाईचा वेल अशीं तीन प्रकारचीं झाडें निर्माण केलीं. त्यांतील तुळस हीच वृन्देप्रमाणें आहे, असें मानून त्यास प्रिय झाली. कृष्णावतारीं, त्या वृन्देनें रुक्मिणीचा अवतार घेऊन श्रीकृष्णास कार्तिक शु० द्वादशीस वरिलें. तेव्हांपासून दरवर्षी तुलसीविवाह करण्याची चाल पडली असावी.

**धार्मिक विधि व रूढि**:—या दिवशीं तुलसीवृन्दावन सारवून अगर रंग देऊन सुशोभित करितात व त्यांत ऊंस लावून आंवळा व चिंच टाकून फुलांच्या माळा बांधितात व नंतर सायंकाळीं स्नान

करून बाळकृष्णाच्या प्रतिमेशीं तुळसीचा विवाह करितात. कोणी कोणी तुळसीविवाह खऱ्या लग्नाप्रमाणें मोठ्या थाटानें साजरा करितात.

प्रत्येक हिंदु मनुष्याच्या घरीं तुळस ही असावयाचीच! तुळशीचें माहात्म्य पुरुषवर्गापेक्षां स्त्रीवर्गामध्यें जास्त आहे. प्रत्येक दिवशीं तुळशीला पाणी घालणें, प्रदक्षिणा घालणें, पूजा करणें, रांगोळी घालणें, सायंकाळीं दिवा लावणें वगैरे प्रकार स्त्रिया नियमानें करीत असतात. त्यांचें तें कर्तव्यच आहे असें समजलें जातें.

**तुळशीचें माहात्म्यः**—देवपूजा व श्राद्ध यांमध्यें तुळस अवश्य लागते. श्रीविष्णूस तुळस अत्यंत प्रिय आहे. तुळशीच्या एका पानानें श्रीविष्णु जितका संतुष्ट होतो तितका दुसऱ्या कोणत्याही पदार्थानें होत नाहीं. त्याची तुळशीच्या पानानें पूजा केली म्हणजे पुष्कळ व्रतें, यज्ञ, जप, होम, केल्याचें पुण्य लागतें. तुळशीच्या नुसत्या दर्शनानें हजारों गाई दान केल्याचें पुण्य लागतें. तुळशीच्या पानावरील गळलेलें उदक मस्तकावर धारण केलें तर त्यास गंगा-स्नानाचें व दहा गाई दान केल्याचें पुण्य लागतें. मरतेवेळीं ज्याच्या अंगावर तुळशीपत्र असेल तो पुरुष वैकुंठास जातो. तुळशीं-तील माती लोक अंगास लावितात. तसेंच तुळशीच्या माळाही पुष्कळ लोक गळ्यांत घालितात.

तुळशीमध्यें कार्बानिक ॲसिड वायु शोषून घेऊन ऑक्सिजन वायु सोडण्याचा धर्म जास्त प्रमाणांत असतो, म्हणून शरीर निरोगी राहाण्यासही तिचा उपयोग होतो. तसेंच तुळशीच्या पानांचा उपयोग औषधाकडेही करितात.

---

## ६. त्रिपुरी पौर्णिमा

कार्तिक शु० पौर्णिमेला त्रिपुरी पौर्णिमा म्हणतात. त्याच्यासंबंधानें एक कथा आहे ती अशी:—

त्रिपुर या दैत्यानें ब्रह्मदेवाची आराधना करून त्यास संतुष्ट करून घेतलें. मध्यंतरीं इतर देवांनीं त्याच्या आराधनेंत विघ्न आणण्याकरितां पुष्कळ खटपट केली; परंतु ती सर्व व्यर्थ गेली. इतक्यांत ब्रह्मदेव वर देण्यास तयार झाले. तेव्हां त्रिपुरानें "मला अमरत्व प्राप्त व्हावें" असा वर मागितला. वर मिळाल्यामुळें त्यानें सर्व देवांस त्रासवून सोडलें. प्रत्यक्ष श्रीविष्णूसही त्या त्रिपुराचा प्रतिकार करितां आला नाहीं. शेवटीं शंकरानें तीन दिवस युद्ध करून कार्तिक शु० पौर्णिमेस त्या दैत्याचा वध करून देवांस गेलेलें वैभव मिळवून दिलें. आपलें वैभव मिळालेलें पाहून सर्व देवांस आनंदीआनंद झाला व त्यांनीं शंकराची स्तुति करून दीपोत्सव केला. तेव्हांपासून प्रत्येक वर्षीं कार्तिक शु० पौर्णिमेस त्रिपुर (दगडी मोठा खांब असून सभोंवतीं दिवे लावण्याची सोय केलेली असते) लावण्याचा प्रघात पडला.

कार्तिक शु० पौर्णिमेच्या दिवशीं सर्व देवालयांतून, विशेषतः शंकराच्या देवळांतून, दिवे लावण्याची चाल आहे. या दिवशीं स्त्रिया कोहाळा आणि दीप—दान देतात.

---

## ७. चंपाषष्ठी

मार्गशीर्ष शु० ६ स चंपाषष्ठी म्हणतात. या दिवसाचें माहात्म्य सर्व ठिकाणीं नसून मुख्यतः देशावर आहे. जेजुरी वगैरे ठिकाणीं खंडोबाचीं देवळें आहेत, तेथें या दिवशीं उत्सव करितात.

श्रीशंकरानें खंडोबाचा अवतार घेऊन मणिमल्ल नांवाच्या राक्षसास ठार केलें अशी पुराणांत कथा आहे. खंडोबाला भजणारे लोक खालच्या वर्गांत फार आहेत. देशावर ह्या दिवसापासून व कोंकणांत कार्तिक शु० १५ च्या पुढें चातुर्मासांत निषिद्ध मानलेले पदार्थ खाण्याचा परिपाठ आहे.

---

# उ त्स व

## १. श्रीरामनवमी



चैत्र शु० नवमीला '**रामनवमी**' असें म्हणतात. कारण विष्णूचा सातवा अवतार 'भगवान् रामचंद्र' यांचा जन्म ह्या दिवशीं झाला.

रामजन्माची कथा मोठी मौजेची आहे. आर्यावर्तांत कोसल नांवाचा एक देश आहे. त्यांत शरयू नांवाची नदी असून तिच्या कांठीं त्या देशाची राजधानी **अयोध्या** वसली होती. ही राजधानी सर्व प्रकारें समृद्ध होती आणि ह्या राजधानींत इक्ष्वाकु वंशांतील दशरथ राजा राज्य करीत होता. तो मोठा न्यायी व राज्यकारभारांत दक्ष होता. त्याची प्रजा संतुष्ट व सुखी असून समजुतदार व शुद्ध वर्तनाची होती. त्यामुळें सर्व प्रकारचें सुख त्या देशांत नांदत होतें. दशरथ राजाला सर्व गोष्टी अनुकूल होत्या; पण एका गोष्टीची मोठी उणीव होती. त्याला तीन राण्या असून एकही पुत्रसंतान नव्हतें, म्हणून तो दुःखीकष्टी असे.

एके दिवशीं रात्रीं दशरथास स्वप्न पडलें कीं, आपल्या हातून दोन पुरुष व एक स्त्री ह्यांचा वध झाला! हें पाहून त्याला भीति वाटली व सकाळीं उठल्याबरोबर त्यानें तें स्वप्न आपले पुरोहित वसिष्ठ ऋषी ह्यांना सांगितलें. तेव्हां वसिष्ठ म्हणाले, ‘ राजा, तूं आज वनांत जाऊन तीन श्वापदांचा वध कर म्हणजे ह्या स्वप्नाचा दोष नाहींसा होईल.’ गुरूंच्या सांगण्यावरून दशरथ राजा रानांत शिकारीसाठीं गेला. दिवसभर प्रयत्न करून एकही सावज त्याला मारतां आलें नाहीं. तेव्हां सायंकाळीं पाणी पिण्यास येणाऱ्या सावजांची शिकार मिळेल ह्या आशेनें तो एका सरोवराच्या कांठीं एका झाडावर बसून सावजाची वाट पाहत होता. सांज झाली होती. स्पष्ट दिसत नव्हतें. अशा वेळीं श्रावण नांवाचा एक मातृपितृभक्त मुलगा आपल्या अंध आईबापांकरितां पाणी नेण्यासाठीं त्या सरोवराशीं आला. त्यानें कलश बुडविला त्या वेळीं ‘ बुड्बुड् ’ असा ध्वनि झाला! राजास वाटलें तें सावज असावें म्हणून त्यानें आवाजाच्या दिशेनें नेम धरून बाण मारला! राजा शब्दवेधी होता! तो बाण

नेमका श्रावणाच्या अंगांत घुसला व त्यानें किंकाळी फोडली! राजाचें काळीज थरारलें व तो लागलीच श्रावणाजवळ आला! त्याला पाहतांच श्रावणानें म्हटलें, 'मी तर आतां मरणार, पण हें पाणी माझ्या मातापित्यांना आपण द्यावें; मात्र पाणी दिल्यानंतर मग हें वर्तमान सांगावें.' राजा दुःखित मनानें तें पाणी घेऊन सांगितलेल्या ठिकाणीं गेला. त्याची चाहूल लागतांच तीं मातापितरें म्हणालीं, 'बाळा श्रावणा! इतका वेळ कां रे लागला?' राजानें न बोलतां पाणी त्यांच्यापुढें केलें पण तीं म्हणालीं, 'तूं बोलल्याशिवाय आम्ही पाणी पिणार नाहीं!' निरुपाय होऊन राजानें खरी गोष्ट त्यांना सांगितली. पुत्रनिधनाच्या दुःखानें तीं शोकाकुल झालीं व "आम्ही जसे आतां पुत्रशोकानें प्राण सोडीत आहों तसाच तूंही पण पुत्र-शोकामुळेंच प्राण सोडशील!" अशी शापवाणी त्यांच्या तोंडून निघाली. लगेच त्यांचें प्राणोत्क्रमण झालें!

राजा दुःखित अंतःकरणानें राजधानींत आला व घडलेली सर्व दुःखद हकीगत त्यानें वसिष्ठांच्या कानांवर घातली. त्यांनाही फार वाईट वाटलें; पण ते म्हणाले, 'राजा, ह्या शापांत एक गोष्ट चांगली आहे. तुला पुत्र होणार असा ह्या शापांत वरही आहे. तरी पण आपण पुत्रकामेष्टी व अश्वमेध असे दोन यज्ञ करूं म्हणजे तुला पुत्रप्राप्ति निश्चित होईल.' अर्थात्‌च राजानें आनंदानें संमति दिली व यज्ञाचें कृत्य यथासांग करण्याचें वसिष्ठांवर सोंपविलें.

शरयूच्या कांठीं मोठा यज्ञमंडप घालण्यांत आला. सर्व प्रकारची सामुग्री जमविण्यांत आली. नंतर वसिष्ठांनीं दशरथास त्याच्या तिन्ही राण्यांसह यज्ञदीक्षा देऊन यज्ञाचा घोडा सोडला. तो पुष्कळ देश फिरून परत आल्यावर त्याचें अग्नींत हवन करण्यांत आलें. अश्वमेध संपूर्ण पार पडल्यावर ऋष्यशृंग ऋषींनीं पुत्रकामेष्टि यज्ञ करण्यास

प्रारंभ केला. ऋषी मंत्रयुक्त हविर्भाग अग्नीस अर्पण करूं लागले. शेवटीं यज्ञसमाप्तीची वेळ आली तेव्हां अग्नींतून एक दैदीप्यमान पुरुष बाहेर आला. त्याच्या हातांत दिव्य पायसानें भरलेलें एक सोन्याचें भांडें होतें. त्यानें दशरथाला उद्देशून म्हटलें, "राजा, मी प्राजापत्य पुरुष तुझ्या यज्ञानें संतुष्ट होऊन तुझी इच्छा पुरी करण्यासाठीं आलों आहें; हें **पायस** तूं आपल्या राण्यांना दे म्हणजे तुला देवांसारखे पुत्र होतील." दशरथानें त्या दिव्य पुरुषाला नमस्कार करून तें पात्र घेतलें. त्याबरोबर तो पुरुष अग्नींत गुप्त झाला!

नंतर दशरथानें तें पायस आपल्या राण्यांना दिलें. प्रथम कौसल्येला अर्धा भाग दिला. राहिलेल्या अर्ध्यांतून अर्धा भाग दुसरी राणी सुमित्रा हीस दिला व बाकीचा भाग कैकेयीस दिला. परंतु पुनः मनांत आल्याप्रमाणें कैकेयीच्या भागांतून अर्धा भाग काढून सुमित्रेस दिला. याप्रमाणें तें पायस वांटून दिल्यावर त्या तिन्ही राण्यांनीं मोठ्या भक्तीनें तें प्राशन केलें. योग्य काळीं तिन्ही राण्यांना गर्भ राहून ते दिवसेंदिवस वाढूं लागले! नवमास पूर्ण झाल्यावर चैत्र महिन्याच्या शुद्ध नवमीस, सूर्य मध्याह्नीं आला असतां, पुनर्वसु नक्षत्रावर पांच ग्रह उच्चस्थानीं असून कर्क लग्नीं गुरु व चंद्र असतांना, कौसल्या राणीच्या पोटीं पुत्ररत्न जन्मास आलें!

त्याच पुत्राचें नांव '**रामचंद्र**' असें ठेवण्यांत आलें!

सुमित्रा व कैकेयी यांनाही पुत्र झाले. सुमित्रेस दोन व कैकेयीस एक. सारांश, दशरथास पुत्रसंतान मुळींच नव्हतें तेथें चार पुत्र लाभले! मग त्याचा आनंद गगनांत मावेनासा झाला हें काय सांगायला पाहिजे?

पुत्रोत्सवाच्या निमित्तानें दशरथानें ब्राह्मणांस हजारों गाई दान दिल्या आणि भांडारें खुलीं करून द्रव्य वांटून दिलें. नगरांतील

प्रजेनेंही आपला आनंद गुढ्यांतोरणें उभारून व्यक्त केला. इतकेंच नव्हे तर या वेळीं देवांनींही आकाशांतून अयोध्येवर पुष्पवृष्टि केली असें सांगतात !

ह्या अपूर्व शुभ दिवसाची पवित्र स्मृति ठेवण्यासाठीं रामनवमीचा उत्सव सर्व भरतखंडांत अव्याहत चालू आहे, रामप्रभूंच्या मोठमोठ्या देवळांतून चैत्र शुद्ध १ पासून नवमीपर्यंत नऊ दिवस कीर्तनें चालू असतात. कित्येक ठिकाणीं फक्त रामनवमीसच जन्मोत्सव होतो. जन्मोत्सवानंतर रात्रीं पालखींतून रामप्रभूची मूर्ति मिरवितात. नऊ दिवसांचा उत्सव यथासांग पार पडल्यानंतर दशमीच्या दिवशीं समाराधना करण्याचाही प्रघात पुष्कळ ठिकाणीं आहे. कित्येक ठिकाणीं दशमीचे दिवशीं ललित करण्याचीही रीत आहे. ललित झालें म्हणजे या उत्सवाची समाप्ति झाली असें समजतात.

---

# २. श्रीकृष्णजयंती



भगवान् रामचंद्रानंतर आठवा अवतार 'श्रीकृष्ण' ह्या नांवानें झाला. रामचंद्राच्या जन्मकथेपेक्षां श्रीकृष्णजन्माची कथा अद्भुत व मनोरंजकही आहे. श्रावण वद्य अष्टमीस कृष्णाष्टमी असेंही म्हणतात! ह्या दिवशीं मध्यरात्रीं श्रीकृष्णाचा जन्म झाला. तेव्हांपासून हा उत्सव सर्व भारतवर्षांत चालू आहे.

आर्यावर्तांत शूरसेन देश असून त्यांतून यमुना नदी वाहत आहे. मथुरा नांवाची या देशाची राजधानी ह्या नदीच्या दक्षिण तीरावर वसलेली होती. या देशांत सोमवंशीय क्षत्रियांच्या वसाहती होत्या त्यांत यादव प्रमुख असून वसुदेव नांवाचा यादव सरदार भोज राजांचा मांडलिक होता. तो गोवर्धन नांवाच्या टेंकडीजवळ आपल्या जहागिरीच्या गांवीं राहत असे. मथुरेचा राजा उग्रसेन हा

होता. ह्या उग्रसेनाचा धाकटा भाऊ देवक याची मुलगी देवकी ही वसुदेवास दिली होती.

वसुदेव देवकीचें लग्न झाल्यावर वरात निघाली. उग्रसेनाचा पुत्र कंस–म्हणजे देवकीचा चुलतभाऊ हा रथ हाकीत होता. मिरवणूक मोठ्या समारंभानें चालू झाली तोंच आकाशवाणी झाली कीं, "तूं जिची मिरवणूक नेत आहेस तिच्या आठव्या पुत्रापासून तुझा मृत्यु होणार आहे, हें लक्षांत ठेव!"

हे शब्द कानीं पडतांच कंसाला संताप आला! लगेच तो रथांतून उतरला व तलवारीनें देवकीचा वध करण्यास धांवला! वसुदेवानें प्रसंगावधान दाखवून कंसाला अडविलें व तो म्हणाला, 'कंसा! तूं मोठा शूर पुरुष असून प्रत्यक्ष बहिणीचा वध करायला तयार होतोस! तुझ्यासारख्या शूराला हें शोभत नाहीं. पण कंस आपला हट्ट सोडीना! शेवटीं, "देवकीला जें जें अपत्य होईल तें तें मी तुझ्या स्वाधीन करीन," असें आश्वासन वसुदेवानें दिलें तेव्हां कंसाचें समाधान झालें व वरात यथासांग पार पडली.

पुढें कांहीं दिवसांनीं वसुदेवास पुत्र झाला व त्यानें कंसाला आश्वासन दिल्याप्रमाणें तो पुत्र कंसाच्या स्वाधीन केला! कठोर हृदयी कंसाला तें सुंदर बालक पाहून प्रेम उत्पन्न झालें व तो वसुदेवाला म्हणाला, "हा पुत्र तुम्ही घेऊन जा आणि आठवा मुलगा मात्र माझ्याकडे घेऊन या." 'ठीक आहे' असें म्हणून वसुदेवानें तो मुलगा घरीं परत आणला.

इकडे त्याच वेळीं शहराच्या बाहेरील बागेंत नारदमुनी आले होते त्यांनीं कंसाला बोलावून आणिलें व देवसभेंत तुला ठार मारण्याचे बेत चालू आहेत. वसुदेव देवकीच्या पोटीं श्रीविष्णु अवतार घेणार आहेत असें सांगितलें. हें नारदाचें भाषण ऐकतांच कंसाचें

मन पालटलें आणि तो म्हणाला, "मी देवकीचे सर्वच पुत्र मारून टाकीन आणि देवांचे वेत फिसकटवून टाकीन." असें म्हणून त्यानें वसुदेव देवकीस मथुरेंत आणवून त्यांच्याच वाड्यांत कैदेंत ठेविलें. वाड्यावर चौक्या बसविल्या व कांहीं बायांचा पहारा देवकीच्या खोलीवर ठेविला!

नारदांस सांगितल्याप्रमाणें त्यानें देवकीचे सहा पुत्र निर्दयपणानें दगडावर आपटून ठार मारिले!

पुन्हां देवकी सातव्या वेळीं गरोदर राहिली. हा सातवा गर्भ शेषाचा अवतार असल्यामुळें देवांनीं योगमायेच्या साहाय्यानें वसुदेवाची दुसरी पत्नी रोहिणी हिच्या उदरांत नेऊन ठेविला! रोहिणी ही वसुदेवाचा मित्र नंद याच्या घरीं गोकुळांत राहत होती. तेथें ती योग्य वेळीं प्रसूत झाली व तिला पुत्र झाला तोच '**बलराम**' होय.

इकडे देवकीचा सातवा गर्भ जिरला हें ऐकून कंसाला बरें वाटलें. मात्र आतां पुढच्या म्हणजे आठव्या वेळच्या गर्भाबद्दल त्यानें सर्व दूतांस सावध राहण्यास सांगितलें व तोही दक्ष राहिला! एकदां गर्भवती देवकीला पाहावें म्हणून तो त्यांच्या वाड्यांत जाऊन तिच्यापुढें उभा राहिला! पाहतो तों देवकी आनंदांत व निर्भय स्थितींत आहे. देवकीच्या गर्भाचें तेज पाहून देवकीच्या उदरांत चतुर्भुज विष्णुमूर्तीच आहे, असा भास त्याला झाला! कंस दचकला, त्याचें अंग कांपूं लागलें; न बोलतांच तो परत घरीं गेला.

नवमास पूर्ण होतांच, श्रावण वद्य अष्टमी मध्यरात्रीं रोहिणी नक्षत्रावर भगवान् श्रीकृष्ण प्रगट झाले. तो काल अत्यंत रमणीय होता. अंतरिक्षांत चंद्र नुकताच उदय पावत होता. मंदमंद सुख देणारा वारा वहात होता. मेघ अल्प वर्षण करीत होते. सर्व लोक

स्वाभाविक आनंदांत होते. अशा मंगल प्रसंगीं समोर सगुण व मनोहर भगवंताची चतुर्भुज मूर्ति पाहतांच वसुदेव व देवकी यांस अत्यंत आनंद झाला. त्यांनीं भगवंताची स्तुति केली. भगवान् प्रसन्न मुद्रेनें म्हणाले, 'वसुदेवा, तूं व देवकी दोघांनीं पूर्वजन्मीं पुत्राच्या इच्छेनें माझी आराधना केलीत त्या वेळीं देवा, तुझ्यासारखा आम्हांला पुत्र व्हावा असा तुम्हीं वर मागितला. मी ठीक आहें म्हणून गुप्त झालों.

पूर्वजन्मीं हा तुम्हांला दिलेला वर खरा करण्याकरितां मी स्वतः पुत्ररूपानें आज अवतीर्ण झालों आहें. ही पूर्वजन्मांतील ओळख देण्याकरितां मी या रूपानें प्रगट झालों आहें. वसुदेवा, कंसादिकां-पासून भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. पण तुला जर भीति वाटत असेल तर–गोकुळांतील तुझा मित्र नंद याची पत्नी यशोदा नुकतीच प्रसूत होऊन तिला कन्या झाली आहे. तरी तूं मला गोकुळांत ने व यशोदेच्या शयनावर ठेवून ती कन्या घेऊन ये. असें सांगून भगवंतांनीं तत्काळ आपलें चतुर्भुज रूप गुप्त करून नवप्रसूत अशा लहान मुलाचें सुंदर व कोमल रूप धारण केलें. नंतर भगवंतांनीं सांगितल्याप्रमाणें वसुदेव बालरूपी कृष्णाला घेऊन गोकुळांत जाण्याकरितां निघाला. तों चमत्कार असा–वसुदेवाच्या पायांतील शृंखला ( बेड्या ) आपोआप गळाल्या. दाराशीं येतांच दार उघडलें. बाहेरच्या पहारेकऱ्यांस गाढ झोंप लागली. यामुळें भगवंताचा प्रभाव वसुदेवाच्या लक्षांत आला. वसुदेवाला कोणतीच चिंता वाटेनाशी झाली. तो यमुनेजवळ आला. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळें यमुना तुडुंब भरून जात होती. तरी श्रीकृष्णाचें स्मरण करीत वसुदेव यमुनेंत उतरलाच. यमुनेनें श्रीकृष्णाच्या पायांचें क्षालन ( धुणें ) केलें आणि दुभंग होऊन रस्ता दिला.

पुढें वसुदेव नंदगृहीं यशोदेच्या शयनमंदिरांत गेला. यशोदेला झोंप लागली होती. कृष्णाला तेथें ठेवून नवीन झालेल्या कन्येला घेऊन वसुदेव परत मथुरेंत कारागृहांत आला. मुलगी देवकीचे हातांत देतांच दारें पूर्ववत् आपोआप बंद झालीं. वसुदेवाच्या पायांत बेड्या पडल्या. बाहेर पहारेकरी जागे झाले. हा सर्व चमत्कार भगवंताच्या योगमायेनें घडवून आणला.

देवकीनें कन्या हातांत घेतांच तिनें रडण्यास सुरुवात केली. तो लहान बालकाचा आवाज ऐकतांच पहारेकऱ्यांनीं अति त्वरेनें राजवाड्यांत जाऊन देवकी प्रसूत झाल्याचें कंसाला सांगितलें. देवकीचा आठवा गर्भ आणि तो जन्माला आला हें ऐकतांच कंस गोंधळून गेला. तसाच तो धांवत देवकीचे कारागृहांत आला. पहातो तों पुत्र नसून कन्या आहे. तथापि हा माझा काळ आहे असें म्हणत देवकीचे हातांतून मुलगी ओढून घेऊन तो तिचे दोन पाय धरून शिळेवर आपटणार तोंच ती त्याच्या हातून निसटली व अंतरिक्षांत दिव्यरूप धारण करून कंसाला म्हणाली, ' हे दुष्टा ! मला व्यर्थ मारून काय उपयोग ! पृथ्वीवर तुझा काळ कोठें तरी वाढतच आहे.' असें सांगून ती गुप्त झाली. ही योगमाया कन्यारूपानें अवतीर्ण झाली होती. नंतर कंसाला कृतकर्माबद्दल पश्चात्ताप झाला. त्यानें वसुदेव देवकीची क्षमा मागून व त्यांचें सांत्वन करून त्यांस कारागृहांतून मुक्त केलें व दुःखित अंतःकरणानें कंस परत राजवाड्यांत आला.

इकडे गोकुळांत नंदगृहीं यशोदेला मुलगा झाला म्हणून सर्व लोकांस आनंद झाला. कारण नंद हा गोकुळचा पाटील असून परोपकारी व सदाचरणी होता. त्यामुळें तो सर्व गोपांचा आवडता होता. गोकुळांतील सर्व गोपगोपी नंदगृहीं येऊन आनंदानें नाचत एक-

वा:टी
११९८
३९३०५९


मेकांचे अंगावर दहींदूध उडवून पुत्रजन्मोत्सव साजरा करूं लागलीं. नंदगृहीं पुत्रजन्मोत्सवानिमित्त मंगल वाद्यें वाजूं लागलीं. नंदानें पुत्रजन्मानिमित्त पुष्कळ दानधर्म केला. सर्व गोकुळ आनंद-सागरांत गढून गेलें. ज्या ठिकाणीं कल्याण करणाऱ्या भगवंताचा वास त्या ठिकाणीं दुःख कोठून असणार !!

याप्रमाणें ही श्रीकृष्णजन्माची थोडक्यांत माहिती आहे. श्रीकृष्णाचा जन्म गोकुळांत अष्टमीच्या दिवशीं झाला म्हणून ह्या दिवसाला गोकुळाष्टमी असें म्हणतात.

**धार्मिक विधि व रूढिः**—श्रावण वद्य अष्टमीच्या दिवशीं उपवास करून रात्रीं बारा वाजतां श्रीकृष्णाचा जन्मोत्सव करावा. श्रीकृष्णाचें देवालय नसल्यास श्रीनारायणाचे देवालयांत जन्मोत्सव करितात. मोठमोठ्या शहरांत अन्य देवालयांतसुद्धां जन्मोत्सव करण्याची वहिवाट आहे. रात्रीं कीर्तन, मंत्रश्रवण, भजन, पुराण वगैरे यथासंभव कार्यक्रम करितात. बालगोपाळ मंडळी नाचत नाचत वाद्यें वाजवीत मुखानें “ गोविंदा आलाऽरेऽ आला ” किंवा नुसतें ‘ गोविंदा गोपाळा, ’ असें म्हणत गांवांत फिरून शेवटीं श्रीनारायणाचे देवालयांत जाऊन दर्शन घेऊन मग आपआपले घरीं जातात.

श्रावण वद्य नवमीला “ दहींकाला ” असें म्हणण्याची प्रथा आहे. ह्या दिवशीं पुष्कळ गांवांतून, खेड्यापाड्यांतून घरोघरीं बालगोपाळ मंडळी नाचत असतात. नाचत असतांना त्यांच्या अंगावर ताक, दहीं, कढत पाणी व थंड पाणी ओतण्याची वहिवाट आहे. कांहीं हौशी लोक आपले घरीं हंडी बांधतात व ती बालगोपाळांकरवीं फोडवितात.

सर्व गांवांत नाचून झाल्यावर शेवटीं श्रीनारायणाचे देवालयांत येऊन तेथील हंडी फोडण्यांत येते. त्या वेळीं भुईमुगाच्या शेंगा

कोठें कोठें उडविण्याची प्रथा असते. सर्व दिवसभर लहान थोर मंडळी अंगावर थंड पाणी घेत असते तरी कोणाला कांहीं एक त्रास होत नाहीं अगर दुसरे दिवशीं तापही येत नाहीं. हेंच या दिवसाचें वैशिष्ट्य होय.

मथुरा, गोकुळ, वृंदावन ह्या ठिकाणीं हा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यांत येतो. बाहेरगांवचे पुष्कळ लोक मुद्दाम या ठिकाणीं श्रीकृष्णजन्मोत्सव पाहण्याकरितां जातात.

---

म. ग्रं. सं. ठाणे, क्रमांक ...
ग्रा. क्र. ........ नों. दि. ........
वि. ........ न. ........
ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
IRBK-0106984
IRBK-0106984

सेकांचे अंगावर दहींदूध उडवून पुत्रजन्मोत्सव साजरा करूं लागलीं. नंदगृहीं पुत्रजन्मोत्सवानिमित्त मंगल वाद्यें वाजूं लागलीं. नंदानें पुत्रजन्मानिमित्त पुष्कळ दानधर्म केला. सर्व गोकुळ आनंदसागरांत गढून गेलें. ज्या ठिकाणीं कल्याण करणाऱ्या भगवंताचा वास त्या ठिकाणीं दुःख कोठून असणार ! !

याप्रमाणें ही श्रीकृष्णजन्माची थोडक्यांत माहिती आहे. श्रीकृष्णाचा जन्म गोकुळांत अष्टमीच्या दिवशीं झाला म्हणून ह्या दिवसाला गोकुळाष्टमी असें म्हणतात.

**धार्मिक विधि व रूढिः**—श्रावण वद्य अष्टमीच्या दिवशीं उपवास करून रात्रीं बारा वाजतां श्रीकृष्णाचा जन्मोत्सव करावा. श्रीकृष्णाचें देवालय नसल्यास श्रीनारायणाचे देवालयांत जन्मोत्सव करितात. मोठमोठ्या शहरांत अन्य देवालयांतसुद्धां जन्मोत्सव करण्याची वहिवाट आहे. रात्रीं कीर्तन, मंत्रश्रवण, भजन, पुराण वगैरे यथासंभव कार्यक्रम करितात. बालगोपाळ मंडळी नाचत नाचत वाद्यें वाजवीत मुखानें “ गोविंदा आलाऽ रेऽ आला ” किंवा नुसतें ‘ गोविंदा गोपाळा, ’ असें म्हणत गांवांत फिरून शेवटीं श्रीनारायणाचे देवालयांत जाऊन दर्शन घेऊन मग आपआपले घरीं जातात.

श्रावण वद्य नवमीला “ दहींकाला ” असें म्हणण्याची प्रथा आहे. ह्या दिवशीं पुष्कळ गांवांतून, खेड्यापाड्यांतून घरोघरीं बालगोपाळ मंडळी नाचत असतात. नाचत असतांना त्यांच्या अंगावर ताक, दहीं, कढत पाणी व थंड पाणी ओतण्याची वहिवाट आहे. कांहीं हौशी लोक आपले घरीं हंडी बांधतात व ती बालगोपाळांकरवीं फोडवितात.

सर्व गांवांत नाचून झाल्यावर शेवटीं श्रीनारायणाचे देवालयांत येऊन तेथील हंडी फोडण्यांत येते. त्या वेळीं भुईमुगाच्या शेंगा

कोठें कोठें उडविण्याची प्रथा असते. सर्व दिवसभर लहान थोर मंडळी अंगावर थंड पाणी घेत असते तरी कोणाला कांहीं एक त्रास होत नाहीं अगर दुसरे दिवशीं तापही येत नाहीं. हेंच या दिवसाचें वैशिष्ट्य होय.

मथुरा, गोकुळ, वृंदावन ह्या ठिकाणीं हा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यांत येतो. बाहेरगांवचे पुष्कळ लोक मुद्दाम या ठिकाणीं श्रीकृष्णजन्मोत्सव पाहण्याकरितां जातात.

---

राज्य ग्रंथ संग्रहालय, शाखा
अनुक्रम २८२०४
विभाग
क्रमांक
नों. दि.
IRBK-0106984
IRBK-0106984

# ❀ मुलांसाठीं उपयुक्त पुस्तकें ❀

## – कथा-कल्पलता –

| | | |
|---|---|---|
| दिंडीरवन | महादेवशास्त्री जोशी | १–४–० |
| नीलमाधव | ,, ,, | १–४–० |
| बाहुबली | ,, ,, | [illegible]–० |
| मणिमेखला | ,, ,, | १· –० |
| त्यागराज | ,, ,, | १–४–० |
| दासो दिगंबर | ,, ,, | १–४–० |
| पुष्पदंत | ,, ,, | १–४–० |
| मीनाक्षी कन्या | ,, ,, | १–४–० |

———०———

| | | |
|---|---|---|
| सत्तावनचे सप्तर्षी | म. श्री. दीक्षित | १– ४–० |
| ·ॅवाईतील रत्नें | ,, ,, | १– ०–० |
| शिवबाचे शिलेदार | गो. नी. दांडेकर | १–१२–० |
| लाल महाल | ब.. मो. पुरंदरे | १· ८–० |
| प्रतापगड | ,, ,, | १– ८–० |
| राजगड | ,, ,, | १– ८–० |
| आग्रा | ,, ,, | १– ८–० |
| ·धर | ,, ,, | १– ८–० |
| ·. ·ाळगड | ,, ,, | १– ४–० |
| झांशीची राणी | प्रभाकर शिदोरे | १– ०–० |
| शुक्रावरचा मनुष्य | भा. द. खेर | ०–१०–० |
| सोन्याचा बाण | ना. ध. पाटील | ०–१४–० |
| आजकालच्या थोर विभूति | गोपिनाथ तळवलकर | १– ४–० |
| सारीं एकाच ईश्वराचीं लेकरें | ,, ,, | ०–१०–० |

# मुलांसाठीं उपयुक्त पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| श्यामची आई | | (साने गुरुजी) | १–१२–० |
| श्याम | | ,, | १–१२–० |
| क्रांति | संक्षिप्त | ,, | १– ८–० |
| तीन मुलें | ,, | ,, | १– ४–० |
| चि[illegible] रंगा | ,, | ,, | १– ८–० |

## प्राचीन सुरस गोष्टी

| | | | |
|---|---|---|---|
| महीपाल | (महादेवशास्त्री जोशी) | | ०–१०–० |
| उद्धार | ,, | | ०– ६–० |
| पुनर्जन्म | ,, | | ०– ८–० |
| सुदर्शन | ,, | | ०–१०–० |
| वैशाली | ,, | | ०–१०–० |
| जय नटराज | ,, | | ०–१०–० |
| वरदान | ,, | | ०–१०–० |
| खलग्रह | ,, | | ०–१०–० |
| मरुत्त, राजा उत्तम | ,, | प्रत्येकीं | ०– ६–० |

## महाराष्ट्राचे संजीवक

| | | |
|---|---|---|
| लोकमान्य टिळक | (शिखरे) | ०– ८–० |
| न्यायमूर्ति रानडे | ,, | ०– ८–० |
| सार्वजनिक काका | ,, | ०– ८–० |
| मालाकार चिपळुणकर | ,, | ०– ८– |
| 'सुधारक' कर्ते आगरकर | ,, | ०– ८– |
| साहित्य-सम्राट केळकर | ,, | ०– ८–० |
| नामदार गोखले | ,, | ०– ८–० |
| नाट्याचार्य खाडिलकर | ,, | ०– ८–० |
| काळकर्ते परांजपे | ,, | ०– ८–० |

बलवन्त पुस्तक–भाण्डार, मुंबई नं. ४

# मुलांसाठीं उपयुक्त पुस्तकें

## नाटकांच्या गोष्टी

| | | | |
|---|---|---|---|
| सौभद्र | ( पु. रा. लेले ) | | ०– ८–० |
| शारदा | ” | | ०– ८–० |
| मूकनायक | ” | | ०– ८–० |
| भाऊबंदकी | ” | | ०– ८–० |
| वधूपरीक्षा | ( गुर्जर ) | | ०– ८–० |

## इतर गोष्टी

| | | | |
|---|---|---|---|
| खडकावरील अंकुर | ( ताम्हनकर ) | | १– ८–० |
| चिंगी | ” | | १– ४–० |
| गोष्ट्या, १-२-३ | ” | प्रत्येकीं | १– ०–० |
| वेदांतील गोष्टी १-२ | | ” | १– ०–० |
| मराठ्यांच्या राज्यकथा | | | १– ८–० |
| ” वीरकथा | | | १– ८–० |
| रामशास्त्री | ( वाशीकर ) | | १– ४–० |
| चतुर इसाप | ( ताम्हनकर ) | | ०–१२–० |
| ज्ञान आणि मौज, भाग १ ते १३ | | प्रत्येकीं | ०– ८–० |
| व्या. ज्ञान सामान्य माहिती, भाग १-२-३ | | प्रत्येकीं | १– ८–० |
| मराठीचिये नगरीं | | | १– ८–० |
| बहुरंगी करमणूक, १-२-३ | (उत्तरांसह) | प्रत्येकीं | १– ८–० |
| ज्ञानतुषार | | | ०– ६–० |
| गोपाळांचा मेळा | ( गो. नि. दांडेकर ) | | १– ८–० |
| गलिव्हरचे प्रवास | | | ०–१०–० |
| सिंदबादच्या सात सफरी | | | ०– ८–० |
| रॉबिन्सन क्रूसो | | | ०– ६–० |
| डॉन क्विझोट | | | ०–१०–० |

बलवन्त पुस्तक–भाण्डार, मुंबई नं. ४.